मंगळवार, २८ फेब्रुवारी २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -१८३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 28 FEBRUARY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-183 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5


# नांदगाव खंडेश्वर येथे शेतकऱ्यांवर लाठीमार

## अचानक नोंदणी रद्द झाल्याने शेतकरी संतप्त

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती : नाफेडच्या हरभरा खरेदीला २७ फेब्रुवारी पासून सुरुवात होणार होती. खाजगी बाजारात हरभरा खरेदीला ४५०० रू बाजार भाव आहे. शासकीय नाफेड हरभरा खरेदीत शेतकऱ्यांना ५३०० रुपये भाव मिळत असल्याने अमरावतीत शेतकऱ्यांनी नाफेड खरेदी केंद्राबाहेर रात्रभर जागून रांगा लावल्या आहेत. रात्रभर शेतकरी रांगेत राहिल्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांचा नंबर लागेल अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र अचानक नोंदणी रद्द झाल्याने शेतकऱ्यांची तारांबळ उडाली. खासगी बाजारातील भाव हा सरकारी हमी भावापेक्षा कमी असल्यामुळे हरभऱ्याची शासकीय खरेदी सुरु व्हावी, यासाठी शेतकरी आग्रही आहेत. तूर्त ही नोंदणी होणार नाही. २ मार्चला नोंदणी केली जाणार असल्याच्या सूचना शेतकऱ्यांना देण्यात आल्यात. त्यामुळे शेतकरी संतप्त झालेत. शेतकऱ्यांनी केंद्राबाहेर आक्रोश केला आहे.**



सरकारने खुल्या बाजारात शेतकऱ्यांना हमी भाव द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वेनंतर आता चांदूर रेल्वेत हरभरा खरेदीच्या नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी रात्र जागून काढली. परंतु सोमवारी खरेदी नोंदणीचे आदेशच आले नाही. त्यामुळे सोमवारी शेतकऱ्यांची मोठी रांग पहावयास मिळाली. परिणामी शेतकरी वर्ग आक्रमक झाला. नाफेडमार्फत हरभरा खरेदीसाठी सोमवारी सकाळी ८ पासून नोंदणी सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले होते. मात्र काही केंद्रांकरिता सदर नोंदणी बाबतचे आदेशच आले नव्हते. त्यामुळे अनेक ठिकाणी गोंधळ झाला. अशातच चांदूर रेल्वे शहरात सुद्धा रविवारी सायंकाळपासून शेतकऱ्यांनी खरेदी-विक्री संघाच्या आवारात रांगा लावल्या होत्या. रात्री उशिरापर्यंत येथील गर्दी वाढतच होती. मात्र सोमवारी खरेदी-विक्रीला जिल्हास्तरावरून नोंदणी बाबतचे आदेशच प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे या ठिकाणी तारांबळ उडाल्याचे चित्र पाहावयास मिळाले. खासगी बाजारातील भाव हा सरकारी हमी भावापेक्षा कमी असल्यामुळे हरभऱ्याची शासकीय खरेदी सुरु व्हावी, यासाठी अनेकांनी काही दिवसांपासून संबंधित यंत्रणेशी पत्रव्यवहार सुरु केला होता. मात्र सोमवारी सुद्धा नोंदणी सुरू न झाल्यामुळे शेतकरी वर्ग आक्रमक झालेत. हरभरा विक्रीसाठी काल रात्रीपासून शेतकरी मोठ्या प्रमाणात बाजार समितीच्या प्रवेशद्वारा समोर उभे होते. या ठिकाणी मोठमोठ्या रांगा होत्या. दरम्यान आज सकाळी बाजार समितीचे गेट उघडताच शेतकऱ्यांची मोठी झुंबड उडाली. काही काळ परिस्थिती पोलिसांच्या नियंत्रणाबाहेर गेली होती. त्यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला.








ऐतिहासिक छत्रपती संभाजीनगर जी-20 च्या महिला-20 परिषदेला सोमवारपासून केंद्रीय महिला व बालकल्याण मंत्री स्मृती इराणी, केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, जी-20 चे प्रमुख अमिताभ कांत, महिला-20 च्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, डॉ. गुन्डेन तुकतान, समाजकल्याण आणि सहकार मंत्री अतुल सावे, पालकमंत्री संदीपादन भुमरे, धारित्री पटनायक, हरिभाऊ बागडे यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला.

# होळी, पाडव्यासाठी हार-कडे बनविण्याची लगबग!

## ग्रामीण भागात आजही पारंपरिक प्रथा टिकून

आधुनिक केसरी न्यूज

बंडू खडांगळे

लखमापूर : ग्रामीण भागात आजही सण म्हटला की मोठी लगीनघाई असते.त्यात प्रत्येक सणांसाठी वेगवेगळ्या वस्तूंना आजही मोठ्या प्रमाणावर नागरिकांकडून पसंती दिली जाते. त्यामध्ये होळी व गुडीपाडव्यासाठी आजही गोड असणारे हार व कडे यांना मोठी मागणी असते. यासाठी आता विविध ठिकाणी हार कडे बनविण्यासाठी व्यावसायिक वर्गात मोठी लगीनघाई पाहायला मिळत आहे. होळी आणि रंगोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे रंगाबरोबरच बाजारात साखरेच्या गाठी म्हणजे हार कडे याची दुकाने सजु लागली आहेत.त्या पार्श्वभूमीवर हार -कडे बनविण्याची जणु स्पर्धा सुरू झाली आहे. होळी आणि गुढीपाडव्याची चाहूल लागली की साखरेच्या गाठ्यांचे हार-कडे बाजारात पाहायला मिळतात. अनेक कुटुंबांमध्ये या गाठी निर्मिती चा व्यवसाय परंपरागत रित्या चालत आला आहे. अशा परंपरेतूनच अनेक व्यावसायिक गेल्या महिन्यांपासुन ते तयार करण्यांच्या कामांला लागलेले असतात.या दिवसांत साखरेच्या हार-कड्यांना मोठी मागणी असल्याने हे बनविण्यासाठी महाशिवरात्रीपासुनच सुरुवात





होत असते.आणि गुडीपाडव्यापर्यंत कामांची लगबग सुरू राहाते.पांढऱ्या शुभ्र आणि तितक्याच चविष्ट गाठी तयार करण्यांसाठी अनेक कुटुंब परिसरात प्रसिद्ध आहेत.अनेकांनी हा व्यवसाय अनेक वर्षांपासून जतन करून ग्राहक वर्गाची सेवा करीत आहे. या साखरगाठीची रेसिपी साधारण वाटत असली तरी यासाठी मोठी मेहनत घ्यावी लागते.त्यामुळे सर्व कुटुंब या दिवसात भल्या पहाटे उठून हे बनविण्यांच्या कामाला लागतात.परंपरेमुळे होळी व गुडीपाडव्यांला आता या साखरेच्या गोड हार-कड्यांना धार्मिक महत्त्व येत आहे.ग्रामीण भागात परंपरेने चालत आलेला हा उद्योग आजच्या मार्केटिंगच्या काळातही धडपडत का होईना शाबूत असल्याने काही कुटुंबांना वर्षांतुन एका महिन्याचा हा चांगला रोजगार उपलब्ध होत आहे.

### अशी असते तयार करण्यांची पध्दती

सुरूवातीला एका कढईला उष्णता देऊन त्यात गरजेनुसार पाणी आणि साखर टाकली जाते .नंतर दुध टाकून ते आधिक शुभ्र आणि चवदार कशी होईल यांची विशेष काळजी घेतली जाते .पुढे हेच साखरेचे पाणी एका लाकडी साच्यात दोरे टाकून भरले जाते .काही वेळेनंतर ते थंड झाले की हे लाकडी साचे वेगळे काढले जातात .मग त्यातून तयार होतो पांढरा शुभ्र हार .याप्रमाणे कडे सुध्दा तयार करण्यांची पध्दती असते . सध्या विविध रंगीबेरंगी हार-कडे यांना ग्राहकवर्गाकडून मोठी मागणी असते .







विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932



# माती भिडली आभाळा

आधुनिक केसरी


थोड्याशा पायऱ्या चढून मंदिरात पोहोचलो तो भव्य सभामंडप दिसला. पाहतो तो त्यात पंचवीस तीस स्त्री पुरुष ज्ञानेश्वरीचं पारायण करतानाचे सूर कानी आले. त्यामुळे मंदिराचं वातावरण आणखीनच प्रसन्न वाटत होतं . ज्ञानेश्वरीच्या दुसऱ्या अध्यायातील ओव्या कानावर पडत होत्या.

**उपजे तें नाशे ।नाशलें पुनरपि दिसे ।**
**हें घटिकायंत्र तैसें ।परिभ्रमे गा ॥**
**ना तरी उदो अस्तु आपैसे ।अखंडित होत जात जैसें ।**
**हें जन्ममरण तैसें ।अनिवार जगीं ॥**

'जे जे उपजते किंवा जन्म घेते ते ते नाश पावते. नाश पावलेले पुन्हा दुसऱ्या रूपाने प्रत्ययास येते. सूर्य आणि चंद्राचा उदय अस्त हे अखंडित सुरूच असतात. त्याचप्रमाणे जन्ममरणाचे हे चक्र अविरत सुरु राहते. तेव्हा एखाद्या व्यक्ती किंवा वस्तूबद्दल आसक्ती मनात धरणे आणि तिच्या नष्ट होण्याने शोक करणे व्यर्थ आहे. ' या अर्थाच्या या सुंदर ओव्या कानी पडल्या. ज्या ठिकाणी साक्षात माऊलींनी ज्ञानेश्वरी सांगितली, त्याच ठिकाणी तिचे मनन, पठण किंवा पारायण करणारी ही मंडळी किती भाग्यवान आहेत असा विचार मनात आला. मंदिरात प्रवेश केला की उजव्या बाजूला प्रथम दर्शन घडते ते शिवलिंगाचे. नंतर ज्ञानेश्वरांनी ज्या खांबाला ( पैस ) टेकून ज्ञानेश्वरी सांगितली तो पैसाचा पवित्र खांब. आणि त्याच्या शेजारी असलेल्या भागात संत ज्ञानेश्वर, जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि ज्यांनी ज्ञानेश्वरी उतरवून घेतली ते सच्चिदानंदबाबा यांच्या सुंदर मूर्ती आहेत.

पूर्वी ज्ञानेश्वरांनी जेव्हा ज्ञानेश्वरी लिहिली, तेव्हा या ठिकाणी करवीरेश्वराचे मंदिर होते. तेथील खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली.

शके बाराशे बारोत्तरे ।तैं टीका केली ज्ञानेश्वरे ।सच्चिदानंदबाबा आदरें ।लेखकु जाहला ॥



# आनंदी पहाट

## ज्ञानकोश म्हणजे प्रेमाचा पाझर फुटणारं अध्यात्म

आधुनिक केसरी

प्रपंचामध्ये परमार्थ कसा आणावा याचा ज्ञानकोश म्हणजे प्रेमाचा पाझर फुटणारं अध्यात्म होय. प्रापंचिकाच्या प्रत्येक आध्यात्मिक शंकेचं उत्तर हे खरं तर आपल्या सकारात्मक विचार, वर्तन व्यवहारात सापडू शकतं, त्याची जाणीव आपण करून घेणं जरुरीचं असतं. माणसातला देव तेव्हाच आपल्याला दिसायला आणि कळायला लागतो. आपल्याला ह्याच बाबीची जाणीव होणं आवश्यक आहे, कि देव देव्हाऱ्यात नाही तो माणसांत असावा आणि दिसावा. तेव्हाच खऱ्या अर्थानं मनुष्य जन्माचं सार्थक होऊ शकेल. केवळ लोककल्याण करण्याच्या


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

हेतूनं, आपलं आयुष्य वेचून आणि सर्वस्व देवून असंख्य लोकांना भगवंताच्या नामाचा आणि प्रेमाचा महिमा थेट प्रचीती देऊन पटवून देण्याचं काम ही मंडळी सदोदित करत असतात. देहबुद्धी मूळापासून जाळून टाकल्यामुळे त्यांच्या आचारात, विचारात आणि उच्चारात तसंच विचारांत, वर्तनात आणि व्यवहारांत चुकून देखिल मी पणा अथवा माझे पणा दिसत नसतो. हेच त्यांच्या पूर्णत्वाचं गमक, संत असल्याचं आणि त्यांच्यात देव असल्याचं मूळ लक्षण होय. अर्थात स्वतःबद्दल काहीच करायचं न उरल्यामुळे केवळ जगाचं कल्याण व्हावं एवढीच त्यांची भावना असल्याचं त्यांच्या प्रत्येक विचार, वर्तन आणि व्यवहारातून दिसून येत असतं. घरातल्या, कुटुंबातल्या सदस्यांना तुच्छ समजून देव्हाऱ्यातल्या देवाला गुच्छ वाहणारे देखील संख्येनं कमी नाहीत. का बरं असं होत असतं ? माणसातला देव का बरं अशांना दिसत, कळत नाही ? देव्हाऱ्यातल्या देवाचा तरी असे कितीजण विचार, आदर, सन्मान करतात अथवा त्या देवावर असा कितीजण किती विश्वास ठेवतात ? हाच खरं तर कळीचा मुद्दा आहे.



आधुनिक केसरी

**टेकविता माथा | पायावरी ||**
**माऊलीच्या संगे | व्हावे बाळ तान्हा ||**
**ज्ञानामृत पान्हा | पाजविते ||१||**
**मायेची सावली | तुकोबाचे घर ||**
**विश्वाचा आधार | ज्ञानराजा ||२||**
**रमलो वेडात | भ्रमाच्या संसारी ||**
**आलो भानावरी | संतांसंगे ||३||**
**ऐसा भाग्यवंत | झालो जगन्नाथा ||**
**ज्ञानेश्वरी-गाथा | श्वास झाले ||४||**
**जन्माचा आकांत | शांत झाला आता ||**
**टेकविता माथा | पायावरी ||५||**


प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

**जर काहीच सुचत नसेल तर झाडांकडे पहा. नक्की सुचेल. झाडांचा शांत हरित रंग त्याची नित्यनूतनता लाखो कवींचे मन खिळवून ठेवतो. किंबहुना सामान्य माणसाला काव्यात्मक दृष्टी देते.**



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**ज्ञानी ध्यानी मानि जग, जपी तपी पुज्यमान ।**
**पार नहीं सद्गुरु विना, प्रकृति महावल जान ।।२७।। (स्वर्वेद पंचम मण्डल दशम अध्याय) ०५/१०/२७**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

विश्वातील ज्ञानी, ध्यानी, मानी, जपी, तपी तसेच पूज्य कोणीही या मायेला जिंकू शकत नाही. या महान बलवान प्रकृतीला सद्गुरूंशिवाय कोणीही पार करू शकत नाही. आत्मा केवळ सद्गुरू-ज्ञानाने बलवान होऊन प्रकृतीवर शासन करू शकतो. हीच योगबलाची महान महिमा आहे.


स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

# श्रवणनिरूपण

आधुनिक केसरी

श्रवणभक्तिने आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात. चौफेर विचार करायची पात्रता अंगी येते. समोरचा काय म्हणतो आपण आपलेही मत जाहीर पणे मांडू शकतो. मित्रांनो भगवंताच्या भगवंताच्या भक्तिचा आरंभ श्रवणात होतो. आपण लहानपणापासून आईबाबा जे जे कोणी घरातील वडीलधाऱ्या चे ते जे सांगतिल ते ते श्रवण करतचं मोठे होतो. जगातील सर्व घडामोडींचा आरंभ श्रवणात होतो. प्रव्रुत्ति व प्रपंच,निव्रुत्ति किंवा परमार्थ दोन्हीही ठीकाणी श्रवणकला साधल्या शिवाय आपला ऊत्कर्ष होत नाही. कोणाकडून ऐकायला मिळते, आपल्याला ज्ञान मिळते आपल्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावतात म्हणून समर्थ म्हणतात की मानवी प्रगतीचे मुळ हे श्रवणात आहे. जगामध्ये इतके ज्ञान आहे, इतक्या वस्तु अनेक ठिकाणी विखुरलेल्या आहेत. श्रवण माध्यमातून आपल्याला याच्या कक्षा कळतात. श्रवणावाचून कोणतेही कार्य शक्य नाही. जसा सुर्यनारायण उगवला नाही तर सर्वत्र अंधार पडेल,तद्वत श्रवणात न राहिलेल्यास तुमच्या आयुष्यात अंधार पडेल. आपल्या जीवनातील अज्ञान अंधकाराचे जळमट दूर होण्यासाठी तरी श्रवणभक्तित रहावे. अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह या सहा कर्मांचे आचरण कसे करावे, पुरश्चरण कसे करायचे असते, सर्व विधीने युक्त अशी सगुण उपासना कशी करायची असते हे सर्व श्रवणाने कळते. अनेक प्रकारची व्रतवैकल्ये दान, तपे, साधने, योग व तीर्थयात्रा यासारख्या गोष्टी श्रवण कळतात.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# तुकाराम गाथा


आधुनिक केसरी

**पिसारागें भाजिलें घर ।नागविलें तें नेणे फार ॥४॥**
**तुका म्हणे वांच्या रागें ।फेडिलें सावलें देखिलें जगें ॥५॥**
**मज दास करी त्यांचा ।संतदासांच्या दासांचा ॥१॥**
**मग होत कल्पवरी ।सुखें गर्भवास हरी ॥ध्रु.॥**
**नीचवृत्तिकाम ।परी मुखीं तुझें नाम ॥२॥**

# मला जनप्रियत्व फार आवडते

आधुनिक केसरी

इथून जाणाऱ्या मंडळींना निरोप देताना मला खरोखरच फार वाईट वाटते. पुन्हा आपली भेट होईल की नाही ते काही सांगता येत नाही. तुम्ही सर्वांनी एकमेकांशी अत्यंत प्रेमाने वागा. प्रेमाने जग जिंकता येते. तुम्ही माझ्यापासून जनप्रियत्व शिका. मला जनप्रियत्व फार आवडते. कारण जो लोकांना आवडतो, तोच भगवंताला आवडतो. जो निःस्वार्थी असेल त्यालाच जनप्रियत्व येईल. जो भगवंताच्या इच्छेने वागेल त्यालाच जनप्रियत्व येईल. आपण आपल्यासाठी जे करतो ते सगळ्यांसाठी करणे, हे भगवंताला आवडते. आपण आपल्यापुरते न पाहता सर्व ठिकाणी भगवंत आहे असे पहावे. प्रत्येकाला आपण हवेसे वाटले पाहिजे. असे वाटण्यासाठी लोकांच्या मनासारखेच वागले पाहिजे किंवा त्यांना आवडेल तेच बोलले पाहिजे असे नाही. प्रेम करायला कशाचीही जरूरी लागत नाही; पैसा तर बिलकूल लागत नाही, हे मी माझ्या अनुभवावरून सांगतो. जगात कुणी कधी भोगली नसेल एवढी गरिबी मी भोगली आहे. अशा गरिबीमध्ये राहूनही माझे अनुसंधान टिकले, मग तुम्हाला ते टिकवायला काय हरकत असावी ? मी जर काही केले असेल तर मी कधीही कुणाचे अंतःकरण दुखवले नाही. तेवढे तुम्ही सांभाळा. जो जो कोणी मला भेटला, तो तो मी आपलाच मानला. मी नुसता खेळ



मांडला आणि तो खेळलो; त्यामुळे त्याचे सुखदुःख मला कधी बाधले नाही. नाम घ्यायची इच्छा पूर्ण झाली नाही म्हणून मी पुन्हा जन्मास आलो. मला तुम्ही सगळे रामरूप दिसत आहात. मला जे सांगायचे असेल ते मारुतीरायाला सांगावे म्हणजे ते मला कळते. माझा मनुष्य कुठेही असला तरी तो माझ्याकडेच येणार. मला दुश्चित्तपणा अगदी आवडत नाही. ज्यांनी माझी निंदा केली त्यांना तर मी कोण हे कळले नाहीच; पण ज्यांनी माझी स्तुती केली त्यांना मी कोण आहे हे त्याहून कळले नाही. प्रत्येकाला वाटते की आपल्याला लोकांनी चांगले म्हणावे, मी मात्र वागायचा तसाच वागेन; हे कसे शक्य आहे ? नाम घेतल्याने आपले सर्व अवगुण आपल्यालाच कळून येतील याबद्दल खात्री बाळगा आणि अंतःकरणपूर्वक नाम घ्या. एक भगवंताचे नाम घट्ट धरावे, त्यामधे अती उत्कटता ठेवून एकतानता करावी आणि स्वतःला पूर्ण विसरून जावे. 'मी नाम घेतो' हे देखील विसरून जावे. हाच खरा परमार्थ होय. नामामधे एकतानता होण्यासाठी भगवंताच्या साक्षित्वाने वागा; हवे-नकोपण टाकून द्या; राम कर्ता ही भावना ठेवा; विषय मालकीने भोगा; आपला गुण भगवंताकडे लावा; लहान मूल होऊन देवाकडे जा; रामाला आपले सुखदुःख सांगा; देहभोगाला कंटाळू नका; काळजी 'घ्या' पण काळजी 'करू' नका आणि निर्भय बना आणि अशा रीतीने जिवंतपणी आपले मरण पहा.

**आजचे बोधवचन आहे - जिथे नाम आहे तिथे मी आहे म्हणून खचित समजा. श्रीराम समर्थ**

राजस्थानी मल्टीस्टेट
कार्यक्षेत्र महाराष्ट्र-कर्नाटक

राजस्थानी मल्टीस्टेट
को-ऑप. क्रेडीट सो.लि., परळी वैजनाथ
बँकींग • आरोग्य • शिक्षण • रियल ईस्टेट • इन्शुरन्स
मुख्य कार्यालय : मोंढा, परळी वैजनाथ, जि. बीड. मो. 9130072178, 9130072188 | कॉर्पोरेट ऑफिस : २०५,२०६, बिल्डिंग नं. २, पहिला मजला, अपना बाजार, जालना रोड, औरंगाबाद. मो. 9130072176,
टोल-फ्री : 18004197501 rajasthanimultistate.in | संपर्क अनंत भाग्यवंत ९१३००७२१८९


चंदुलाल बियाणी
संस्थापक अध्यक्ष

Rajasthani Multistate MINI BANKING
www.rajasthanimultistate.in
Powered by Tatkal Banking
आता बँकिंग व्यवहार करणे झाले सोपे...
राजस्थानी मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडीट सो.लि.,चा
तात्काळ बँकिंगच्या माध्यमातून तब्बल
४१८ बँकांशी होणार सेकंदात व्यवहार...

कोणतेही बँकिंग व्यवहार करणे फक्त 9 सेकंदात शक्य

तात्काळ बँकिंग सुविधा
रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त, NPCI द्वारे संचलित भारत बिल पेमेंट सिस्टम (BBPS), मोबाईल/डी.टी.एच. रिचार्ज आणि इतर सुविधा
* नियम व अटी लागू
कोणत्याही बँकेत पैसे डिपॉझिट करणे. | कोणत्याही बँकेत पैसे ट्रान्सफर करणे. | कोणत्याही बँकेतून पैसे काढणे | मोबाईल बँकिंग सुविधा | Bank Account Verification सुविधा | NEFT/RTGS सुविधा | IMPS/UPI सुविधा | आधार पेमेंट सुविधा | QR Code सुविधा


# विधिमंडळ सभागृहाच्या प्रथा-परंपरांचे योग्य पालन होत नाही

## अजित पवार : नियमांना बगल देण्याचे प्रकार वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विधीमंडळ सभागृहांचे कामकाज भारतीय संविधान, नियम, प्रथा आणि परंपरेनुसार चालते. अलीकडच्या काळात बऱ्याच प्रथा, परंपरा आणि नियमांना आपण बगल देण्यात येत असल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी 'पॉईंट ऑफ प्रोसिजर'व्दारे सभागृहात केला. विविध आयुधांचा वापर करुन सदस्यांनी सादर केलेल्या सूचना मान्य किंवा अमान्य याची माहिती सदस्यांना मिळत नाही, कपात सूचनांची यादी सर्व सदस्यांना दिली जात नाही, तसेच ही यादी कार्यवाहीसाठी मंत्रालयीन विभागांना पाठवली की नाही याची माहिती देण्यात यावी तसेच 'ऑर्डर ऑफ द डे' रात्री बारा वाजेनंतर संकेतस्थळावर देण्यात येत असल्याने दुसऱ्या दिवशीच्या कामकाजाची माहिती सदस्यांसह मंत्र्यांनासुध्दा मिळत नाही, तरी यामध्ये तात्काळ सुधारणा करुन सभागृहाच्या नियम, प्रथा-परंपरांचे योग्य प्रकारे पालन करण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.


विधिमंडळ सदस्य अतिशय काळजीपूर्वक आणि जबाबदारीने आपल्या मतदारसंघातील जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तारांकित प्रश्न, कपात सूचना इत्यादी आयुधांच्या माध्यमातून आपल्या मान्यतेसाठी दाखल करीत असतात. विधिमंडळ सचिवांनी या सूचना मान्यतेसाठी आपल्याला सादर केल्यानंतर सूचना मान्य झाली किंवा अमान्य झाली, हे कळण्याचा सदस्यांचा



घटनादत्त अधिकार आहे. परंतु गेल्या काही काळापासून ही परंपरा पाळली जात नाही. विधानसभा सदस्यांनी दाखल केलेला तारांकित प्रश्न स्वीकृत झाला किंवा अस्वीकृत झाला याबाबतचे ज्ञापन संबंधित सदस्यांना सचिवालयाकडून देण्याची पद्धत बंद करण्यात आलेली आहे. तसेच संबंधित विभागांच्या मागण्या मतदानासाठी ज्यादिवशी कामकाज पत्रिकेत दाखविलेल्या असतात त्याचदिवशी अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी सर्व सदस्यांना टपालाद्वारे प्राप्त व्हायची. परंतु सदस्यांना कोणतीही माहिती न देता कपात सूचनांची एकत्रित यादी पाठविणे बंद करण्यात आले आहे. तसेच हिवाळी अधिवेशनातील मान्य झालेल्या कपात सूचनांची यादी आजतागायत पुढील कार्यवाहीसाठी मंत्रालयीन विभागांना आणि सदस्यांना पाठविण्यात आलेली नाही. विधिमंडळ सदस्यांना 'ऑर्डर ऑफ द डे' आल्यानंतर आपली लक्षवेधी सूचना किंवा प्रश्नोत्तराच्या यादीत प्रश्न छापून आलेला दिसला तर सदस्यांना त्या प्रश्नावरील पूरक प्रश्नाची तयारीही करता येत नाही. मात्र रोजची 'ऑर्डर ऑफ द डे' सुध्दा रात्री १२ नंतर उशिरा संकेतस्थळावर टाकली जाते. त्यामुळे दुसऱ्या दिवशी कोणते कामकाज आहे. हे सदस्यांना कळत नाही. सदस्य तयारी करू शकत नाही. केवळ सदस्यच नाही मंत्र्यांना आणि विभागांना देखील त्या विषयावर संपूर्ण माहितीसह सभागृहात येण्यास अडचणीत येतात. तरी 'ऑर्डर ऑफ द डे' रात्री किमान दहा वाजेपर्यंत संकेतस्थळावर टाकण्याची मागणीही अजित पवार यांनी केली.
दरम्यान यावर योग्य ती सुधारणा करण्याचे आश्वासन विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

# कवी, चित्रकार भ. मा. परसवाळे यांना 'गोविंद सन्मान' जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** गरुड ADS चे संस्थापक आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कै. गोविंद देशपांडे यांच्या स्मृती निमित्त गेली १६ वर्षे स्मृती सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. मागील आठ वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कला व साहित्य क्षेत्रात महत्त्वाचे योगदान देणाऱ्या मराठवाड्यातील जेष्ठ व्यक्तिस कै. गोविंद देशपांडे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'गोविंद सन्मान' बहाल करण्यात येतो. यापुर्वी जेष्ठ पत्रकार गोपाळ साक्रीकर, कादंबरीकार बाबू बिरादार, पत्रकार नागनाथ फटाले, पक्षीतज्ज्ञ डॉ. दिलीप यार्दी, दख्खनी भाषेचे अभ्यासक ॲड. अस्लम मिर्झा, नकाशाकार पंडितराव देशपांडे, प्राचीन इतिहास तज्ज्ञ डॉ. दुलारी गुप्ते - कुरेशी आणि गोंधळ महर्षी गुलाबराव कदम यांना या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. यावर्षी 'गोविंद सन्मान' साठी जेष्ठ मराठी कवी, चित्रकार मा. श्री भ. मा. परसवाळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. रोख ११ हजार रुपये, सन्मानपत्र आणि शाल असे पुरस्काराचे स्वरुप आहे.
गोविंद सन्मान' मंगळवार, दि २८ मार्च २०२३ रोजी 'गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्यात' प्रदान केल्या जाणार आहे. अशी माहिती गरुड परिवाराच्या माधुरी गौतम, अनिल पाटील, श्रीकांत उमरीकर, धनंजय दंडवते व नामदेव शिंदे यांनी दिली. गोविंद देशपांडे स्मृति सोहळ्याचे आयोजन गरूड परिवाराच्या वतीने करण्यात येते.



# भरधाव कारने चौघांना चिरडले

आधुनिक केसरी न्यूज

**रवींद्र कांबळे**

**सांगोला :** भरधाव कारवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या भीषण अपघातातचौघा प्रवाशांना चिरडल्याने आजी व नातूचा जागीच मृत्यू झाला. तर पती-पत्नीसह तिघेजण जखमी झाले. यावेळी कार तशीच पुढे किराणा दुकानाची भिंत फोडून आत घुसली मात्र सुदैवाने दुकान मालक बाहेर असल्यामुळे बालंबाल बचावला. हा अपघात रविवारी ४ च्या सुमारास चिकमहुद- दिघंची रोडवरील शेरेवाडी कटफळ ता सांगोला येथे घडला. द्रोपदी शिवाजी आटपाडकर -५० व सिद्धेश्वर नामदेव काळेल -७ ( रा. कटफळ आटपाडकर वस्ती) असे मृत आजी व नातूचे नाव आहे तर नामदेव सदाशिव काळेल - ३५ व रुक्मिणी नामदेव काळेल -३० (दोघेही रा.कटफळ, आटपाडकर वस्ती ता. सांगोला) तसेच पिकअप चालक विष्णू बळीराम मेंगाने- जाधव रा. शिंगोर्णी, ता. माळशिरस अशी जखमीची नावे आहेत. कटफळ आटपाडकर वस्ती येथील नामदेव सिद्धेश्वर काळेल, रुक्मिणी नामदेव काळेल व सिद्धेश्वर नामदेव काळेल असे तिघेजण मिळून वसईला रोजगारासाठी जाण्यासाठी बसची वाट पाहत शेरेवाडी येथील सचिन तरंगे यांच्या किराणा दुकानासमोर सावलीला थांबले होते तर द्रौपदी आटपाडकर या वरील तिघांना सोडण्यासाठी आल्या होत्या त्यादरम्यान भोसे ता. पंढरपूर येथील बाळासाहेब माळी यांचा पुतण्या, सून, भाऊ व भावजय असे सर्वजण मिळून एम एच -१३- डी वाय -४५४६ या कारमधून महूद मार्गे दिघंचीकडे निघाले होते. त्यादरम्यान चालकाचे नियंत्रण सुटल्याने कारने दुकानासमोर थांबलेल्या चौघांना चिरडले.

# वैजापूरची रश्मी कुमावत बनली हवाई सुंदरी

## जिद्द, मेहनत व चिकाटीच्या जोरावर गगन भरारी

आधुनिक केसरी न्यूज

राहुल त्रिभुवन

वैजापूर : ग्रामीण भागात राहूनही येथील तरुणीने गगन 'भरारी' घेत जिद्द, मेहनत व चिकाटीच्या जोरावर हवाई सुंदरी होण्याचे स्वप्न बाळगून ते सत्यात उतरविण्याची प्रत्यक्ष किमया वैजापूरात रश्मी गोपाल कुमावत हिने करून दाखविली आहे. तिची इंडिगो एअरलाईन्समध्ये हवाई सुंदरी ( एअर होस्टेस ) म्हणून निवड झाली असून तालुक्यातील ती पहिलीच हवाई सुंदरी ठरली आहे.

वैजापूरसारख्या ठिकाणी राहून रश्मी कुमावत हिच्यासाठी हवाई सुंदरी बनण्यापर्यंतचा प्रवास म्हणजे नक्कीच मैलाचा दगड होता. वडिल गोपाल कुमावत व्यवसायिक, आई मंजू कुमावत गृहिणी असून पाहिजे तितके शैक्षणिक वातावरण नसतानाही तिने मारलेली मजल निश्चितच कौतुकास्पद म्हणावी लागेल. शालेय शिक्षण सेंट मोनिका इंग्लिश शाळेत, त्यानंतर शहरानजीकच्या एका इंस्टीट्यूटमध्ये



पदवी घेऊन औरंगाबाद येथील एका अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई.ची पदविका प्राप्त केली. परंतु पदविका प्राप्त करून या क्षेत्रात फारसे भवितव्य वाटत नसल्याने तिने वेगवेगळ्या क्षेत्रातील माहिती घेऊन प्रयत्न सुरू केले. ऑनलाईन अर्ज करण्यासह परीक्षाही दिल्या. परंतु यश अजूनही पथ्यात दिसायला तयार नाही. परंतु दरम्यानच्या काळात इंडिगो एअरलाईन्समध्ये हवाई सुंदरी पदासाठी अर्ज केला असल्याने एक दिवस तिला मुलाखतीसाठी बोलाविण्यात आले अन् तिला आकाश ठेंगणे वाटू लागले. मुलाखतीनंतरही बराच पल्ला गाठायचा होता. परंतु मुलाखतीसाठी बोलाविण्यात आल्याचा आनंद तिच्यासह घरातील सदस्यांना जास्त होता. 3 ऑगस्ट 2022 रोजी तिला मुलाखतीसाठी पुणे येथे बोलावण्यात येऊन तिची पुढील प्रशिक्षणासाठी निवडही झाली. त्यानंतर तिला बँगलोर येथील आयफ्लाय ट्रेनिंग इंस्टीट्यूटमध्ये तीन महिन्याच्या प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. 11 जानेवारी 2023 रोजी तिचे प्रशिक्षण पूर्ण होऊन तिला 1 फेब्रुवारी रोजी प्रथम मुंबई - दिल्ली व गोवा फ्लाईट मिळाले. ग्रामीण भागातील तरुणींमध्ये न्यूनगंड बघावयास मिळतो. वास्तविक पाहता आपण शहरात वाढलो की खेड्यात? हा प्रश्न महत्त्वाचा नसून जिद्द ,चिकाटी व मेहनत करण्याची तयारी असेल तर आकाशाला 'गवसणी' घालणे अवघड नसते. हेच तिने सिद्ध करून दाखविले. सुरवातीच्या काळात मी पुणे येथे यासंदर्भात काही महिन्यांसाठी शिक्षण घेतले होते. परंतु त्याचा फारसा फायदा झाला नाही. 2020 - 21 मध्ये कोरोना महामारीमुळे एअरलाईन्समध्ये पदभरती बंद होती. त्यामुळे दोन वर्षे वाया गेले. एअर होस्टेस होण्यासाठी आईवडीलांसह भाऊ शुभम याने प्रोत्साहन देऊन शेवटपर्यंत साथ दिली.

# नीलम गोऱ्हे यांचा पुढाकार

आधुनिक केसरी

जातपंचायतीच्या सर्वच घटनांमध्ये महिलांवर अन्याय, अत्याचार झाल्याचे दिसून येत आहे. महिलांच्या इतर प्रश्नांसह जातपंचायतीकडून झालेल्या अन्यायाच्या व्यथा आता संयुक्त राष्ट्रसंघ पुरस्कृत आंतरराष्ट्रीय महिला आयोगात मांडल्या जाणार आहेत. त्यासाठी विधान परिषदेच्या उपसभापती तथा स्त्री आधार केंद्राच्या अध्यक्षा नीलम गोऱ्हे विशेष प्रयत्न करत असल्याची माहिती जातपंचायत मूठमाती अभियानाचे कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी दिली आहे. आंतरराष्ट्रीय महिला आयोगाने सहा ते १७ मार्च या कालावधीत न्युयॉर्क येथील त्यांच्या कार्यालयात ६७ वे सत्र आयोजित केले आहे. नीलम गोऱ्हे अध्यक्षा असलेल्या स्त्री आधार केंद्राने इतर अनेक संस्थांप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघाच्या अर्थिक व सामाजिक परिषदेचे सदस्यत्व घेतले आहे. या अंतर्गत ११ मार्च रोजी एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ग्रामीण भागात महिलांनी सार्वजनिक ठिकाणचे अत्याचार रोखण्याच्या कामात मिळविलेले यश' या विषयावर परिसंवाद होणार आहे. गेल्या दहा वर्षांत ग्रामीण भागात महिला अत्याचार रोखण्यासंदर्भात आलेल्या अडचणींवर कशी मात केली, त्यातून बाहेर निघण्यासाठी काय प्रयत्न झाले, याबरोबरच शासन स्तरावरून याबाबत मार्ग काढण्यासाठी कोणत्या प्रकारच्या विकास योजना तयार करता येतील, याचा उहापोह होईल. यामध्ये नाशिक येथील जातपंचायत मूठमाती अभियानाचे राज्य कार्यवाह चांदगुडे सहभागी होणार आहेत. स्त्री आधार केंद्राने 'ग्रामीण महिलांच्या अत्याचार विरोधी संघर्षात समाज व पोलिसांकडून अपेक्षा' या विषयावर परिसंवाद घेतला होता. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात तज्ज्ञ व्यक्ती म्हणून चांदगुडे उपस्थित होते. त्यात त्यांनी जातपंचायतीमुळे पीडित महिलांच्या दाहक व्यथा मांडल्या. ते ऐकून सभागृह स्तब्ध झाले होते. इतर महिलांनीही आपले अनुभव कथन केले. गोऱ्हे यांनी ग्रामीण भागात महिलांच्या होणाऱ्या अत्याचाराबाबत माहिती देऊन समाज व पोलीस प्रशासनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी अनिता शिंदे, कोमल वर्दे आदी उपस्थित होते.

# उत्तर नसलेले प्रश्न !

आधुनिक केसरी



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

**गेली अनेक वर्षे होम मिनिस्टर ही आदेश बांदेकर अँकर असलेली मालिका सुरू आहे.या गाजलेल्या कौटुंबिक मालिकेत आदेश कुटुंबातील प्रत्येकाला एक कॉमन प्रश्न विचारतो.तो एकमेकाच्या स्वभवाबद्दल असतो.त्यातून एक प्रामाणिक उत्तर मिळते.ते हे की बहुतेकांचा स्वभाव तापट,रागीट,चिडचिडा असतो.केवळ पडद्यावरील कुटुंबाच्या बाबतीतच नव्हे तर आपल्या प्रत्येक घरात हीच परिस्थिती आहे.सहनशक्ती कमी झाली आहे.हव्यास वाढला आहे.हवे ते ताबडतोब मिळाले नाही की संतापाने वाटेल त्याला वाटेल ते बोलणे,त्रागा करणे,चिडचिड करणे हे घराघरात कॉमन झाले आहे.**

अगदी लहान मुलं देखील अपवाद नाहीत. त्यांच्या मनासारखे खाणे, पिणे, कपडेलतते, मिळाले नाहीत की छोटी मुले देखील आकाश पाताळ एक करतात. पालक देखील मुलाचे नको तितके लाड करतात.आपल्याला जे मिळालं नाही ते सर्व आपल्या मुलांना मिळाले पाहिजे हा भाव त्यामागे असतो. पूर्वीच्या कौटुंबिक परिस्थितीच्या तुलनेत आज आर्थिक स्थिती चांगली आहे त्यामुळे ही मुलांना काही कमी पडू नये हा त्यामागे सदहेतू असतो. पण इथेच हट्टी पणाची, संतापाची बीजे रोवली जातात. हवे ते ताबडतोब मिळालेच पाहिजे, तो आपला जन्म सिद्ध हक्क आहे, अशी भावना वाढीला लागते. पुढे शाळा कॉलेजात, नोकरी व्यवसायात देखील पेशन्स ची तयारी नसते. सगळेच मार्ग आपल्याला हवे तसे सुकर नसतात, प्रवासात खाच खळगे येतात, अपयश देखील पचवावे लागते, हार स्वीकारावी लागते, हेच समजत नाही.सगळेच दिवस सारखे नसतात, सगळेच पत्ते हुकुमाचे नसतात, हे कळायला, उमजायला वेळ लागतो. हे खरे तर लहान पणाच्या संस्कारातून येते. उत्तम वाचनातून,उत्तम कलेच्या आस्वादनातून येते. तिथेच समस्या आहे.वाचन कमी झालेय. कलेच्या आस्वादनाला वेळ नाही. एकत्र कुटुंब पद्धती लयाला गेलीय. पालक आपापल्या नोकरी व्यवसायात व्यस्त आहेत.शिवाय अवती भवती चे सामाजिक, राजकीय वातावरण अधिकाधिक दूषित होत चालले आहे.

नवरा बायकोच्या संसारातले ताण तणाव देखील वाढले आहेत.लग्न झाल्या बरोबर वर्षा आत घटस्फोट, मुलं चांगली मोठी झाल्यावर म्हणजे दहा पंधरा वर्षे एकत्र राहिल्यानंतर विभक्त,असे प्रकार घडताहेत. युतीत फक्त राजकारणी पक्षच सडत नाहीत. नवरा बायको देखील हीच भाषा बोलतात. नात्यातील कौटुंबिक जिव्हाळा कुठे राहिलाच नाही.एक घाव दोन तुकडे ही प्रवृत्ती वाढत चालली आहे. एकमेकांना समजून घ्यायची तयारीच नाही. सारखी तू तू मैं मैं. प्रत्येक ठिकाणी इगो आड येतो. माघार घेण्याची कुणाचीच तयारी नसते.संपत्तीचा मोह वाढलाय. तुझे माझे हीच भाषा जास्त. आपले दोघांचे, सर्वांचे हा सामायिक विचारच नाही. जबाबदाऱ्या या सर्वांनी मिळून स्वीकारत पुढे जायचे असते. संसार एकट्या बायकोचा, एकट्या नवऱ्याचा नसतो. तो दोघांचा,मुलांचा,नातेवाइकांचा, सर्वाचा असतो. स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने कमावू लागली. तरी तिचे संसारातले दुय्यम स्थान तसेच राहिले.प्रोफेशनल जबाबदाऱ्या पुरुषा इतक्याच स्त्रियांच्या देखील महत्वाच्या. मुलाचे अभ्यास, किचन, हे स्त्रीनेच बघावे हाच पारंपरिक दृष्टिकोन आजही दिसून येतो. त्यामुळे स्त्रियांचा त्रागा होतो. काही ठिकाणी पुरुष स्त्रियांना मदत करताना दिसतात आजकाल. पण ते प्रमाण कमीच. अनेक स्त्रिया जबाबदारीच्या पदावर काम करतात. त्यांना वेळी अवेळी काम करावे लागते ऑफिसचे. इथे समजूतदारी ची गरज असते. पण पुरुषाची तडजोडीची तयारी नसते. भांड्याला भांडं वाजते. घटस्फोटापर्यंत पाळी येते.पूर्वी मनाची नाही पण जनाची लाज वाटायची.समाजाचे, नातेवाईकाचे दडपण वाटायचे. आता कुणीच कुणाच्या अध्यात मध्यात नसते. लिव्ह इन रिलेशनशिप,पटले नाही तर सोड पिच्छा..हेही कॉमन झाले.प्रत्येकाच्या वर्तुळाची त्रिज्या आकुंचित होत चाललीय.नाती दुरावत चालली. त्यामुळे कुणी कुणाच्या भानगडीत पडत नाही. तुमच्या वागण्याचा कुणावर फारसा परिणाम होत नाही.पूर्वी काही विपरीत घडायची कुणकुण लागली तरी सगळे मदतीला धावून यायचे. समजवायचा प्रयत्न करायचे. आता तर काही पालकच नवरा बायकोच्या भांडणाच्या आगीत तेल ओततात! मुलीला,मुलाला भडकवतात.सगळेच विचित्र. दोष कुणाला द्यायचा कळत नाही.माघार घ्यायची कुणाचीच तयारी नसते.माझेच बरोबर ही हटवादी वृत्ती. मग कुणी कुणाला कसे समजावायचे , का समजवायचे ? विवाह संबंधातली नैतिकता,पावित्र्य,समंजस वृत्ती सगळेच कमी होत चालले.फक्त कोरडे व्यवहार तेव्हढे उरलेत! शिक्षणाने अक्कल आली. पण ती वेगळ्याच दिशेने वहायला लागली. शहाण्यांना वेड लागले असे म्हणायची वेळ आली!

घरात तरुणांना वृद्ध माणसे, आई वडील नकोसे होत चाललेत. वृद्धांच्या प्रश्नाचे गांभीर्य वेगळेच आहे. मुले, सुना आपापल्या नोकरी व्यवसायात व्यस्त. नातवंडं आपल्या विश्वात मस्त. वृद्ध, आजारी आई वडिलांनी कुणाकडे पहायचे ? हेही ताण तणावाचे कारण. आजकाल मुली वार्षिक पॅकेज किती या प्रश्ना बरोबर घरात एक्स्ट्रा ब्यागेज ( ? ) किती ही देखील चौकशी करतात म्हणे! आपण किती घसरत चाललो हे यावरून समजते. मग या म्हाताऱ्या आई वडिलांनी कुणाकडे पहायचे, कुणाकडे राहायचे ? होम मिनिस्टर च्या कार्यक्रमात क्यामेऱ्या समोर दिसणारे हसरे कुटुंब पडद्या मागे वेगळेच नाटक खेळत असते. वेगळ्याच तणावाचा सामना करीत असते.

आता तर कुटुंबातले कुणी ना कुणी परदेशात गेलेले.. कमाईसाठी. त्यामुळे भौतिक अंतर तसेही वाढलेले. आठवड्याला एक व्हिडिओ कॉल,चौकशीचा एक व्हॉट्स ॲपवर मेसेज,कर्तव्य संपले! क्वचित कधी वर्षा दोन वर्षांतून एकदा भेटी गाठी.. तिथेही जाई पर्यंत दोन्ही पक्षी आतल्या आत ताण तणावाचे वातावरण. दिलखुलास बातचीत,मोकळेपणा क्वचितच दिसतो अपवादाला. हे सगळे वळवाच्या पावसा सारखे..धो धो बरसणे, चिंब चिंब भिजणं दिसतच नाही आजकाल. घरी दारी सगळी कडे टेन्शन. सरकारं देखील तणावाच्या ओझ्याखाली सदा सर्वदा.सर्वांना आपल्या अस्तित्वाची काळजी! स्वतःची काळजी.बाकी सारे गेले उडत ही स्वार्थी वृत्ती. एकूणच आपल्या भोवती धुके दाटलेले..वर आभाळ भरून आलेले. चिंतेचे ढग. भविष्या विषयी काळजीचा ताण.. त्यामुळे हातचा क्षण, अवती भवती चे वातावरण कितीही पोषक, आनंदी, असले तरी ते भोगायचे नाही,स्वीकारायचे नाही. दुकानांत स्त्रियांना बघा.. जे दुकानात नसेल तेच त्यांना हवे असते! जिथे बिचाऱ्या दुकानदाराचा देखील नाईलाज असतो! शेवटी कुणी कुणाला कसे समजवायचे हाच प्रश्न असतो. ज्याचे उत्तर कुणालाच माहिती नसते.



# क्रांतीसूर्य स्वातंत्र्यवीर सावरकर

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर (जन्म 28 मे 1883) या द्रष्ट्या, क्रांतीकारी देशभक्त अन् अत्यंत प्रतिभासंपन्न व्यक्तीमत्त्वाचे नाव भारताच्याच नव्हे, तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षराने कोरले गेले आहे ! आजच्या अत्यंत व्यक्तिकेंद्रीत, संकुचित, 'अर्थ आणि काम' यांभोवती गुंजी घालणाऱ्या आणि जातीयवादी साहित्याच्या तुलनेत उत्तुंग, उज्ज्वल अन् महन्मंङ्गल असे जगण्याचे एक उदात्त ध्येय समोर ठेवणाऱ्या अविस्मरणीय अशा साहित्याची निर्मिती भाषाप्रभू आणि विद्वतप्रचूर सावरकरांनी केली. 'राष्ट्र' हेच त्यांचे जीवनमूल्य असल्याने त्यांचे एकमेवाद्वितीय साहित्य हे राष्ट्रहिताच्या अनुषंगानेच प्रसवलेले आहे.**

साहित्यिकही अनेक असतात आणि क्रांतीकारकही अनेक होऊन गेले; मात्र स्वातंत्र्यवीर सावरकारांसारखा क्रांतीवीर साहित्यिक हा यासम हाच !' अंदमानाच्या कारावासात पाठवण्याच्या आधी कारागृहातील शेवटच्या भेटीत स्वा.सावरकरांनी आपल्या तरुण पत्नीला केलेला उपदेश ! ''....बरें ईश्वराची दया असेल, तर पुनः भेट होईलच. तोवर जर कधी या सामान्य संसाराचा मोह होऊ लागला, तर असा विचार करा की, मुला-मुलींची वीण वाढविणे व चार काटक्या एकत्र करून घरटी बांधणे यालाच जर संसार म्हणावयाचे असेल, तर असले संसार कावळे-चिमण्याही करीतच आहेत; पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ जर घेणे असेल, तर मनुष्यासारखा संसार थाटण्यात आपणही कृतकार्य झालो आहोत. आपली चार चूल-बोळकी आपण फोडून टाकली; पण त्यायोगे पुढेमागे हजारोजणांच्या घरी धूर निघेल आणि घर घर म्हणून करीत असतांनाही प्लेगने नाही का शेकडो जणांची घरे ओसाड पाडली, लग्नाच्या मंडपातून नवरा-नवरीस विलग हिसडून मृत्यूच्या दाढेत ढकलून दैवाने जोडपी विजोड करून टाकली ! 'लंडनमध्ये एकदा गुप्तचरांनी स्वा. सावरकरांना अडवले आणि म्हटले, ''महाशय, क्षमा करा. आम्हाला तुमच्याविषयी संशय आहे. तुमच्यापाशी घातक हत्यार आहे, अशी निश्चित वार्ता असल्याने तुमची झडती घ्यायची आहे !'' सावरकर थांबले, गुप्तचरांनी झडती घेतली. काहीच सापडले नाही ! तेव्हा गुप्तचरांचा प्रमुख अधिकारी सावरकरांना म्हणाला, ''क्षमा करा. चुकीच्या बातमीमुळे तुम्हाला त्रास झाला.'' सावरकर म्हणाले, ''तुम्हाला मिळालेली वार्ता चुकीची नाही. माझ्यापाशी भयंकर घातक हत्यार आहे.'' खिशातील झरणी ( पेन ) दाखवून सावरकर म्हणाले, ''हे पहा, ते हत्यार ! यातून निघणारा एकेक शब्द तरुणांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा देतो. या शब्दांनी देशभक्तांचे रक्त सळसळते आणि ते राष्ट्रासाठी तळहातावर शिर घेऊन लढण्यास सिद्ध होतात !'' 1938 साली मुंबईत झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून साहित्यिक सावरकरांनी हिंदूंना एक संदेश दिला. अध्यक्षीय भाषणात स्वा. सावरकर म्हणाले, ''आता सरते शेवटी मला हे सांगितल्यावाचून गत्यंतरच दिसत नाहीr. 'साहित्य हे आजच्या आपल्या राष्ट्राच्या परिस्थितीत दुय्यम-तिय्यम कर्तव्य आहे. साहित्यिक सज्जनहो, सूज्ञहो, साहित्यासाठी जीवन आहे कि जीवनासाठी साहित्य ? आपले साहित्य हे राष्ट्रीय जीवनाचे एक उपांगच काय ते असेल, तर राष्ट्रीय जीवनाचे संरक्षण हीच आपल्या साहित्याची आद्य चिंता, मुख्य साध्य असले पाहिजे. अगदी कलेसाठी कलेचा जो उपासक त्याच्याविषयीही मला आदरच वाटेल; पण असे उपासक त्या कलानंदात एखाद्या नाट्यगृहामध्ये रंगून गेले असता, जर त्या नाट्यगृहालाच आग लागली, तर कलेसाठी कलेला झिडकारून ते प्रथम जीव वाचवण्याच्या मार्गास लागतील. त्याचप्रमाणे राष्ट्राच्या प्राणावरच बेतले असता केवळ साहित्याची काय कथा ?' भारत स्वतंत्र करण्याचे श्रेय हे सशस्त्र किंवा निःशस्त्र अशा कोणत्याही पक्षाचे नसून ते गेल्या दोन पिढ्यांतील सर्व पक्षांच्या सर्व स्वदेशनिष्ठांचे सामायिक श्रेय आहे. मी तर त्याच्याही पुढे जाऊन स्वानुभवाने असे सांगतो की, सशस्त्र वा निःशस्त्र अशा कोणत्याही गुप्त वा प्रकट चळवळीत ज्यांनी सक्रिय भाग घेतला नाही; परंतु ज्यांनी ज्यांनी आपापल्या हृदयात एक सहानुभूती बाळगली आणि 'देवा, माझ्या भारताला स्वतंत्र कर' म्हणून अबोल प्रार्थना केल्या, त्या आमच्या लक्षावधी स्वदेशबांधवांनाही या राष्ट्रीय विजयाचे श्रेय त्या त्या प्रमाणात आहेच आहे. - स्वा. सावरकर, 1952कोणी हल्ला केलाच , तर मारत , मारत मरणे मला आवडेल', असे वृद्धावस्थेतही म्हणणारे स्वा. सावरकर ! श्री. पु. गोखले यांनी वृद्धावस्थेतील स्वा.सावरकरांना एकदा विचारले, ''तात्या तुमचे वय आणि ही क्षीण प्रकृती पहाता, आपण जो जांबिया जवळ ठेवता त्याचा कितपत उपयोग करू शकाल ?'' यावर सावरकर उत्तरले, ''मी थकलो आहे, माझे वयही होत आले आहे, हे सगळे खरे. इथे कोणी माझ्यावर हल्ला करेल, असा संभवही जवळजवळ नाहीच; पण हे सर्व आपण काही गृहीत कृत्ये धरून काढलेले निष्कर्ष आहेत. आपला निष्कर्ष बरोबर येत राहिला आणि आपण शस्त्रधारी राहिलो, तरी काही नुकसान होणार नाही; पण आपला तर्क चुकला तर ? स्वामी श्रद्धानंदांचा तर्क असाच चुकला होता. अब्दुल रशीदने या हिंदूंचा अंदाज चुकणार, हा अंदाज बरोबर केला होता. समज, उद्या माझ्यावर कोणी हल्ला केलाच, तर माझी प्रतिकारशक्ती कमी पडेलही. प्रतिकार कमी पडला नि मला पराभव पत्करावा लागला, तर कधीच वाईट वाटणार नाही; पण प्रतिकार न करता मी पतन पावलो, तर मला अतोनात दुःख होईल. 'झुंजत रहाणे' हे मी आयुष्यभर केलेले आहे. कोणी हल्ला केलाच, तर मारत, मारत मरणे मला आवडेल.

**कु. प्रियांका लोणे, संपर्क क्र.: 8208443401**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# उज्जैनकर फाउंडेशनचा चौदावा वर्धापन दिन उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**मुक्ताईनगर :** शिवचरण उज्जैनकर फाउंडेशन मुक्ताईनगर जिल्हा जळगाव वर्धापन दिन नुकताच विविध उपक्रमांनी आणि फाउंडेशनच्या विविध पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मान्यवरांचे उपस्थितीत आनंदात उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्येची देवता शारदा माता व आदिशक्ती संत मुक्ताईच्या प्रतिमेला मान्यवरांच्या शुभ हस्ते पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले. याप्रसंगी ज्योतीताई राणे आणि शांतारामजी कांडेलकर यांनी स्वागत गीत गायले . या प्रसंगी मान्यवरांचा गुलाब बुके व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला.

सकाळच्या सत्रामध्ये फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.शिवचरण उज्जैनकर यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक सभा संपन्न झाली . याप्रसंगी फाउंडेशनचे सचिव साहित्यिक प्रमोद पिवटे यांनी फाउंडेशनचा लेखाजोखा सादर केला व भविष्यात होणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी जळगाव जिल्हा व बुलढाणा जिल्हा दक्षता समितीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी सदस्य त्याचप्रमाणे राज्य कार्यकारिणीचे सर्व सन्माननीय पदाधिकारी विविध जिल्ह्यांचे समन्वयक यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी नवीन निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांना निवड पत्र व गुलाबपुष्प देऊन गौरवण्यात आले. फाउंडेशनला श्री तुळशीराम सदाशिव वावगे यांनी 1 लाख 25 हजाराची मदत केली होती. त्यामध्ये फाउंडेशनने गाव गाव फिरते वाचनालय या उपक्रमासाठी ओमनी गाडी खरेदी केली व त्या गाडीचे उद्घाटन सुद्धा महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध लेखिका डॉ.प्रतिमा इंगोले यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यानंतर दुपारच्या भोजनानंतरच्या सत्रामध्ये सुरुवात साखरखेर्डा येथील कवी रामदास कोरडे यांच्या कविता वाचनाने झाली. या वेळी औरंगाबाद येथील कवी ॲड सर्जेराव साळवे यांनी "देश कॅंसर मुक्त करू" व "आई" ह्या कविता सादर करुन सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यानंतर जळगाव जिल्ह्यातील व बाहेरील 35 गुणवंत शिक्षकांना तापी पूर्णा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री एस. ए. भोईसर होते . याप्रसंगी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दिनेशभाऊ पाटील, भाजपाचे सरचिटणीस विनोदभाऊ पाटील, पंचायत समिती मुक्ताईनगरचे सदस्य तथा फाउंडेशनचे सदस्य राजेंद्रभाऊ सवळे, राज्य कार्यकारिणीचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ. सतीश तराळ अमरावती, उपाध्यक्ष तथा सुप्रसिद्ध लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले पुणे, राज्यसचिव डॉ.सुभाष बागल औरंगाबाद राज्य प्रसिद्धीप्रमुख ह. भ. प. शंकर महाराज राजपूत बुलढाणा आणि ह. भ. प. राधाताई पाटील बहाद्दरपूर ता. पारोळा, राज्य संघटक श्री आनंद महाजन अमरावती, बुलढाणा जिल्हा अध्यक्ष शाहीर मनोहर पवार, सचिव शंकर अनासुने सर, बुलढाणा जिल्हा समन्वयक पांडुरंग दैवज्ञ, बुलढाणा जिल्हा संपर्कप्रमुख प्राचार्य डॉ. पंढरीनाथ शेळके, बुलढाणा जिल्हा संघटक कवी रामदास कोरडे, संघटक डॉ. निवृत्तीभाऊ जाधव, बुलढाणा जिल्हा महिला उपाध्यक्ष सौ.नलिनी वैराळ मॅडम, जळगाव जिल्हा दक्षता समितीचे संपर्कप्रमुख राजेश पोतदार, महिला संपर्कप्रमुख श्रीमती ज्योतीताई राणे, जळगाव जिल्हा



उपाध्यक्ष श्री किशोर पाटील, सचिव गणेश कोळी, जिल्हा सल्लागार मनोहर रोकडे, जिल्हा संघटक भरत साळुंखे, धाराशिव जिल्हा समन्वयक मधुकर हुजरे , छत्रपती संभाजीनगर जिल्हा संपर्कप्रमुख ॲड सर्जेराव साळवे, ठाणे जिल्हा समन्वयक रमेशभाऊ उज्जैनकर मुक्ताईनगर ,तालुका संपर्कप्रमुख डॉ. सुनील उदय, तालुका समन्वयक श्री शांताराम कांडेलकर, कार्यकारी मंडळाचे सचिव साहित्यिक प्रमोद पिवटे, खजिनदार सौ. संगीता उज्जैनकर, सदस्या सौ. जयश्री नितीन भोंबे, सदस्य प्रा. विनायक वाडेकर, सौ. सुनीता वाडेकर, सदस्य श्री सुनील मुंधोकार, निंबाजी हिवरकर, श्री शिवशंकर गोरले, पी.एम. घोगरे तसेच आजीव सभासद विविध जिल्ह्यातील फाऊंडेशनचे सर्व सन्माननीय पदाधिकारी या चौदाव्या वर्धापन दिनाच्या सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित होते.

या प्रसंगी अनेक मान्यवरांनी उज्जैनकर सर यांना पुस्तक भेट दिलीत. या सोहळ्याचे सूत्रसंचालन जळगाव जिल्हा दक्षता समितीच्या संपर्कप्रमुख श्रीमती ज्योतीताई राणे यांनी केले तर आभार कार्यकारी सदस्य प्रा. विनायक वाडेकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जळगाव राजधरशेठ सोनार, कार्यकारी मंडळाचे सदस्य सुनीलभाऊ मुंधोकार सौ. लता मुंधोकार जिल्हा सचिव गणेश कोळी सर जिल्हा दक्षता समितीचे कोषाध्यक्ष योगेश सोनार प्रकाश सोनार आजीव सभासद एन. आर. चव्हाण सर, जयवंत बोदडे सर, दिपक ठाकुर चि. सचिन उज्जैनकर आदी सर्व सन्माननीय पदाधिकाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# पत्रकाराला मारहाण करणाऱ्या माफीयांवर कारवाई करा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील फर्दापूर पोलिस ठाण्याचे अंतर्गत सपोनि भरत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सावळदबारा पोलिस चौकीत बिट जमादार मिरखॉं तडवी यांच्या कडे माफीया विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.दैनिक खोज मास्टर चे विभागीय प्रतिनिधी एजाज खान यांच्यावर रेशन माफिया वरली माफिया फिरोज कुरेशी यांच्या मुलगा ऑफरोज कुरेशी व त्याच्या मित्रांकडून जीव घेणा हल्ला करून मारहाण केली. अफरोज कुरेशी यांच्या रेशन तस्करी बाबत खोज मास्टर मध्ये वृत्त प्रकाशित झाले होते. याच अनुषंगाने साखरखेर्डा पोलीस स्टेशन अंतर्गत त्याच्यावर कारवाई सुद्धा झाली आहे. या घटनेचा वाचवा मनात ठेवून. अफरोज कुरेशी व त्याच्या मित्रांनी एजाज खान यांच्यावर जीव घेणा हल्ला केला. तसेच हात पाय तोडून जिवे मारण्याची धमकी सुद्धा दिली. पत्रकाराच्या जीवितास धोका आहे. पत्रकाराची मुस्कटदाबी करणाऱ्या रेशन व वरली माफी यावर पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा.

अन्यथा राज्यभरात पत्रकारांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडल्या जाईल याला सर्वस्वी जबाबदार पोलीस प्रशासन राहील. याची नोंद असावी. याकरिता सविनय सादर.अशे निवेदनाद्वारे सावळदबारा पोलिस चौकीला महाराष्ट्र एकलव्य आदिवासी विकास परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष जब्बार डी तडवी, भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे सोयगाव तालुका अध्यक्ष गोकुळसिंग राजपूत तथा उपसंपादक, तालुका अध्यक्ष सुनील माकोडे, शेख रहीमखॉन शेख दाऊतखॉन, जब्बार एस.तडवी उपस्थित होते.



# नीरा देवधरसाठी चार हजार कोटी मंजूर, ६० हजार हेक्टर क्षेत्राला मिळणार लाभ

## खा. रणजितसिंह निंबाळकर

आधुनिक केसरी न्यूज



**सांगोला :** पुणे, सातारा, सोलापूर जिल्ह्यांतील पिण्याबरोबर शेतीसाठी फायदेशीर ठरणाऱ्या नीरा देवघर धरणाच्या ९३ किलोमीटर लांबीचा बंदिस्त पद्धतीने (हायब्रीड पद्धतीचा) उजवा कालवा साकारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कालव्यासह तीन उपसा सिंचन योजनांच्या कामांसाठी ३ हजार ९७६ कोटी रुपयांच्या तिसऱ्या सुधारित प्रशासकीय प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली. त्यामुळे सुमारे ६० हजार हेक्टर क्षेत्रास लाभ होणार आहे. नीरा देवघर धरणाचा उजव्या कालव्याचे ६५ किलोमीटरचे काम पूर्ण झाले आहे. त्यानंतर सुमारे १५८ किलोमीटरपर्यंत काम पूर्ण करण्याचे जलसंपदा विभागाचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे ९३ किलोमीटर लांबीचा उर्वरित कालवा हायब्रीड पद्धतीने अर्थात पाइपलाइन पद्धतीने विकसित केला जाणार असल्याची माहिती खा. रणजितसिंह निंबाळकर यांनी दिली. कृष्णा भीमा स्थिरीकरण, सांगोला उपसा सिंचन योजना, नीरा देवघर, जीहे कठापूर या सिंचन योजना पूर्णत्वास आणण्यासाठी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार शहाजीबापू पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांचा पाठपुरावा सुरू आहे. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर खासदार झाल्यानंतर नीरा उजवा कालव्याचे बारामतीला पळवलेले पाणी खा.रणजितसिंह निंबाळकर यांनी आणून ते फलटण, पंढरपूर, माण, माळशिरस आणि सांगोल्याला दिले. त्यानंतर पाणी पळवल्यावरून खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी थेट बारामतीकरांनाच आव्हान दिले होते. त्यानंतर खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नीरा देवधर, कृष्णा भीमा स्थिरीकरण, सांगोला उपसा सिंचन योजना, जीहे कठापूर या सिंचन योजना पूर्णत्वास आणण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. दरम्यान ठाकरे सरकार सत्तेत आल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी पुन्हा निरा योजनेचे पाणी बारामतीला वळवले. त्यानंतर सत्तांतर होताच खासदार रणजितसिंह निंबाळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करून नीरा देवधर, कृष्णा भीमा स्थिरीकरण योजनेसह इतर सिंचन योजना पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून जलसंपदा विभाग, सार्वजनिक बांधकाम आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या २०२२-२३ च्या दरसूचीच्या आधारे तीन हजार ९७६ कोटी ८३ लाख रुपये किमतीच्या सुधारित प्रस्तावाला मंत्रीमंडळाने मान्यता दिली. या प्रकल्पामुळे भोर तालुक्यातील ६ हजार ६७० हेक्टर, सातारा जिल्हातील अवर्षण प्रवण खंडाळा तालुक्यातील ११ हजार ८६० हेक्टर व फलटण तालुक्यातील १३ हजार ५५० हेक्टर तसेच सोलापूर जिल्हातील माळशिरस तालुक्यातील १० हजार ९७० हेक्टर असे तसेच अन्य असे एकूण ४३ हजार ५० हेक्टर क्षेत्रास प्रवाही व उपसा पद्धतीने सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र Business Katta












# व्याख्याते, प्रवचनकार यांच्यासाठी उपयुक्त ग्रंथ 'चंद्रामृत'

आधुनिक केसरी

**सुप्रसिद्ध प्रवचनकार, कीर्तनकार ह.भ.प. डॉ. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांच्या सिद्धहस्त आणि चतुरस्त्र लेखणीतून साकारलेले एक निर्व्याज मनोरम पुस्तक म्हणजे चंद्रामृत भाग १. डॉ. शास्त्रींची अनेक व्याख्याने, प्रवचने सातत्याने होत असतात. तसेच अनेक वृत्तपत्रांमधून आणि समाज माध्यमात देखील ते सातत्याने लेखन करतात. या व्याख्याने, प्रवचने आणि लेख यांच्यावर आधारित पुस्तक म्हणजे चंद्रामृत भाग १होय. या पुस्तकात विविध विषयांवरील शास्त्रीजींचे लेख आणि मुलाखत यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यांचा थोडक्यात सारांश असा की, वैदिकसाहित्यातील गौ-वर्णन : हिंदु संस्कृतीमध्ये गायीचे महत्व असाधारण आहे. पुराणांमध्ये पृथ्वीचे देखील धेनुरूपात वर्णन करण्यात आले आहे. वेदातही अनेक ठिकाणी गायींचे वर्णन आहे.**

उपनिषदांतही गायींचे वर्णन येते. हिंदु संस्कृतीतील अनेक सण-उत्सव यांत गोवंशाचे महत्व आहे. 'गो-ग्रास' म्हणजे गायीचा घास हा तर हिंदुसमाजाच्या दैनंदिन जीवनाचा भाग आहे. आजही अनेक घरांमध्ये दररोज स्वयंपाक करताना गो-ग्रास तयार केला जातो. वैदिकसाहित्यात विविध ठिकाणी आलेल्या गोमातेच्या वर्णनाचा आढावा यात आहे.

महाकवी कालिदासाविषयी......!

कोणत्याही भाषेच्या श्रीमंतीचा विचार करताना त्या भाषेचे व्याकरण, उच्चारणशास्त्र, दर्शनादि तत्त्वज्ञानपरक ग्रंथ, काव्य-नाटकादि साहित्य ग्रंथ, समीक्षा ग्रंथ यांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते. या सर्वच क्षेत्रात संस्कृतशारदेने भव्यतेचे सिंहासन आणि दिव्यत्वाचे नितांत सुंदर रूप धारण केल्याचे दिसून येते. वाल्मिकी, व्यासादि ऋषी, महाकवी भास, बाणभट्टासारखे साहित्यिक, बादरायण, शंकराचार्य यांसारखे तत्त्वज्ञ, आर्य चाणक्य, चरक, भरतमुनी यांसारखे शास्त्रकार, पाणिनी सारखे व्याकरण व उच्चारशास्त्राचे ज्ञाते अशी या संस्कृत सारस्वतांची मांदियाळी आहे. यातीलच एक विश्वप्रसिद्ध अभिधान म्हणजे कविकुलगुरु महाकवी कालिदास. महाकवी कालीदासाविषयी संग्रहणीय माहिती या लेखात वाचकांना ओघवत्या भाषेत प्राप्त होते.

लोकमान्यांना अभिप्रेत कर्मयोगाची प्रासंगिकता

गीतारहस्याच्या चौदाव्या प्रकरणात लोकमान्य स्पष्ट करतात की, ''कर्मे करीत असताना अध्यात्मविचाराने किंवा भक्तीने सर्वात्मैक्यरूप साम्यबुद्धि पूणपणे संपादन करणे व ती प्राप्त झाल्यावरही संन्यास घेण्याच्या भरीस न पडता संसारात शास्त्रतः प्राप्त झालेली सर्व कर्मे केवळ कर्तव्य म्हणून नेहमी करीत राहणे हाच या जगांत माणसाचा परम पुरुषार्थ किंवा आयुष्यक्रमणाचा उत्तम मार्ग होय, असे भगवद्गीतेत प्रतिपादन केले आहे.'' लोकमान्य टिळकांच्या गीता रहस्यातील या विवेचनाविषयी प्रस्तुत लेखात कथन केलेले आहे.

तुम्हाला जिंकायचं असेल तर......

आपण एक ध्येय ठरवतो. त्या ध्येयासाठी स्वतःला झोकून देतो. पण जीवन जगताना केवळ एक ध्येय म्हणजे सर्व काही असते का? तर नाही. आपल्या जीवनाचे अनेक पैलू असतात. वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक अशा स्तरांवर आपण जीवन जगत असतो. यातील प्रत्येक पैलू तितकाच महत्वाचा आहे. त्यामुळे जीवनात एका पेक्षा अधिक ध्येये, उद्दिष्टे असू शकतात. आर्थिक, शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असते. या स्थितीत जिंकण्यासाठी काय केले पाहिजे, याचे सुंदर वर्णन या लेखात आहे.

यशस्वी होण्यासाठी ह्या चार गोष्टी ध्यानी ठेवा.

आपल्यापैकी प्रत्येकालाच यशस्वी व्हायला आवडतं. यशस्वी होण्यासाठी वयाचे बंधन नसते. यशाची संकल्पना मात्र स्थळ, काळ, स्थिती,वय या नुसार बदलू शकते. काही लोक जगण्यासाठी जिंकत असतात. काही लोक जिंकण्यासाठी जगत असतात. तर काही लोकांसाठी जगणं हेच जिंकणं असतं. कधी कधी एकाच व्यक्तीच्या आयुष्यात देखील या सर्व स्थिती अनुभवाला आलेल्या असू शकतात. यशश्री प्राप्त करण्याविषयीचे नितांत सुंदर वर्णन या लेखात आहे. आपलं कार्यक्षेत्र आपलं प्रभावक्षेत्र झालं पाहिजे...! जगातील कोणतेही कार्यक्षेत्र श्रेष्ठ अश्रेष्ठ अशी विभागणी करणे चूक आहे. तर आपण आपला प्रभाव आपल्या कार्यक्षेत्रात निर्माण केले पाहिजे. आपले कार्यक्षेत्र आपले प्रभावक्षेत्र व्हावे, यासाठी ध्यानी ठेवाव्या अशा काही गोष्टी या लेखात कथन केल्या आहेत. संत विचारांतून मानसिक आरोग्य

संतांच्या प्रत्येक शब्दात, अक्षरात, उकारादि मात्रांतही एक विचार असतो. माणसांचे कल्याण व्हावे, त्याचे आधिभौतिक, आधिदैविक आणि आध्यात्मिक अशा तीनही तापांची शांती व्हावी, यासाठी "बुडत हे जन देखवेना डोळा|" किंवा "ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभेविण प्रीती।।" या भूमिकेतून संतांनी लोकप्रबोधन केले आहे. या विषयीचे कथन प्रस्तुत लेखात आहे. ॐ पार्थाय प्रतिबोधिताम्|

श्रीमद्भगवद्गीता जयंती निमित्त संस्कृत भारती द्वारे आयोजित शास्त्रीजींच्या संस्कृत प्रवचनाचा सारांश या लेखात आहे.

चला, कमी राजकीय होऊ या......

दैनंदिन जीवनात आपण आवश्यकतेपेक्षा अधिक राजकीय विचार करतो आहोत का? राजकीय हा जीवनाचा एक पैलू आहे. जीवनात सांस्कृतिक, सामाजिक, मानसिक, आध्यात्मिक




असे अनेक पैलू आहेत. याबद्दल विचार प्रवर्तक असा हा लेख आहे. संस्कृतात लेखन होणे आवश्यक

संस्कृतविषयी बोलताना संस्कृतात आधुनिक काळात लिहिलं जात नाही, असा आक्षेप एका व्यक्तीने घेतला. शास्त्रीजींनी समोरच्या व्यक्तीला आपण कृतीतून उत्तर द्यायचं असं ठरवलं. आणि अक्षरशः वृत्तबद्ध अशा संस्कृत श्लोकांची रचना करण्यास प्रारंभ केला. आज सहस्रावधी श्लोक रचना शास्त्रीजींनी केल्या आहेत. डॉ. शास्त्रीजी रचित "श्रीरेणुकाशरणम्" हे संस्कृत काव्य शॉपिजेन प्रकाशन, अहमदाबाद यांचे द्वारे प्रकाशित करण्यात येत आहे, तसेच नुकतेच त्यांचा संस्कृतच्या क्षेत्रातील प्रतिष्ठेचा असा प्रज्ञाभारती स्मृती पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला, त्या निमित्त ही खास मुलाखत घेण्यात आली होती. या मुलाखतीचाही समावेश प्रस्तुत पुस्तकात आहे.

अर्थातच हे पुस्तक वाचताना देखील आपण शास्त्रीजींचे व्याख्यान ऐकत आहोत, असे वाटते, इतके हे लिखाण प्रभावी आणि सहजतापूर्ण आहे. संस्कृत अध्यापिका आणि अभिज्ञान, पुणे च्या संचालिका सौ. मानसी चंद्रहास शास्त्री सोनपेठकर यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक ऋचा पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले आहेत.

चंद्रहास शास्त्री यांच्या अमृततुल्य शब्दांनी ओथंबलेले हे चंद्रामृत रसिकांना नक्कीच आवडेल.

**सौ. रोहिणी पांडे**

**चंद्रामृत भाग १**
**शॉपिजेन प्रकाशन, अहमदाबाद**
**पृष्ठे ६१**
**किंमत १५०**

# उद्धव ठाकरेंच्या हाती मध्यावधीचे गाजर, संजय राऊतांच्या हाती तुणतुणं, तर शरद पवारांच्या तोंडी नकार

आधुनिक केसरी



राम कुलकर्णी,
भाजपा राज्य प्रवक्ता
संपर्क 9422742577


**रणांगणावर एखादं युद्ध आपण हरतोय हे लक्षात आल्यानंतरही सेनापती अवसानगलितगात्र होवुन देखील शिल्लक राहिलेल्या सैन्यात लढण्यासाठी बळ भरण्याची भाषा तोंडी बोलतो तसंच काही राजकारणाच्या रणांगणावर राज्यात पहायला मिळतंय. खा.संजय राऊतांनी डिसेंबरमध्ये सांगताना शिंदे-फडणवीस सरकार फेब्रुवारीमध्ये जाणार असं भविष्य सांगुन ठेवलं होतं. तो दावा सबसेल खोटा ठरताना फेब्रुवारीच्याच सरत असलेल्या आठवड्यात दस्तुरखुद्द उद्धव ठाकरेंनी मध्यावधी निवडणुकीचं गाजर हातात घेवुन संकेत बोलुन दाखवले. नेहमीप्रमाणे तुणतुणं वाजवताना संजय राऊतदेखील ठाकरे बोलले ते खरंच असल्याचे सांगुन गेले. एकीकडे असं घडत असताना दुसरीकडे नेहमीप्रमाणे ठाकरेंनी वर्तवलेला अंदाज परतुन लावण्याचे काम शरदचंद्र पवारांनी करत मध्यावधी होणारच नसल्याचे ठणकावुन सांगितले. निवडणुक आयोगाचा निकाल आल्यानंतर उद्धव ठाकरेंची भविष्यवाणी कदाचित राहिलेले कार्यकर्ते बाहेर पडू नयेत म्हणून बळ भरण्यासाठी मध्यावधीचं गाजर हाती घेतल्याची चर्चा राजकिय वर्तुळात होताना दिसते. राजकारणात गंमती जमती नेहमीच घडतात. प्रत्येक पक्षाचा नेता भविष्यवाणीची भाषा बोलतो विशेषत: विरोधी पक्षात काम करणारा प्रमुख नेता तर निवडणुकीचे भविष्य नेहमीच सांगत चलतो. निवडणुका होणार?सरकार पडणार?, अगदी महिन्यासह तारीख,वार लिहुनसुद्धा काही महाभाग जेव्हा सांगतात आणि अंदाज सबशेल खोटे ठरतात तेव्हा हे नक्की म्हणावं पक्षावर आलेले संकट आणि कार्यकर्ते थोपवुन ठेवण्यासाठी संभ्रमाची भाषा करून आशावादाचं बळ भरण्याची ही एक कला समजावी लागेल.**

मागच्या आठवड्यात निवडणुक आयोगाने ठाकरे गटाला धनुष्य बाण नाही ना पक्षाचं नावही नाही. अगदी निःशस्त्र झालेले उद्धव ठाकरे यांनी काल एक संभ्रमीत राजकिय बॉंब सहज फेकुन दिला. मध्यावधी निवडणुकीचे गाजर हातात घेवुन कार्यकर्त्यांना जगण्याचे बळ देताना किंवा आहे ते अस्तित्व टिकवुन ठेवण्यासाठी नाट्यमय भविष्यवाणी करून टाकली. काय तर म्हणे मध्यावधी निवडणुका होणार? तुणतुणं पुढे वाजवताना राऊतांनी उद्धवजी बोलले ते अगदी खरं म्हणत मध्यावधीचं गाजर पुन्हा कार्यकर्त्यांच्या अंगावर फेकलं. गंमत बघा, डिसेंबरमध्ये याच राऊतांनी शिंदे-फडणवीस सरकार फेब्रुवारी महिन्यात पडण्याची भविष्यावाणी केली होती. त्यांच्याप्रमाणे अजुन एक राष्ट्रवादी पक्षात राजकिय भविष्य सांगण्याचा धंदा हाती घेतलेल आ.अमोल मिटकरींनी देखील भविष्य ज्ञान पाजळुन हे सरकार फेब्रुवारी महिन्यात कोसळण्याचं भविष्य बोलुन दाखवलं होतं.अर्थात काही तरी वेग बोलायचा, रोज माध्यमात चर्चेत रहायचं आणि आपलं अस्तित्व जगावेगळं दाखवायचं ही सवय राऊतांसह मिटकरींच्या अलीकडे जास्तच अंगवळणी पडली तो भाग वेगळा.फेब्रुवारीमध्ये सरकार तर गेलं नाही पण शिंदे-फडणवीस सरकार शिल्लक राहिलेला कालावधी मजबुतपणे पार पडेल असा एक निर्णय आला तो म्हणजे निवडणुक आयोगाने धनुष्य बाणासह पक्षाचे नाव शिंदे गटाला दिले. अर्थात या कायद्याच्या चौकटीत बसुन दिलेला निकाल जो निकाल विरोधकांना विशेषतः संजय राऊतांना मान्यच नाही. पण न्याय संस्था, स्वायत्त संस्था यांना कुणाच्या तरी अधिन असल्याचे म्हणणं हा देखील संविधानाचा नैतिकदृष्ट्या फार मोठा अपमान म्हणावा लागेल. आपला मुळ विषय मध्यावधी खरंच होतील का? आणि ठाकरे भविष्य खरं ठरणार का? गंमत बघा, कुठलंही कारण मध्यावधी निवडणुकीचं निश्चित नाही.

शिंदे-फडणवीस सरकारनं मागच्या आठ महिन्यात धाड धाड घेतलेले निर्णय लोक कल्याणाचे आणुन विकासाचा मार्ग मध्यंतरी जो खुंटला तो खऱ्या अर्थाने आता वेगाने पुढे जाताना दिसतो. राज्य सरकार उरलेला कालावधी 100 टक्के पुर्ण करेल यात शंका नाही. एक गोष्ट निश्चित म्हणावी लागेल निवडणुक आयोगाने निकाल जाहिर दिल्यापासुन ठाकरे गटाची अस्वस्थता जास्त वाढली. शिवसेना नेमकी कुणाची? हे आता कायद्याने स्पष्ट झालं. त्यामुळे अस्वस्थ असलेले लोक कदाचित शिंदे गटाच्या शिवसेनेत जावु शकतील आणि त्या प्रवासाची सुरूवातही आहे. आपल्याला सोडुन कुणी जावु नये? या भीतीपोटी मध्यावधीची शक्यता व्यक्त करणं म्हणजे कार्यकर्ता थोपवुन ठेवणं यापेक्षा दुसरं कुठलंही कारण नाही. उद्धव ठाकरेंनी कोणतंही भविष्य सांगितलं तर त्याला नकार देण्याची हिंमत शरदचंद्रजी पवार यांच्यात असु शकते. संजय राऊत नकार तर सोडा त्यांचं तुणतुणं पुढं वाजवल्याशिवाय रहात नाहीत. अगदी मध्यावधी शक्यता उद्धवजी बोलले ते खरं असं त्यांनी माध्यमांना सांगितलं. या सर्व खेळामध्ये राजकिय गंमत म्हणजे शरदचंद्रजी पवार यांनी मध्यावधीच्या निवडणुकी संदर्भात







नकारात्मक दिलेले उत्तर. मुळात ठाकरे यांच्या अनेक भुमिकेशी पवार हे कधीच सहमत रहाताना दिसत नाहीत. उद्धवजी एक बोलल्यानंतर त्याचा दुसरा अर्थ पवारांनी नेहमीच काढलेला याचाच अर्थ आम्ही उद्धवजी ठाकरे यांच्या पावलावर पाऊल ठेवत महाविकास आघाडीत काम करत नाहीत हे दस्तुरखुद्द शरदचंद्र पवारांनी दाखवुन दिलं. ते म्हणाले, उद्धवजीचा अभ्यास या संदर्भातला वेगळा असु शकतो पण मध्यावधीची शक्यता मुळीच नाही.त्याचं कारण पवारांना देखील शिंदे-फडणवीस सरकार आपला कार्यकाळ निश्चित पुर्ण करेल असं वाटतं. कारण केवळ बहुमत नाही तर 170 आमदारांचा पाठिंबा सत्ताधाऱ्यांना असुन वेळ पडली तर महाविकास आघाडीतले इतर पक्षाचे आमदार शिंदे-फडणवीस गटांसोबत फुटुन येवु शकतात हे सत्य कुणीच नाकारू शकत नाही. एक गोष्ट खरी आहे लोकसभेच्या निवडणुकीसोबत विधानसभेच्या निवडणुका हा निर्णय केंद्राच्या हातात असुन तशी शिफारस झाली तर मग थोडं फार खाली वर होवु शकतं. पण मध्यावधी निवडणुका हे केवळ कार्यकर्त्यांचा फुटलेला बांध बुजवण्यासाठी दाखवलेलं गाजर नक्कीच म्हणावे लागेल. ठाकरे गट महाविकास आघाडीसोबत असला तरी मध्यंतरी त्यांनी डॉ.प्रकाश आंबेडकरांना सोबत घेवुन निर्माण केलेला संभ्रम ज्यामुळे कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी संभ्रमात पडली.

आता पुन्हा राजकिय जीव वाचवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी दिल्ली गाठत आप पक्षाचे संस्थापक दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना मातोश्रीवर बोलावुन जणु काही आम्हाला वाचवा अशाच प्रकारची क्षमायाचना केली की काय? अरविंद केजरीवाल शिवसेनेच्या सोबत आले तर कॉंग्रेस पक्षाला ते मान्य होणार का? देशाच्या राजकारणात 2024 नंतरही विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याच नेतृत्वाचा 400 पार सुर्य उगवल्याशिवाय रहाणार नाही याची खात्री शरदचंद्रजी पवार यांच्यासह ममता बॅनर्जी, नितीशकुमार, लालुप्रसाद यादव अगदीच म्हटलं तर समाजवादी पक्षासह ओवेसींना देखील पटलेली आहे. मोदी हाटवण्यासाठी एकत्र येण्याची भाषा नाममात्र म्हणावी लागेल. त्यापेक्षा प्रत्येकाला आपलं अस्तित्व टिकवण्यासाठी गरज वाटते. 2019 नंतरच देशाला विरोधी पक्ष नेता देखील मिळेल एवढं अस्तित्व कॉंग्रेसला देखील ठेवता आलं नाही. 2024 साठी मोदी नेतृत्वाने लढाईचं मैदान मजबुत केलं असुन एकच समस्त देशवासियांच्या अस्मितेचा प्रश्न प्रभु रामचंद्र मंदिर उभारणी एवढेच नव्हे तर 370 कलम ज्यातुन राष्ट्रभक्ती आणि देश संरक्षण असे अनेक महत्वपुर्ण केंद्र सरकारची कामगिरी मोदी म्हणजे केवळ गरिबांचं कल्याण हे समीकरण देशवासियांच्या डोळ्यासमोर घट्ट होवुन बसलं. असो. मध्यावधीचं गाजर ठाकरेंच्या हाती तर पवारांनी गाजर धुडकावुन लावताना शक्यता फेटाळुन लावली याचाच अर्थ कुठलाही सुसंवाद महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यामध्येच नाही असं म्हणावे लागेल.

# आंबेडकरी कथा, कादंबरी सद्यस्थिती आणि जबाबदारी



किरण डोंगरदिवे
संपर्क क्र. 7588565576

आधुनिक केसरी

**डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणीमुळे दलित समाज जागृत झाला. आपल्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला जाहीरपणे प्रकट करू लागला. या संपूर्ण विश्वातील सर्वश्रेष्ठ वाचक अभ्यासक आणि ग्रंथप्रेमी म्हणून ज्यांची ओळख आहे आणि ज्यांच्या ग्रंथाचा आधार घेऊन अर्ध्या मानव जातीचे जीवन सुकर झाले आहे त्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना आज पर्यंत कोणत्याही सारस्वताने साहित्यिक म्हणून उल्लेख केलेला नाही. बुद्ध आणि त्याचा धम्म हा नितांत सुंदर चरित्र ग्रंथ असो वा वेटिंग फॉर वीजा या इंग्रजी मध्ये त्यांनी लिहिलेले स्वतःचे आत्मकथन जे पुढे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे आत्मकथा या नावाने मराठीत शंकरराव खरात यांनी संपादित केलेले आढळते.**

हे दोन्ही ग्रंथ आत्मकथन आणि चरित्र लेखन या दोन्ही पातळीवर सर्वोत्कृष्ट आहेत असे असले तरी बाबासाहेबांना साहित्यिकाचा दर्जा न देण्यात व्यवस्थेने आपले पूर्ण कसब पणाला लावले. मात्र बाबासाहेबांच्या विचारधारेला समर्पित असलेली लेखणी मराठी साहित्याचा आत्मा ठरली. दलित साहित्य आणि परिवर्तनवादी साहित्य विद्रोही साहित्य अशा वेगवेगळ्या नावाने आंबेडकरी साहित्याचा वावर साहित्य क्षेत्रात होऊ लागला. आंबेडकरी साहित्यातून समाजाला परिवर्तनाची दिशा दाखवणे आणि आंबेडकरी समाजाला सोसावी लागणारी अन्याय अत्याचाराची जाणीव चितारून समाजात परिवर्तनाचा जरा प्रवाहित करण्याचे काम आंबेडकरी साहित्याने प्रभावीपणे केले. आंबेडकरी साहित्यात सर्वात महत्त्वाच्या अनुषंगाने विचार केला जातो तो दलित आत्मकथनांचा, ही दलित आत्मकथने म्हणजे त्या निर्मितीच्या चरित्र नायकांची आत्मकथनात्मक कादंबरी आहे असे मला वाटते. प्र ई सोनकांबळे यांचे आठवणीचे पक्षी, दया पवार ह्यांचे बलुत यांचा विचार करत असतानाच उर्मिला पवार यांचे आयदान तसेच शांताबाई कांबळे यांचे माझ्या जन्माची चित्तरकथा ह्या आत्मकथनात्मक कादंबऱ्यातील संघर्ष जितका वास्तवाच्या जवळ होता तितकाच तो विदारक सुद्धा होता. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर समाज जीवनात मोठ्या प्रमाणात वेगवेगळी स्थित्यंतरे घडून आली. साहित्यिक विद्रोहाची भाषा बोलू लागले. कादंबरी आणि कथा यातून आंबेडकरी साहित्याची धार तेज करण्याचे काम आंबेडकरी साहित्यिक मोठ्या प्रमाणात करू लागले. सातत्याने विद्रोहाचा मंत्र जपणारे नामदेव ढसाळ कवितेच्या कक्षेतून बाहेर येत निगेटिव्ह स्पेस, हाडकी हाडवळा, उजेडाची काळी दुनिया या कादंबऱ्यातून व्यक्त झाले तर आपल्या कवितेतून विद्रोहाचा ज्वालामुखी पेरणारे आदरणीय यशवंत मनोहर यांनी सुद्धा कादंबऱ्यातून आंबेडकरी कादंबरीला वेगवान केले आहे. रमाई, मी सावित्री जोतीबा फुले, मी यशोधरा या कादंबऱ्यातून बहुजन महानायिकांना मराठी वाचकांच्या समीप आणण्याचे महत्त्वाचे कार्य आदरणीय सरांनी केले आहे. शंकरराव खरात गावाचा टिनपोल गुरुजी, गावशिव, झोपडपट्टी, फूटपाथ नंबर एक, माझं नाव, हातभट्टी अशा महत्त्वाच्या कादंबऱ्या मधून आंबेडकरी चळवळीचे धागेदोरे आणि संघर्ष सूत्र दिसून येतात. आंबेडकरी जनतेचे जीवन अतिशय जवळून जाणून घ्यायचे झाल्यास शंकरराव खरात यांच्या कादंबऱ्या वाचणे गरजेच आहे असं मला वाटतं. बाबुराव बागुल यांच्या कादंबऱ्यातील आंबेडकरी समाजाचे जीवन आणि संघर्ष आपल्यापैकी अनेकांनी भोगल आहे. म्हणूनच अनिष्ट रूढी परंपरा, व्यवस्थेचे फटकारे अन्याय अत्याचार आणि आंबेडकरी विचारसरणी यांची
पेरणी त्यांच्या अघोरी, अपूर्वा, कोंडी, पावशा, भूमिहीन, मूकनायक, सरदार, या कादंबऱ्यात दिसून येते मात्र आपण बहुतांश वेळी त्यांच्या सूड या एकाच कादंबरी पुरते त्यांना गृहीत धरतो. आंबेडकरेतर समाजातील प्रभावी अशा आंबेडकरी साहित्यात त्यांचा समावेश करता येईल अशा काही कादंबऱ्या म्हणजे विभावरी शिरूरकर यांची बळी, ग त्र्यं माडखोलकर यांच्या चंदनवाडी, दोन मने, ना सी फडके यांची प्रतिज्ञा अशा कादंबऱ्यातून तसेच श्री म माटे यांच्या उपेक्षितांचे अंतरंग या कादंबऱ्यातून दलितभान दिसून आले त्याच्या पुढील टप्प्यावर अरुण साधू यांच्या बहिष्कृत आणि शापित सारख्या कादंबऱ्यातून आंबेडकरी कथानायक सक्षमपणे उभे राहिलेले दिसून येतात. जग बदल घालून घाव, मला सांगून गेले भीमराव अशा शब्दात बाबासाहेबांना गुरुस्थानी म्हणणाऱ्या अण्णा भाऊ साठे यांच्या कथा कादंबऱ्यातील नायक बहुतांश वेळी रामोशी किंवा मातंग समाजाचा असला तरी त्यांचे जीवनशैली जीवन संघर्ष हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारधारेने प्रेरित झालेला असतो हे आवर्जून नमूद करावसे वाटते. अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल, योगीराज वाघमारे केशव मेश्राम वामन होवाळ अविनाश डोळस माधव कोंडविलकर, बाबुराव बागुल, शंकरराव खरात, या कथाकारांचा आंबेडकरी साहित्यात सिंहाचा वाटा आहे. भास्कर चंदनशिव यांचे कथासूत्र सुद्धा डॉक्टर आंबेडकरांच्या विचारधारेला समांतर चालताना दिसते. भास्कर चंदनशिव यांच्या कथेप्रमाणे वर उल्लेखलेल्या सर्वच कथाकाराच्या कथांमध्ये जाती संघर्ष आणि वर्ग संघर्ष आहे. समाजातील तुलनात्मक उच्चता, समाजातील जातिव्यवस्था, त्यातील संघर्ष आणि त्याचा प्रतिकार यांची कथाबीज घेऊनच या कथा आकारास आल्याचे दिसून येते. 1960 पासून 1990- 95 पर्यंत प्रभावीपणे आणि ठळकपणे दिसणारी आंबेडकरी कादंबरी आणि आंबेडकरी कथा अचानकच अभावाने येताना दिसू लागली. साधारण मागील दहा वर्षापासून रा शे साळुंखे यांची चकवा ही दलित जाणीवांना अधोरेखित करणारी कादंबरी आणि झुम्बारा बिगार हा दलित जाणिवेचा कथासंग्रह, प्रसेनजीत गायकवाड ह्यांचा झुंडीमुंडी, विद्याधर बनसोड , विलास सिंदगीकर विलास सिंदगीकर ह्यांच्या भूकबळी, गारपीठ, उतरंड, रक्त आणि भाकर, बाजार इत्यादी कथासंग्रहातून शहरी आणि ग्रामीण आंबेडकरी जनतेचे जनजीवन समोर येते. बुलढाणा जिल्ह्यातील विजयलक्ष्मी वानखेडे यांची दिशादर्शक बोट आणि रमेश सरकटे आयपीएस या कादंबऱ्यातील आंबेडकरी विचारसरणीने प्रेरित झालेले पात्रे आंबेडकरी कथा कादंबरी ह्या प्रांतात थोड्याफार प्रमाणात दिसत असल्याचे समाधान असले आंबेडकरी कथा आणि कादंबरी फार अभावाने येताना दिसते. याची कारण मीमांसा शोधत असताना दलित आणि सवर्ण यातील संघर्ष असल्याने किंवा वर्तमान पिढीतील लिहिते हातामागे असलेल्या मनांना जातीयतेचे दाहक अनुभव नसल्याने किंवा आधुनिक जगात विविध विषयांची क्षितिज त्यांना खुणावत असल्याने त्यांच्या साहित्यातील दलित संघर्ष धार प्रभावीपणे दिसत नाही. मात्र रमाई नगर हत्याकांड, खैरलांजी हत्याकांड अगदी काल परवा एका सवर्ण शिक्षकाने दलित मुलाचा ग्लासभर पाण्यासाठी डोळा फोडणे असे अनुभव वर्तमान पिढीतील आंबेडकरवादी कथा आणि कादंबरी लेखकाच्या लिखाणाचे विषय का होत नाहीत याबाबत विचार करणें गरजेचे आहे. एखादया अभिनेत्रीच्या मृत्यू बाबत अधिवेशनात 15 आमदार एकावेळी भाष्य करत असतात, स्वतःच्या जीवनाशी संघर्ष करून हार पत्करणाऱ्या अभिनेत्याच्या आत्महत्या बद्दल दोन वर्षापर्यंत चर्चा रंगतात मात्र निरपराध बहुजन समाजातील हत्याकांड शक्य तितक्या लवकर विसरले जाते हे आपण पाहत असतो मात्र आपले लेखणी सुद्धा आपल्याप्रमाणे मौन धारण करून बसलेली असते हे चित्र आंबेडकरी साहित्यासाठी नक्कीच पोषक नाही. मागील दहा-बारा वर्षात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती, महापरिनिर्वाण दिवस आणि धम्म प्रवर्तन दिनानिमित्त एखादी कविता केली ती एखाद्या तुडुक मुडुक नियतकालिका आता प्रकाशित झाली किंवा आम्ही शिलेदार बाबांचे, किंवा निळ रक्त अशा व्हाट्सअप ग्रुप मध्ये प्रकाशित केली की आपण पक्के आंबेडकरवादी आणि बाबासाहेबांच्या विचाराचे पाईक झालो या भ्रमातून बाहेर येण्याची गरज निर्माण झाली आहे. आंबेडकरी कथा आणि कादंबरी यांची वर्तमान काळात जी भूमिका आहे ती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला पोषक असली पाहिजे इतक्यावर न थांबता आंबेडकरी कथा कादंबरी यांनीच नव्हे तर संपूर्ण आंबेडकरी साहित्याने आणि साहित्यिकांनी आपली नैतिक जबाबदारी म्हणून भारताच्या संविधानाचे जतन केले पाहिजे. संविधान बचाव या घोषणा किंवा संविधान बचाव मोहिमेचे ऐवजी संविधान जागृती मोहिमेची जास्त गरज आहे याचे भान ठेवून आपल्या साहित्यात, कथेत, कादंबरीत संविधान तत्वाचा गौरव करून फक्त आंबेडकरी समाज नव्हे तर संपूर्ण भारतीय नागरिकांच्या घराघरात आणि मनामनात संविधानाचे मूलतत्वे पोहोचविले पाहिजे. जेव्हा भारतीयांच्या मनामनात खऱ्या अर्थाने संविधानाची तत्वे आणि जाणीव पोहोचेल तेव्हा संविधान हे फक्त आपल्या धर्म नायकाने लिहिले म्हणून आपण त्याच्या रक्षणाचा नादघोष केला पाहिजे हे चित्र बदलून भारतातील प्रत्येक नागरिक हे संविधान आमचे आहे आमच्या भल्यासाठी आहे या विचाराने प्रेरित होऊन संविधानातत्वावर चालू लागेल. त्यानंतर कोणीही संविधान बदलण्याबद्दल बोलणार नाही. थोडक्यात माझ्या मते आंबेडकरी कथा कादंबरी यांची वर्तमान काळातील जबाबदारी संविधानाची तत्वे भारतीयांच्या मनापर्यंत पोहोचवणे हे ध्येय असले पाहिजेत. तसेच जेष्ठ विचारवंत अर्जुन डांगळे ह्यांनी दलित साहित्याबद्दल व्यक्त केलेल्या अपेक्षेत दलित ऐवजी आंबेडकरी असा शब्द वापरून या चळवळीळीतले बळ कायम टिकवून धरायचे असेल ती जोमाने वाढवायची असेल तर काही जबाबदाऱ्या आपल्यावर येतात त्या म्हणजे, दलित आणि आंबेडकरी साहित्याच्या नावाखाली अनेकदा निव्वळ आक्रस्ताळेपणा, आक्रोश ह्या सोबत सातत्याने रडकथा आणि अन्याय अत्याचाराच्या कथा मांडल्या जातात. सुडाची भाषा बोलली जाते. हा प्रकार थांबून बाबासाहेबांनी दिलेला बुद्ध धर्मातील अत्त दीप भव ह्या उक्तीने आपली वाटचाल सुरू राहिली पाहयला हवे. यशवंत मनोहर यांच्या निवासस्थानी साधारणपणे एक वर्षांपूर्वी माझ्याशी बोलताना म्हणाले होते बेटा, मी कुठलाही आक्रस्तळेपणा केला नाही किंवा कुणालाही बदल असे म्हंटले नाही, मी फक्त लेखन करत गेलो जसे लिहिले तसे जगलो आणि जसा जगलो तसे लिहिले हे पाहून माझ्या संपर्कातील लोक आपोआप बदलले आंबेडकरी साहित्याची चळवळ ही केवळ बौद्धांचीच न राहता तिची व्यापकता वाढायला हवी. ही व्यापकता वाढवताना अनेकदा बौद्ध तर लेखकांच्या साहित्याला आपण आंबेडकरी साहित्य म्हणून का स्वीकारत नाही ? असा प्रश्न उपस्थित होतो. मला वाटते विश्वास पाटलांच्या झाडाझडती या कादंबरीतील बौद्ध समाजाच्या वसंता खैरमोडे गुरुजीचे पात्र ज्या ताकतीने लेखकाने उभे केले आहे त्याचा विचार करता झाडाझडती ही सुद्धा माझ्या दृष्टीने आंबेडकरी कादंबरी आहे मात्र आपण ती धरणग्रस्ताची व्यथा समजून वाचतो. शेतकऱ्याची व्यथा ही आजच्या कथा कादंबऱ्यांची संकल्पना असते मात्र या शेतीमातीत काम करणारा शेतकरी किंवा शेतमजूर हा दलित किंवा आंबेडकरी समाजाचा घटक असतो त्यामुळे शेतकऱ्यांच्या व्यथा सोबत एकत्रितपणे त्या समाजाची व्यथा आणि कथा मांडण्यात आपण कूचराई का करतो ? हा मला न कळलेला प्रश्न आहे. वर्तमान काळातील जीवनमानाच्या अनुषंगाने अनेक घटना ह्या जातीय चौकटीशी आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या विचाराशी आणि व्यक्तीशी जोडलेले आहेत. याचे उत्तम उदाहरण पहायचे झाल्यास मध्यंतरी दक्षिणात्य भागातील आलेला एक चित्रपट जय भीम होय. संपूर्ण चित्रपटात फक्त एकदा बाबासाहेब क्यू नही है ? या वाक्यात साहेबांचा उल्लेख होतो मात्र पूर्ण चित्रपटात कुठेही बाबासाहेब दिसत नाहीत मात्र संपूर्ण चित्रपट पाहताना आपण आंबेडकरी कथा वाचत आहोत याची जाणीव होते याच प्रभावी जाणीवची कथा आणि कादंबरी मराठी मधून आली पाहिजे आंबेडकरी समाज जीवनातील अनुभवाची भावनात्मक शब्दांकित करत असताना तिच्या अनेक पातळ्यांवर अविष्कार करण्याची जबाबदारी वर्तमान काळातील लेखकांवर आहे. अनेकदा दलित साहित्याचा चेहरा रामायणातील शुंबक आणि महाभारतातील एकलव्य यांचा चेहरा घेऊन आलेला असतो. जर आपण या महाकाव्यांना सत्य मनात नसलो तर या कथांपासून आंबेडकरी किंवा दलित साहित्याला बाजूला घेऊन जाण्याची गरज आहे. अन्याय अत्याचाराचा पाढा वाचण्यापेक्षा आपल्याला या संकल्पनाच्या पुढे निघून आंबेडकरी साहित्यातील क्रांतीची जाणीव जाणीवपूर्वक वैश्विक संकल्पनेची आणि वैश्विक परिवर्तनाशी जोडावी लागेल असे मला वाटते. वरील बाबी वर चिंतन केल्यानंतर साहित्यिक म्हणून किरण डोंगरदिवे आंबेडकरी जाणिवेचा जबाबदारीतून कथालेखन आणि कादंबरी लेखन का करत नाही ? असा प्रश्न माझ्या एखाद्या हितेशी मित्राला जरूर पडू शकतो मात्र मी स्वतः कथाकार किंवा कादंबरी कारण असल्याने मी त्यांची अपेक्षा आजवर पूर्ण करू शकलो नाही मात्र ती भविष्यात एखादे वेळी पूर्ण होऊ शकते मात्र यावेळी या सभागृहात असणारे कथाकार आणि कादंबरीकार ज्यात आम्ही ज्याच्या मार्गदर्शक तत्वाने लिखाण करतो त्या डॉक्टर यशवंत मनोहरांपासून, या सत्रात आपण ज्यांचे विचार ऐकतो आहोत ते प्रसंगीत गायकवाड याशिवाय या संमेलनाच्या आयोजक विजयालक्ष्मी वानखेडे
आणि नव्या पिढीतील दिलासा दर्शक कथाकार विशाल इंगोले, संदीप गवई ह्या सर्वांनी बाबासाहेबांचा विचार आणि संविधानाचे तत्व आपल्या कथा कादंबऱ्यातून सजगपणे आणि सूचकपणे चित्रित करावे एवढी अपेक्षा व्यक्त करतो.

# आयटी क्षेत्रातील तरुणांचे भवितव्य..!

आधुनिक केसरी

**गेले काही दिवस "जॉब कट ले ऑफ" या शब्दांना बऱ्याच ठिकाणी वाचनात आले. या शब्दांना लागून असलेले लेख वाचले की, निःशब्द व्हायला होत आहे. कारण अलीकडच्या दोन - तीन महिन्यांच्या काळात अनेक नामांकित कंपन्यांनी कुठलेही कारण न देता कर्मचाऱ्यांची केलेली कपात. कर्मचाऱ्यांची इतक्या मोठ्या संख्येने झालेली कपात व तेही इतक्या मोठ्या नामांकित कंपन्यांमधून. बऱ्यापैकी लिस्टेड, स्टेबल असलेल्या कंपन्यांच्या माध्यमातून जर अश्या प्रकारे कर्मचाऱ्यांची कपात होत असेल तर छोटछोट्या कंपन्यांच्या धरतीवर असणारी अवस्था किती वाईट असेल यांची कल्पना करवत नाही.**

गुगलवर "आय.टी. जॉब कट ले ऑफ" असे सर्च केले की समोर येणारी माहिती किती भयावह व वास्तव किती भीषण आहे हे दिसून येत आहे. पुढे भविष्यात ही अवस्था अजून किती वाईट होऊ शकते याची आपल्याला कल्पना हे सर्व बघितले की येते. कामगारांच्या कपातीच्या अनेक वेगवेगळी कारणे आहेत लॉकडाऊनच्या दोन वर्षाच्या कालावधीत आय टी क्षेत्रातील कंपन्यांना न मिळालेली कामे, वर्क फ्रॉम होमसारखी फोफावलेली संकल्पना, डॉलरची घसरण शेअर बाजारातील घसरण, सगळ्या आय.टी. कंपन्यांना या दोन्ही वर्षी झालेला तोटा, जागतिक मंदी सोबतच अमेरिकेतील मंदी, फक्त उच्च दर्जाची क्षमता असणारेच कर्मचारी कंपनीत राहतील त्यामुळे कंपनीचा दर्जा चांगला राहील ही टोकाची भावना असे अनेक कारण याबाबतीत विचार केला की समोर येत आहे. काही नामांकित कंपन्यांच्या माध्यमातून कुठलेही कारणे न देता, आय टी कंपन्यांतील कर्मचाऱ्यांना देण्यात आलेला "जॉब कट ले ऑफ" साधारण दोन तीन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा गुगल कंपनीने भारतातील ४५० कर्मचाऱ्यांना कुठलीही पूर्वकल्पना न देता काढून टाकले आहे. अलीकडे गेल्या वर्षभरात जगभरातील कंपन्यांमधील कर्मचारी चालू असलेली कपात बघितली तर भविष्यात आय टी क्षेत्रात कामगारवर्गाला येणाऱ्या अडचणी, त्यांच्यात निर्माण होणारी स्पर्धा व कामगारवर्गाचे अंधारात दिसणारे भवितव्य ही सर्व चिंतेची बाब आहे.
महिन्याभरापूर्वी गुगल ( Google ) ची पॅरेंट कंपनी अल्फाबेट ( Alphabet ) ने १२ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले. गुगलची मूळ कंपनी अल्फाबेटने कर्मचाऱ्यांच्या रजेमुळे कामगिरी खालावत असल्याचे कारण देत हे कर्मचारी काढण्यात आले. या जागतिक आर्थिक मंदीच्या काळात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करणारी ॲमेझॉन, फेसबुकनंतर गुगल ही सर्वांत मोठी तंत्रज्ञान कंपनी आहे. गूगलने नवीन कामगिरी व्यवस्थापन प्रणाली योजना लागू केली आहे. या वर्षीच्या सुरुवातीला ज्यांची कामगिरी कमकुवत आहे अशा हजारो कर्मचाऱ्यांची निवड करण्यात त्याच्या व्यवस्थापकाला मदत होईल. गूगल व्यवस्थापक त्यांना बोनस किंवा स्टॉक अनुदान देण्यापासून रोखण्यासाठी याचा वापर करू शकतात. या सोबतच मिळालेल्या माहितीनुसार जानेवारी महिन्यात मायक्रोसॉफ्ट या तंत्रज्ञान कंपनीनेही १०,००० कर्मचारी कपात केली होती. ॲमेझॉननेही १८,००० तर फेसबुकने ११,००० कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. भारतासह जगभरात जानेवारी महिना रोजगाराच्या दृष्टीने वाईट ठरला आहे आणि आता फेब्रुवारी महिन्यातही कामगार कपातीचे हे सावट कायम आहे.जगभरातील अनेक देशांवर मंदीचे ) सावट दिसून येत आहे, ज्याचे गंभीर परिणाम कर्मचाऱ्यांना भोगावे लागत आहेत.
जानेवारीमध्ये दररोज सरासरी ३,००० लोकांनी टेक कंपन्यांमधील ( Tech Companies ) आपल्या नोकऱ्या गमावल्या आहेत. यामुळं जागतिक आर्थिक संकट आणि मंदीच्या चिंतेमध्ये नोकरकपातीचा वेग वाढण्याची शक्यता आहे. जानेवारी महिन्यात १६६ टेक कंपन्यांनी ६५,००० हून अधिक कर्मचाऱ्यांना कामावरून काढल्याची माहिती मिळत आहे.
मायक्रोसॉफ्टनेही काही दिवसांपूर्वी १०,००० लोकांना नोकरीवरून काढून टाकण्याबाबत भाष्य केले होते.
तर Amazon ने देखील १८,००० लोकांना काढून टाकण्याची घोषणा केली आहे. यापैकी १०००



कर्मचारी भारतात कार्यरत आहेत. २०२२ मध्ये, एक हजाराहून अधिक कंपन्यांनी १,५४,३३६ लोकांना कामावरून काढून टाकले आहे. शेअरचॅटने एकूण कर्मचाऱ्यांपैकी २० टक्के म्हणजेच ५०० लोकांना बाहेरचा रस्ता दाखवण्याची योजना आखली आहे.
विप्रोने खराब कामगिरीमुळे ४०० कर्मचाऱ्यांना काढून टाकले आहे. तर सायबर सिक्युरिटी कंपनी Sophos ने भारतात ४५० लोकांना कामावरून काढून टाकण्याची योजना जाहीर केली आहे. तर लिंकडीन ( LinkedIn ) ने लेऑफची योजना मांडली आहे.
भारतात, एंड-टू-एंड डिजिटल हेल्थकेअर प्लॅटफॉर्म MediBuddy ने आपल्या ८ टक्के कर्मचारी किंवा सुमारे २०० लोकांना कामावरून काढून टाकले आहे. स्विगीने ३८० लोकांना कामावरून काढून टाकण्याची योजना आखली आहे. जगातील आर्थिक मंदीचा परिणाम तंत्रज्ञान कंपन्यांवर दिसून येत आहे. ॲमेझॉन, ट्विटर, फ्लिपकार्ट, फेसबुक, विप्रो, सिस्को यांसारख्या कंपन्यांनी कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ॲक्टिव्हिस्ट हेज फंडांनी बाजारातील प्रतिकूल व्यावसायिक परिस्थिती आणि खर्चात कपात करण्यासाठी कर्मचारी कमी करण्यासाठी गूगलवर दबाव आणला आहे. या निर्णयामुळे अजूनही अल्फाबेटच्या काही कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त केले जाऊ शकते असे कळून येत आहे. वार्षिक मूल्यमापनात कमी कामगिरीचे रेटिंग मिळालेल्या कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात येणार आहे हे ही कळून येत आहे.
मेटाने गेल्या काही दिवसांपूर्वी आपल्या १३ टक्के कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे.
मायक्रोसॉफ्ट, सेल्सफोर्स, स्ट्राइप आणि ट्विटरही कर्मचाऱ्यांची संख्या कमी करत आहेत. सिस्कोही सुमारे ४ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढणार आहे.  ही कर्मचाऱ्यांची कपात करण्यामागे कंपन्या कारण असे सांगत आहेत की त्यांची मागील वर्षी कामगिरी चांगली नव्हती. त्यातील काहींना त्यांच्या बायोडाटा मधील कौशल्यांना साजेसा प्रोजेक्ट कंपनीत नसल्याने ते बरेच महिने रिकामे होते.( त्याला बेंच / बफर सिस्टम असे म्हणतात ). त्यामुळे त्यांना दुसरा जॉब शोधायला सांगण्यात आला आणि राजीनामा देण्यास सांगितले. पगारवाढ नको पण कमीत कमी आम्हाला तरी कामावर कायम राहू द्या असे आता कर्मचाऱ्यांना म्हणण्याची पाळी आलेली आहे. एकूण अशी बिकट परिस्थिती सध्या आय टी क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर आली आहे. ही नक्कीच चिंताजनक बाब आहे.

**लेखक: भारत सोनवणे, संपर्क: ३०७९१८३९३, एम.बी.ए. : (उत्पादन आणि विपणन व्यवस्थापन.)**

## वेड लागले



मी एक कवयित्री मान
मज शब्दांनी लाभला
काव्यरुपी हृदयात
घर करून बसला...१
अलगद टिपताना
मन रांजण मोकळा
अंतरंग उलगडे
नित्य आगळा वेगळा...२
सत्य वाटचाली माझे
हाती लेखणीचे शस्त्र
परखड बोलतांना
तेच अनमोल अस्त्र ...३
काव्य रचण्याचा गोड
नित्य जडलाय छंद
जीवनाच्या प्रवासात
झाले त्यातच बेधुंद...४
वेड लागले मनाला
कसे सावरू विचार
अलवार पानावर
घेई जीवन आकार...५
वृत्त,अलंकार,मात्रा
फुलवण्या शब्द मळा
भाव भावना रितण्या
हवा संगतीला गळा..६

सौ. प्रतिमा अरुण काळे
निगडी प्राधिकरण पुणे

## म्हसोबा

एक दगुड दगुड
व्हता आड जागावरं
आनं उचली त्याले रे।
त्याले लाया वं सेंदूर
काळा काळा दगुड तो
त्यानं नशीब खुलनं
रंग त्याले सेंदुरना
नाव दिधं म्हसोबानं
पुजा व्हये रोज त्यानी
भेटे रोजनं नारळ
म्होरे कोंबडं बकरं।
लिंबू मिरची कोहळं
म्हने येस तो आंगमां
म्हने भलता जागृत
कशा शे देव तुम्हना
त्यानापेक्शा बरं भूत
अरे कसाले पाहिजे
तुन्हा देवले त्या बळी
बिना तोंड ना तो देव
कशा ओढस रे नळी
अशा म्हसोबा बिसोबा
सम्द शेरे भो थोतांड
नको नको पुजू याले
नाही बाबा तु रे षंढ
नको दखाडु निवत
नको जोडू याले हात
काम भलं तुन्ह तुन्ह
कर संकटवं मात
कर इचार पोटना
कर कर बाबा काम
काम मां रे पाह्य तुन्ह
काशीविश्व,चारिधाम

कवी:मनिष आहिरे
7588069679 सटाणा
नाशिक

## मराठी बाणा




माझ्या मराठीची तुम्हा काय सांगू महती
दुमदुमला नगारा गांधाळली माझी माय माती ॥

रास चांदण्यांची जशी निखळते आकाशी
सूर नभतारांगणी उधळीत गाते लता तशी ॥

ज्ञान सांगे ज्ञानदेव तुकोबाची अभंगवाणी
ग्रंथराज दासबोध रामदासाची विनवणी ॥

नामानामात नामदेव एकनाथ म्हणे भागवती
जनाबाई भारुडाला मुक्ताई सखी सोबती ॥

लोकांत जसे लोकमान्य गरीबांचे शाहू महाराज
रयतेवर छत्र तयाचे छत्रपती शिवाजी महाराज ॥

वि. स., व. पु., विंदा आणि कुसु
बहिणा अन् शांतासंगे साहित्याचा शालू नेसू ॥

मराठी लिहा, वाचा , बोला आणि शिका,
संस्कृतीच्या पाऊलखुणा ऊजळून टाका ॥

माझ्या मराठीचा बाणा ध्यानी ठेवून चाला
मनोमनी ध्यास जपा नित्य नवा बोलबाला ॥

...©प्रदीप बडदे, नवी मुंबई.

## ॥ माझी माय ॥



ती माझी होती माय, माझी आई । आम्ही सारे म्हणायचो तिला बाई ।
सासरचं नाव होतं सारजाबाई । माहेरचं नाव होतं जिजाबाई ।
तीन इसा म्हणजे होतात साठ । एवढंच होतं तिचं गणित पाठ ।
बाकी काला अक्षर भैस बराबर । पण होता तिचा विवेक सारासार ।
रोजचं खुरपणी सोंगणीची कामं होती । पण गरीबी तिची पाठ सोडत नव्हती ।
रोजचं कोंडंयाचा मांडा करीत होती । तेव्हा हातातोंडाची गांठ पडत होती ।
आम्ही सात भावंडे हा तिचा विरंगुळा । मंगळसुत्र सोडून बाकी गळा मोकळा ।
डोईवर पदर , कपाळावर कुंकू मोठं । बाई नाही बोलायची कधीच खोटं ।
बैलढोरं,सोनंनाणं मालकानं विकलं । नशीबाचा भोग समजून सारे सोसलं ।
जवा आम्ही सगळे शिकून साहेब झाले । तवा तिच्या चेहऱ्यावरही हासू दिसले ।
तेव्हा तिला वाटलं सुखाचे दिवस आले । आम्हाला समाधान झाले भरून पावले ।

रचना : आहेर वा.र.
नासिक 9958782972

## अस्तित्वाची लढाई

चल मित्रा विषमतेचा अंधार
मिटवाय एकीन पेटूया.
गुलामीच्या अंधारात आता
उजेड नव्यान पेरुया.
आपल अस्तित्व दडवणाऱ्या
अंधारात आता क्रांतीचा दिवा
पेटवूया..!!

चल मित्रा माजलेल्या मनुला पुन्हा
एकदा जाळूया.
अन् संविधानाला हाती घेऊन.
हुकूमशाहीला मातीत गाडून
लोकशाहीला जपुया..!!

विचारांची होळी करून सत्तेसाठी
लाचार झालेल्यांना आता आव्हान
देऊया.
बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर,
अण्णा भाऊंच्या विचारांचा भारत
घडवूया..!!

चल मित्रा आता मैदानात उतरूया
आपल्या अस्तित्वाची अन्
देशाच्या भविष्याची लढाई आता
लढूया.
जात-धर्म वादी राजकारणाला
संपवून टाकूया.
अन् समतेची मशाल हाती धरून
धर्मनिरपेक्ष भारताला एकजुटीन
जपूया..!!

लेखक/कवी-सुरज साठे
लोकशाहीर डॉ.अण्णा भाऊ साठे
जन्मभूमी वाटेगाव
9370626619

## गेल्यावर बैल..

गेल्यावर बैल
केला मग झोपा
भांड्याविना खेपा
पाण्यासाठी..
हाताच्या काकणां
आरसा कशाला ?
कोरड घशाला
जलाठायी..
सोसल्या बिगर
हातोडीचे घाव
दगडाचा देव
होत नसे..

एकट्या हाताने
वाजते न टाळी
एकाचीच टोळी
होत नसे..
खाईन तुपाशी
अन्यथा उपाशी
पुरात सरशी
लव्हाळ्याची..
पेटल्या आगीत
तेलास ओतणे
आढीचे नासणे
एकामुळे..!!



महादेव बी. बुरुटे,
शेगाव, ता. जत,
जि. सांगली मो.
9765374805

## शेवटची भेट

शेवटची भेट घेऊ
कोणाची
कोणी नाही वाटत
आपलस
चालत निघाले
स्मशानात
पण पावसाने केला घात
सरण हि व्हावे ते ओले
आग लावाया कोणी
नसावे ना जवळ कोणी
मझ भासे माझेच मन
मला खात जाये जगणे
तर कठीण आता वाटे
मरने पण तेवढे नाही
सोपे मरण भेटेल का
मला कोठे
सांगा तरी कोणी असे
पेठे देऊनी मी पैसा
अडका घेऊनी सुखाचे
असे मरण
क्षणांत श्वाश द्यावा
सोडून
मागे न पाहावे एकदा
वळून

कु. कविता
चव्हाण,जळगाव.

## खरच तुझ्याकडे वेळ नाही का ?

तू लहान असताना आमच्या शिवाय
राहत नव्हतास एवढ्यात तुला
काय झाले रे..? आमची आठवण
येत नाही का तुला असा, कसा
विसरलास आईबाबाला खरच
तुझ्याकडे थोडाही वेळ नाही का. . ?
की, मुळात वेळ काढत नाही
तुझी आठवण येते रे लेकरा
डोळ्यातून वाहतात अश्रूंच्या धारा
आज येशील, उद्या येशील म्हणून
दररोज आम्ही वाट बघत असतो
तुझा पत्ताच लागत नाही एवढ्यात
तुझी काळजी असतो मनात
आम्ही आहोत तुझे जन्मदाते
असा, कसा विसरून गेलास
झोप येत नाही रे डोळ्याला
डोळे लाग रे तुझ्या वाटेला

सौ. संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५

## नारी

प्रेम दया माया स्नेह
सदा वसे जिच्या
ठायी,
रूप साक्षात देवीचे
असो कोणतीही बाई
मायबाप भाऊराया
जाई सोडून घरटं,
सासू सासरा नणंद
मानी साऱ्यांना
आप्तेष्ट.
लेकरांची गर्द छाया
नवऱ्याची होई माय,
घरी आलेला अतिथी
कधी भुकेला न जाय.
दिले निसर्गाने जिला
निर्मितीचे वरदान,
तिचा जगती सर्वत्र
व्हावा सदैव सन्मान.
देई दुजाला सुवास
नारी पवित्र चंदन,
सुखी होवो जिणे तिचे
हेच ह्रदयी स्पंदन !

खुशाल गुल्हाने,
'वरदा', गोकुळ
कॉलनी, साईनगर,
अमरावती
9403019795



## सुख...



सुर्योदय, सुर्यास्त, निसर्ग अनुभवण म्हणजे सुख......
पहाटे धुक्यात हरवलेली वाट पहाण म्हणजे सुख.....
कळी उमलताना आपण तिला पहाणं म्हणजे सुख...
पक्ष्यांचा किलबिलाट जवळून ऐकायला मिळण
म्हणजे सुख... लहान मुलांशी भान हरपून खेळण
म्हणजे सुख... घरात काहीही खेळ नसताना त्यांच्याशी
तासनतास गप्पा मारणे म्हणजे सुख.....
अचानक एखाद्या मैत्रिणीची भेट होणं म्हणजे सुख
तिने फक्त आपल्यासाठी काढलेला वेळ म्हणजे
सुख... न मागता एखाद्याला दिलेला मदतीचा हात
म्हणजे सुख.. न मागता अचानक मिळालेली
एखादी छोटीशी भेट म्हणजे सुख......
वृद्धांचा सहवास आणि शब्दांचा आधार म्हणजे
सुख...... सुख सुख म्हणजे नेमके काय असतं,
अगदी साध्या साध्या गोष्टी त सुध्दा ते
दडलेले असते.

@ पल्लवी नाईक

## तुकोबा आठवला म्हणून...

माणूस मेल्याची बातमी
एक माणूस
माणसांनाच सांगत आला
माणसं मेलेल्या माणसाचा
धर्म शोधू लागली
आणि माणसांची
धावपळ सुरू झाली
त्याचा धर्म शोधण्यात
माणसांची गर्दी दंग झाली
तेवढ्यात
माणसातल्या लांडग्यांनी
निवडणूका घेतल्या
माणसातील लांडगे सत्तेत आले
आणि त्यांनीच मग
मेलेला माणूस
अर्धा पुरला
अर्धा जाळला
माणसं ही समाधानी झाली
बोटावर लागलेली शाई
आता आमच्याच धर्माच्या रंगाची
असावी म्हणून माणसं भांडतील
धर्माच्या भानगडीत
पोटाची भूकसुद्धा
हिरवी भगवी होईल
कुणी कुणाला अंधभक्त म्हणेल
तर कुणी कुणाला सेक्युलर म्हणेल
हातात असणाऱ्या मोबाईलवर
उभ्या माणुसकीला घोडा लावला
जातोय पसायदान लिहिणारा
ज्ञानेश्वर बागेश्वरच्या सावलीत
झाकला गेला
धर्माच्या रक्षणासाठी वारकरी
धारकरी झालेला दिसला
मला तुकोबाची आठवण झाली
आणि मी माणसाची कविता
लिहिली

दंगलकार नितीन चंदनशिवे
मु.पो.कवठेमहांकाळ.
जि.सांगली
7020909521



# विझलेली माय अशी स्वर्गात जाते; विहिरीच्या पाण्यातून पोहऱ्यात येते...

## संयमाचा परीघ



चित्र : बाबूराव पाटील, भोकर



प्रा. डॉ.मुकुंद राजपंखे
संपर्क क्र. 9881294226

भाग : १७

आधुनिक केसरी

भाषा मग ती कुठलीही असो, वाढते, वृद्धींगत होते ती चार चांगल्या गोष्टी केल्या तर. रोज बोलण्यात असलेली भाषा मरत नाही. लिहिण्यात आली की संपन्याचा विषय संपला. वाचण्यात आली की वाचली समजायचं. ऐकण्यात आली की वाचलीच म्हणून समजा. सत्तेत असलेल्या समुदायांची भाषा त्या त्या सत्ता काळात बहरत जाते. भाषा आकलनाच्या आवाक्या बाहेर गेली की हळू हळू संपून जाते. एकदा का एखादी भाषा संपली की त्या भाषेतलं ज्ञान संपून जातं, संस्कार संस्कृती जन रीत-रिवाज घटका मोजतात.

सत्तांतरं ही अशा भाषेच्या जिवावर उठतात आणि रुळलेला जीनवव्यवहार धुळीस मिळवतात. भाषेनं मन मोठं करुन आपली स्विकार क्षमता वाढवायला हवी आणि या तत्वात सातत्य असायला हवं तर त्या भाषेची सातत्यानं वाढ, वृद्धी होत रहाते.जगातल्या खूप सा-या भाषा आज मायक्रोस्कोपखाली शोधूनही सापडत नाहीत. एक तर ती भाषा बोलणारे समुदाय संपले किंवा त्या समुदायांची सत्ता संपली.अनेकदा आकसांनी परस्परांच्या भाषा संपवल्या.जीवन जगण्याची चाल रीत संपवली जाते.आपापल्या दैनिक व्यवहराला आपलनाच्या पातळीवर आणण्यासाठी कुठला ही सत्ताधारी मुळापासून काम करतो.एकदा का मुळाक्षर संपलं की संपलं सगळं.

आपल्या चाली रिती रुढी परंपरा दैनंदिन व्यवहार आज जपून आहेत त्याचं कारण त्यावरती कुणी कांहीतरी लिहिलं आहे.जगणं साहित्याच्या माध्यमातून जतन झालं म्हणजे पुढच्या पिढ्यांकडं हस्तांतरीत होत रहातं.त्यामुळं कथा,कविता, नाटक, कादंबरी यांच्या माध्यमातून आपले सण-समारंभ जपून ठेवता येतात. माणसांचे स्वभाव जपता येतात बारकाव्यानिशी. कथेतून सांगीतलेलं जगणं ती भाषा जिवंत असे पर्यंत जिवंत रहातं.हजारो वर्षापुर्वीचं तत्वज्ञान आज आकलनाच्या पातळीवर का आहे, याचं उत्तर एकंच... ते जगणं साहित्यानं जतन केलेलं आहे.पोवाड्यातुन आजही शिवराय डोळ्यापुढं उभे राहतात.ज्ञानोबा, नामदेव,तुकोबा,जनाई, कबीर, या मंडळींनी मराठी भाषेतून आपलं मन मोकळं केलं काळ सुशिक्षीत केला आणि मराठी भाषेला नुसतं जगवलं नाही तर तिची प्रतिष्ठा वाढवली.

*"अहंकाराचा वारा न लागो राजसा*
*माझिया विष्णुदासा भाविकासी"*

चौदाव्या संत कवी नामदेवाची ही सुंदर समज आणि हा आकलनाचा आवाका आजही आवाक करणारा आहे.

चौदाव्या शतकातील ज्ञानेश्वरांच्या ओव्यांमधून जतन झालेली मराठी भाषा आणि त्यातुन समोर येणारं जगणं आजही ग्रामीण पातळीवर मराठी माणसांचं भरण पोषण करते आहे.भजन- किर्तन प्रवचनांमधून 'आई-वडील हेच घराचं दैवत असतं' हा आषय आजही भरकटलेल्या घरांना दिशा देण्याचं काम करतं.

*"सर्व सुखाचे आगर ;*
*बाप रखुमा देवीवर"*

तुकोबांच्या अभंगांनी मराठी मनाचा गाभारा उजळून टाकला.तुकोबांच्या अभंगांनी हताश, निराश होत जाणा-या, निराशेच्या डोहात बुडून जाणा-या जगण्याचं बळ बांधलं.कणखर ताठरता शिकवली. स्वाभिमान जागा ठेवला.हे जगण्याचं आवसान बांधणारी अभंग रचना तुकोबाचं आणि अर्थातच मराठी भाषेचं वैभव वाढवणारी आहे.

**" भले तरी देवू कासेची लंगोटी**
**नाटाळाचे माथी हानू काठी."**

ही भूमीका जगण्याला स्वाभिमानी आणि न्यायिक मार्गावर नेते.

मराठी भाषेच्या सतराव्या, आठराव्या, एकोनिसाव्या शतकांबद्दलच्या जगण्याबद्दल फारशी चर्चा होत नाही.तत्कालीन साहित्याचा प्रभावहीन प्रवास त्याला कारणीभूत आहेच,हे वास्तव नाकारता येत नाही.

बहीनाबाई आजही आपल्या कवितामधून जे जगणं बोलते ते आज शिकलेल्या मनुष्याला थक्क करणारं आहे.

*" अरे संसार संसार*
*जसा तवा चुल्ह्यावर*
*आधी हाताला चटके*
*तवा मिळते भाकर"*

हे कष्टाचं तत्वज्ञान आज जितं राहिलं त्याचं कारण कविता.

अण्णा भाऊ साठे यांच्या कथा कादंब-यांमधून जागवलेला कृष्णा-कोयणेचा प्रांत आणि फकिरा, सत्तू भोसले, शंकर पाटील, विष्णुपंत कुलकर्णी सारखी जिगरबाज माणसं 'फकिरा'तून अक्षरबद्बध झाली नसती तर त्यांच्या अंगी असलेली मूल्यरचना आज जगता आली नसती ना सांगता आली नसती.

महत्वाचा मुद्दा हा की कुठलीही भाषा जगते, तगते, तरते ती केवळ त्यातून होत राहिलेल्या आदान-प्रदान तत्वामुळं.संवाद संपला की भाषाही गेली आणि त्या भाषेत बांधून ठेवलेलं जगणंही गेलं. त्यामुळं आपापल्या गावातलं सुंदर जगणं आपण कथा लिहून जतन करता येणं शक्य आहे. कर्तुत्ववान बापाभावाचं जगणं त्याचे चरीत्रं लिहून जतन करता येतील. अवती भवती जपावं, जगाला दाखवावं असं भरपूर मौलिक आहे पण त्यावर कोणी कांहीच लिहिलं नाही तर ते डोळ्यादेकत मातीमोल होवून जाणार आहे. त्यामुळं ज्यांना वाटतं हे जगाला सांगीतलं तर आपलं मन मोकळं होईल, ते वाचूनही वाचणा-याचं भरण पोषण होईल, त्यांनी आवर्जून लिहितं होणं गरजेची गोष्ट आहे.आत्मकथा, आत्मकथण, आत्मचरित्र या साहित्याच्या माध्यमातून आपला इतिहास लिहून ठेवावा, आपापल्या भाषेत, अगदी आहे तशा, विनासंकोच.त्याशिवाय भाषाही जगणार नाही आणि त्या भाषिकांचं वैभवाचं जगणंही. साहित्य क्षेत्रातल्या कुठल्याही नव निर्माणाला बळ देत रहाणं या अर्थानं अपेक्षीत आहे.

आज मराठी भाषा गौरव दिना निमित्त कवी कुसुमार्गजांना अभिवादन करणारा सुंदर कार्यकम आमच्या यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात संपन्न झाला.कवी राजेश रेवले, नैकोटकर यांचा भावस्पर्षी काव्यसंवाद संपन्न झाला.कार्यक्रमाचा अध्यक्षीय सुसंवाद प्राचार्य डॉ शिवदास सिरसाठ यांनी साधला आणि प्रास्ताविकाचा प्रांत डॉ दिलीप भिसे यांनी सांभाळला.कु.गायत्री पुजारी या लेकरानं आपल्या सहज सुंदर सुत्रसंवादानं कार्यक्रम बहरता ठेवला.




आभार विभागाचे प्रा. डॉ बाबासाहेब जाधव यांनी मानले.आपल्या सुमधूर वाणीने कविवर्य राजेश रेवले यांनी विद्यार्थ्यांच्या भावनेला स्पर्ष केला.राना-वनात खस्ता खाणारं ग्रामीण जीवन जतन करणा-या शेतीमातीच्या कवितांसोबतच आई-बापाच्या अपार कष्टाचा आदरभाव वाढवणा-या रचनाही ऐकवल्या. आपल्या आईच्या कष्टाळू, त्यागी, समर्पीत जीवनाचं जतन करणारी 'माय' ही प्रतिमा आणि प्रतिकांनी साकारलेली कविता ऐकवली.ती आपणा वाचकांसाठी देण्याचा मोह आवरत नाही.

*'माय'*

*कापुरागत जळताना माय दरवळ*
*रानातल्या मातीतली माय हिरवळ !*
*माय तुझा देह झाला पिकलेलं पान*
*तरी तुझ्या ओठी येतं हिरवच गाणं*
*माय तुझा पदर जरी आहे सांधलेला*
*जगाचा पसारा आहे त्यात बांधलेला*
*तुझ्या अंगी कुठून असं आलं माय बळ*
*रानातल्या मातीतली माय हिरवळ !*
*उमेदीत उचललं भरलेलं पोतं*
*स्वतः म्हणे गुंफायची तुटलेलं जोतं*
*रानातल्या पाचोळ्यागत झाला तुझा देह*
*दुष्काळाशी देतो लढा कुडीतला जीव*
*कुणा आता दाखवीती मनातला जाळ*
*रानातल्या मातीतली माय हिरवळ !*
*लेकी-बाळी सुना आता पांगापांग झाली*
*उरलेल्या घरा आता नाही कुणी वाली*
*दूर गेले लेकं-बाळं गेले नातवंड*
*रचलेल्या सपनांची पडली उतरंड*
*हातामध्ये राहिली रे फक्त जपमाळ*
*रानातल्या मातीतली माय हिरवळ !*
*खाऊनीया खस्ता माय झिजुनिया गेली*
*झिजतच अशी माय विझुनिया गेली*
*विझलेली माय अशी स्वर्गात जाते*
*विहिरीच्या पाण्यातून पोहऱ्यात येते*
*साऱ्या शिवारात आता घुमतेय शिळ*
*रानातल्या मातीतली माय हिरवळ !*

**( लेखक मराठी भाषेचे साहित्यिक आणि इंग्रजी भाषेचे संशोधन मार्गदर्शक आहेत)**

# मराठी भावा, मराठी का सोडतो रे ?



श्रीकृष्णदास निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज- वि.वा.शिरवाडकर यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण आहे. त्यांना अभिवादन म्हणून दि.२१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाने त्यांचा जन्मदिवस- २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित केला. मराठी राजभाषा दिन आणि मराठी भाषा गौरव दिन हे दोन्ही दिवस वेगवेगळे असून मराठी भाषेसंदर्भातील महत्त्वाचे आहेत. मात्र दोन्ही एकच समजण्याची चूक करू नये. कारण माझ्या मराठीचा उदोउदो करण्यास ते दोन्ही दिवस कामाचेच आहेत. श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांच्या शब्दांतून मराठीचा अभिमान जागवा...**

माझी मराठी भाषा ही इंडो-युरोपीय भाषाकुळातील एक भाषा आहे. ती भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक आहे. माझी मराठी महाराष्ट्र राज्याची अधिकृत तर गोवा राज्याची सहअधिकृत भाषा आहे. सन २०११च्या जनगणनेनुसार भारतात मराठी भाषकांची एकूण लोकसंख्या सुमारे ९ कोटी आहे. मातृभाषा असणाऱ्या लोकांच्या संख्येनुसार मराठी ही जगातील दहावी व भारतातील तिसरी भाषा ठरते. ती भारताच्या प्राचीन भाषांपैकी एक असून महाराष्ट्री प्राकृतचे आधुनिक रूप आहे. पवित्र ग्रंथराज ज्ञानेश्वरी हा मराठीतील ७४५ वर्ष जुना पहिला ग्रंथ आहे. मराठीचे वय सुमारे एक हजार वर्षे असूनही तिला अभिजात भाषेचा दर्जा का नाही ? याची मला खंत वाटते. मराठी भाषेचा गौरव संतशिरोमणी ज्ञानेश्वर माऊलींनी त्यांच्या साहित्यातूनही केलेला दिसून येतो-

*"माझ्या मराठीची बोलु कौतुके!*
*परि अमृतातेही पैजा जिंके!!"*

महाराष्ट्र हे मराठी भाषिकांचे राज्य म्हणून मराठी भाषेला वेगळे महत्त्व प्राप्त झालेले आहे. आजतागायत मराठी भाषेतून अनेक श्रेष्ठ साहित्यकृती निर्माण झालेल्या आहेत आणि त्यात सातत्यपूर्ण रीतीने भर पडत आहे. कुसुमाग्रजांच्या शब्दांत मराठी भाषा गुणगौरव-

*"माझ्या मराठी मातीचा*
*लावा ललाटास टिळा।*
*तिच्या*
*संगाने जागल्या*
*दऱ्याखोऱ्यातील*
*शिळा।।"*



मराठी भाषा गौरव दिन हा दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्राचे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवशी साजरा करण्यात येतो. त्यांचा जन्म पुणे येथे दि.२७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. कवीवर्य कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्रच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेचा गौरव व कविराज कुसुमाग्रजांच्या स्मृतींना अभिवादन करण्याच्या हेतूने त्यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात यावा, असा शासन निर्णय दि.२१ जानेवारी २०१३ रोजी घेण्यात आला. कारण मराठी भाषा अमर झाली असल्याचे कविराज कुसुमाग्रज सांगतात-

*"विजयासाठी कविता*
*माझी कधीच नव्हती,*
*म्हणून नव्हती भिती*
*तिजला पराजयाची!*
*जन्मासाठी हटून केव्हा*
*नव्हती बसली,*
*म्हणून नाही खंतही तिजला*
*मरावयाची!!"*

ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी कुसुमाग्रज यांचे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान महत्त्वपूर्ण असल्याने त्यांना अभिवादन म्हणून २१ जानेवारी २०१३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार कुसुमाग्रजांचा जन्मदिवस २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून घोषित करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०१०मध्ये त्यांचा जन्मदिवस- २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून नमूद केलेला आहे. दि.१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली, तेव्हापासून १ मे हा दिवस मराठी राजभाषा दिन किंवा मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्राची अधिकृत राजभाषा ही मराठी असेल, असे जाहीर करणारे वसंतराव नाईक सरकार यांनी मराठी राजभाषा अधिनियम १९६४ सर्वप्रथम दि.११ जानेवारी १९६५ रोजी प्रसिद्ध केला.

सन १९६६पासून तो अंमलात आला. १ मे रोजी मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने घोषणा करीत असतांना त्यांनी मांडलेले मराठी भाषा दिनावरील विचार प्रेरक होते. वसंतराव नाईक सरकारने पुढे मराठी भाषा संवर्धनासाठी राज्यात पहिल्यांदाच भाषा संचालनालयाची निर्मिती केली व प्रादेशिक स्तरावर चार केंद्राची स्थापना केली. राज्यकारभार मराठीतून चालणार, असे अधिकृतपणे जाहीर केले होते. मराठी भाषा गौरव दिवस- २७ फेब्रुवारी आणि मराठी भाषा दिवस- १ मे हे स्वतंत्र दिवस असून त्या दिवसांचे स्वतंत्र असे महत्त्व आहे. नादमधुर काव्यलेखन शैलीनेही माझ्या मराठीचा गोडवा अधिकच पसरविण्यात ते पुढेच असल्याचे कळते-

*"ओळखलात का सर मला ?*
*पावसात आला कोणी.*
*कपडे होते कर्दमलेले,*
*केसांवरती पाणी!"*

विष्णू वामन शिरवाडकर तथा तात्यासाहेब शिरवाडकर हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार व समीक्षक होते. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले. ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात. तर वि.स.खांडेकर यांच्यानंतर मराठी साहित्यात ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ते दुसरे साहित्यिक होते. ज्ञानपीठ पुरस्कार हा भारतीय साहित्य जगतात नोबेल पुरस्काराइतकाच सर्वश्रेष्ठ पुरस्कार समजला जातो. अशा या थोर साहित्यिकाचे दि.१० मार्च १९९९ रोजी निधन झाले.

# शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही राष्ट्रीय आपत्ती : अमर हबीब

## गोटखिंडीतील व्याख्यानमालेत विचार यज्ञास प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**इस्लामपूर :** स्वातंत्र्यानंतर साडेचार लाख शेतकऱ्यांनी देशात आत्महत्या केल्या हे आपल्या कृषीप्रधान देशाचे दुर्दैव आहे. कोणत्याही आपत्तीपेक्षा शेतकऱ्यांच्या आत्महत्येची संख्या जास्त आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर मीडिया मधूनही कारणमीमांसा केली जात नाही. देश स्वातंत्र्य झाला पण शेतकरी स्वातंत्र्य झाला नाही, ही शोकांतिका आहे असे मत किसानपुत्र आंदोलनाचे नेते अमर हबीब यांनी 'इडा पिडा टळो बळीच राज्य येवो' या विषयावर बोलताना व्यक्त केले. गोटखिंडी तालुका वाळवा येथील चला गाव घडवूया चळवळी अंतर्गत, साद माणुसकीची या सेवाभावी संस्थेमार्फत आयोजित व्याख्यानमालेतील प्रथम पुष्प गुंफताना ते बोलत होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. संजय थोरात यांनी केले. यावेळी शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ दादा पाटील, गोटखिंडीच्या सरपंच दिपाली दिलीप पाटील, येडेनिपाणीचे आनंदराव पाटील, कामेरीचे सरपंच रणजीत पाटील यांच्यासह पंचक्रोशीतील रसिक श्रोते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अमर हबीब म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या मुलांनी बलिदान दिले. ज्यावेळी शेतकरी लढ्यात उतरले त्याचवेळी ती लोक चळवळ बनली. गांधीजींनी स्वतंत्र लढ्याची बांधणी केली व शेतकरी त्यामध्ये उतरला व देश स्वतंत्र झाला. पण शेतकरी स्वातंत्र नाही झाला. ज्याच्या नावावर सातबारा आहे, तो शेतकरी नव्हे तर ज्याच्या उत्पन्नाचे मुख्य साधन शेती आहे, तो शेतकरी आहे. शेतकऱ्यांना शेती उत्पादनात आयकर लागत नाही पण याचा




फायदा शेतकऱ्याच्या ऐवजी मोठ्या नोकरदार व पुढाऱ्यांनी घेतला आहे. काळा पैसा पांढरा करण्यासाठी भ्रष्ट लोकांनी शेतीचा उपयोग केला आहे. 99 टक्के शेतकऱ्यांचे उत्पन्न आयकर मर्यादेपेक्षा कमी आहे. इंग्रजांच्या काळात व सध्याही शेतकऱ्यांच्यावर कायद्याने बंधन घातली असून सर्वत्र लुटीचा अवलंब केला जात आहे. शेतकऱ्याच्या मुलांनीच शिकून मोठे होऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सूत्रसंचालन बाबासाहेब तिबिले यांनी तर आभार रमेश कांबळे यांनी मानले. व्याख्यानाला गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मिटमिटा येथील श्री स्वामी समर्थ केंद्राच्या जागेचा लोकार्पण सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**दौलताबाद :** मिटमिटा येथे अखिल भारतीय श्री गुरुकुल पिठाधिश श्री गुरुमाऊली यांच्या कृपाशीर्वादाने आणि गुरुपुत्र दादासाहेब मोरे यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने देवगिरी व्हॅली, मिटमिटा येथाल श्री स्वामी समर्थ नगर या दोन एकर जागेमधील एका भागात 1906 चौरस फूट जागेचा प्लॉट श्री स्वामी समर्थ केंद्र उभारणीसाठी दानशूर नागरिक श्री गणेश लोखंडे व कृष्णा कदम यांनि श्रीस्वामी समर्थ केंद्र मराठवाडा प्रतिनिधी विलासराव देशमुख( बापू ) यांच्या प्रमुख उपस्थितीत सढळ हस्ते लोकार्पण केला. यावेळी परीसरातिल स्वामी समर्दा केंद्राचे भाविकभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केशव सूर्यवंशी यांनी केले तर सूत्रसंचालन किशोर जैतमल देवगाव रंगारी यांनी केले. याप्रसंगी श्री स्वामी समर्थ केंद्र जिल्हा प्रतिनिधी श्री. अण्णासाहेब जाधव, रामकृष्ण मराठे तसेच जिल्ह्यातील श्री स्वामी समर्थ केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते.

देवगिरी व्हॅली प्रतिष्ठानचे भारत निकम, दिनकर वाघमारे , कैलास आव्हाळे , प्रशांत नवले, शरद भोसले आदींची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी श्री अण्णासाहेब देशमुख, रामकृष्ण मराठे, विलासराव देशमुख,मिटमिटा येथिल प्रा.शिवाजी गायकवाड ,अतुल इंगळे आदीनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री रवींद्र निळ, भाऊसाहेब सोनवणे , निलेश जाधव , मनोज मते आदींनी विशेष परिश्रम घेतले. या लोकार्पण सोहळ्यासाठी परिसरातील सर्व सेवेकरी महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भौतिक संपत्तीपेक्षा बौद्धिक संपदा वाढवावी : प्राचार्य डॉ. बेटकर

## दयानंद महाविद्यालयात 'आयपीआर' वर कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** बँकेतील बचत रक्कम, सोने, मालकीचे घर, भली मोठी गाडी ही सारे दृश्य भौतिक संपत्ती आहे. याशिवाय आणखी ही वेगळी संपत्ती आहे, पण ती न दिसणारी म्हणजे बौद्धिक संपत्ती असून, विद्यार्थी व संशोधकांनी ती पेटंट, कॉपीराईट अधिकार, ट्रेडमार्क अशा स्वरूपात वाढवावी, असे आवाहन औसा येथील श्री कुमार स्वामी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.एम.बेटकर यांनी केले. येथील दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या अंतर्गत हमी कक्ष ( आयक्यूएस्सी ) अंतर्गत बौद्धिक संपदा हक्क ( आयपीआर ) या विषयावर एक दिवशी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार होते. व्यासपीठावर आयक्यूएस्सी समन्वयक डॉ.बालाजी कांबळे उपस्थित होते. प्राचार्य डॉ.बेटकर यांनी पुढे बोलताना बौद्धिक संपदेचे त्यांनी सात प्रकार सांगितले. त्यामध्ये पेटंट, कॉपीराईट अधिकार, ट्रेडमार्क म्हणजे काय, ते कुठल्या गोष्टींसाठी मिळू शकतात. ते मिळवण्यासाठीची काय प्रकिया आहे. याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली. याशिवाय पेटंट चे जर कोणी उल्लंघन करीत असेल तर कायदेशीर तरतुदी काय आहेत, हे सांगून पेटंट मिळवणाऱ्या व्यक्तीच्या अधिकाराचे संरक्षण कसे होते याची त्यांनी माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्रभारी प्राचार्य डॉ. राजाराम पवार यांनी संशोधनावर विद्यार्थ्यांनी भर देउन जास्तीत जास्त पेटंट मिळविले पाहिजेत असे आवाहन केले.

प्रास्ताविक डॉ. बालाजी कांबळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. स्वप्नाली माणिकशेट्टी यांनी तर पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल प्रा. विठ्ठल जाधव यांनी करून दिला. शेवटी आभार डॉ. रूपा गिल्डा यांनी मानले. डॉ. क्यू.एन. शेख, प्रा. प्रेमसागर मुंदडा, प्रा. प्रसाद पाटील, प्रा. निखिल व्यास, बालाजी कनगुळे, अमित राठोड आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास डॉ. बी.आर. दायमा, डॉ.के. एस.बियाणी, डॉ. बी.टी. चव्हाण डॉ. एम.एस.अष्टेकर आदींसह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






# सांग बाबा दर पाच वर्षांनी भ्रष्ट नेत्याला पाडशील का ?

## लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगरचे कविसंमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजीनगर आयोजित कविसंमेलन व साहित्यिकांचा सत्कार समारंभ हॉटेल स्काय कोर्ट ला संपन्न झाला. लायन्स क्लबच्या अध्यक्षा ला.माधुरी चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली व ला.तनसुख झांबड यांच्या मार्गदर्शनाखाली सत्कार समारंभ तर प्रसिद्ध साहित्यिक डॉ.दासू वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली व आकाशवाणीच्या नम्रता फलके यांच्या प्रमुख उपस्थितीत कविसंमेलन संपन्न झाले.या कार्यक्रमाचे उद्‌घाटन प्रसिध्द लेखक व समीक्षक डॉ ऋषीकेश कांबळे यांच्या हस्ते झाले.यावेळी मंचावर सचिव मयुर जालनावाला, ला निर्मला झांबड उपस्थित होत्या. या कार्यक्रमाला ला.ऋषीकेश गढवाल,ला.भावेश पटेल, ला.डॉ महेंद्र चौधरी यांनी विशेष सहकार्य केले. ला.सुरेश क्षत्रिय यांनी ध्वजवंदना दिली तर ला.ॲड.आशा कटके व ला. राजेश वैष्णव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमात शहरातील हबीब भंडारे,रसिका देशमुख,उत्तम बाविस्कर,माधुरी चौधरी, ज्योती सोनवणे,उत्तम अंभोरे यांचा साहित्यिक योगदानासाठी सत्कार करण्यात आला. समाधान इंगळे यांच्या सदाबहार सुत्रसंचालनात कवि राजा धर्माधिकारी यांची स्वर्गामंदी मले कानी गांधी बाबा दिसले.. अन माह्याकडे पाहूनसन्या गुदूगुदु हासले ही कविता तर नरसिंग इंगळे यांची कविता दर पाच वर्षाला त्यांच्या प्रॉपरटीचा हिशेब घेशील का सांग बाबा दर पाच वर्षांनी भ्रष्ट नेत्याला पाडशिल का रसिकांची दाद घेऊन गेली. माधुरी चौधरी यांच्या तब बाप समझमें आता है या कवितेने श्रोते भावनिक झालेत. ललीत अधाने यांच्या पंचरलेल्या आयुष्याची चळवळ मोठी झाली बघ विद्रोहीचे बिगुल हे ठायी ठायी वाजत आहे तर राज रणधीर यांची गझल विष्णू सुरासे यांच्या विनोदी कविता धनंजय गव्हाले व समाधान इंगळे यांनी सादर केलेल्या गेय कवितांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

# बंसल क्लासेस आयोजित टॅलेंट सर्च परीक्षेत साठ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज


**छत्रपती संभाजीनगर :** देशभरातील विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय असणाऱ्या राष्ट्रविख्यात बंसल क्लासेस आयोजित टॅलेंट सर्च परीक्षे मध्ये आता पर्यंत तब्बल साठ हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आहे. बंसल क्लासेस महाराष्ट्राचे मुख्य प्रवर्तक चंदुलालजी बियाणी सर यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त बंसल क्लासेस तर्फे 4 थी ते 9 वीच्या विद्यार्थ्यांसाठी दोन टप्प्यांमध्ये टॅलेंट सर्च या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्या टप्प्यात 4 थी, 5 वी आणि 6 वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. 25 फेब्रुवारी 2023 रोजी तर उर्वरीत 7वी, 8वी आणि 9 वीच्या विद्यार्थ्यांसाठी दि. 26 फेब्रुवारी 2023 रोजी बंसल क्लासेसच्या महाराष्ट्रातील सर्वच शाखांवर टॅलेंट सर्च या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्रातील विविध शाळांमधील एकूण 60 हजार पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे. टॅलेंट सर्च परीक्षेतील विजेत्या विद्यार्थ्यांसाठी 1.5 करोड रूपयांची शैक्षणिक शिष्यवृत्ती आणि 31 लाख रूपयांची रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागावी आणि त्यांच्यातील आत्मविश्वास उंचावा यासाठी बंसल क्लासेस तर्फे नियमीतपणे विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम वर्षभर निशुल्क राबविले जातात. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त विद्यार्थ्यांसाठी टॅलेंट सर्च परीक्षेसाठी बंसल क्लासेसच्या 1 हजार 500 पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन या परीक्षेचे यशस्वी आयोजन केले आहे.



# मराठवाड्यात ₹१० कॉइन चलनात आहे की नाही ?

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारतीय चलनाविषयीचे धोरण अर्थ मंत्रालय व रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या समन्वयाने ठरविले जाते. परन्तु या निर्णयाला देशातील काही राज्यातील विभाग/जिल्हे अवलंब करत नसल्याचे दिसून येते आहे. संपूर्ण देशभरात एक चलन चालविले जावे असे राष्ट्रपती, पंतप्रधान, अर्थमंत्री, रिझर्व्ह बँक गव्हर्नर यांचे आदेश असतात, परन्तु मूलतःअर्थराज्यमंत्री महोदय आपण निवासी असलेल्या महाराष्ट्र/मराठवाड्यातील व्यापारी व बँकर्स हे १० कॉइन चलन हे आपल्या भागात चालत नाही असे स्पष्ट सांगत असतात त्यामुळे जनता देखील हे १० कॉइन चलनात घेत नाही किंवा अवलंब करत नाही. परन्तु याच महाराष्ट्रातील मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र या विभागातील सर्वच जिल्ह्यात १० कॉइन हे चलनात आहे पण मराठवाड्यातच का नाही? किंवा मराठवाड्यासाठी हे चलन बंद आहे का? याबद्दल जनतेतील संभ्रम दूर करावा. आणि असे जर निर्णय झाले असतील तर सविस्तर परिपत्रक काढून जनतेला माहिती देऊन सहकार्य करावे, कारण शहरी भागासह ग्रामीण भागात १० चा कॉइन गत २,३ वर्षात कोणी पाहिला सुद्धा नसेल. त्यामुळे अर्थ राज्यमंत्री महोदय आपण स्वतः या विषयाची शहानिशा करून घ्यावी आणि यावर धोरणात्मक निर्णय घेऊन जनतेला सहकार्य करावे, अशी मागणी भाजपा प्रदेश कार्यकर्ते गजानन जोशी यांनी देशाचे अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.







# शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेची कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेच्या जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील जाधव यांनी औरंगाबाद जिल्हा व फुलंब्री कन्नड तालुका निहाय कार्यकारणी जाहीर केली आहे सदर कार्यकारणीत औरंगाबाद जिल्हा उपाध्यक्षपदी श्री नंदकिशोर पवार सेवानिवृत्त नायब तहसीलदार औरंगाबाद जिल्हा कोषाध्यक्षपदी श्री देवराव आहेर सेवानिवृत्त वन विभाग औरंगाबाद जिल्हा सचिव पदी श्री संतोष राव शेळके विमा प्रतिनिधी औरंगाबाद जिल्हा सहसचिव पदी श्री शामराव भोकरे माजी सैनिक व फुलंब्री तालुका अध्यक्षपदी श्री साईनाथ बेडके फुलंब्री तालुका उपाध्यक्षपदी श्री शिवाजीराव वाहटुळे फुलंब्री तालुका कोषाध्यक्षपदी श्री सुरेश जाधव कन्नड तालुका अध्यक्षपदी श्री गोपीनाथराव आदिक सेवानिवृत्त नायब तहसीलदार कन्नड तालुका उपाध्यक्षपदी श्री कल्याणराव मोतीगे प्रगतीशील शेतकरी अशी जिल्हा व तालुका निहाय नियुक्ती करण्यात आली असून तसेच वाणेगाव शाखा स्थापन करण्यात आली असून सदर शाखेचे वाणेगाव शाखेचे अध्यक्ष रामराव सोनवणे व वानेगाव शाखेचे उपाध्यक्ष बाबुराव पाटील जाधव व श्री भागिनाथ पाटील भोकरे वानेगाव शाखा सचिवपदी रावसाहेब पाटील सोटम वानेगाव शाखा सहसचिवपदी जगन्नाथराव पाटील शेळके वानेगाव शाखा कोषाध्यक्षपदी गणेश पाटील जाधव व श्री रामरावजी जाधव सदरच्या नेत्याची शरद जोशी विचार मंच शेतकरी संघटनेचे प्रदेश अध्यक्ष माननीय विठ्ठल पवार राजे यांच्या मान्यतेने औरंगाबाद जिल्हाध्यक्ष काशिनाथ पाटील जाधव यांनी जिल्ह्यातील व तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या वाणेगाव येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात नवनियुक्त पदाधिकाऱ्याचा शाल श्रीफळ देऊन भव्य सत्कार करण्यात आला सर्वांचे गावकऱ्यांच्या वतीने नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे गावकऱ्यांनी शुभेच्छा दिल्या. त्यांनी सदर शेतकरी संघटना या माध्यमातून गाव पातळीवर आपापल्या शाखा तयार करून शेतकरी संघटनेस सहकार्य करून शेतकऱ्यांच्या मालास योग्य भाव कसा मिळेल याबाबत प्रयत्न करावे असे मनोगत देवनाथ बापू सोनवणे व सुभाषराव गायकवाड यांनी सदर नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना असे संबोधित केले की तुम्ही कोणताही पक्षपाती न करता शेतकऱ्यांच्या शेतीमालाला योग्य भाव कसा मिळेल शेतकऱ्याचे प्रश्न उदाहरणार्थ कापसाला भाव मिळणे शेतकऱ्याचे वीज प्रश्न शेतकऱ्याचे अतिवृष्टीचे पैसे शेतकऱ्याला विमा मिळणे शेतकऱ्यावर जे जे संकट आहेत त्यांना मदत करण्याचे काम आपण शेतकरी संघटनेमार्फत करावयाचे आहे असे मोलाचे मार्गदर्शन केले व प्रमुख पाहुणे श्री देवनाथ बाप्पू सोनवणे व सुभाषराव गायकवाड यांनी आम्हाला केव्हाही बोलवा आम्ही तुमच्या पाठीशी आहे असे आश्वासन दिले सदर कार्यक्रमात वाणे गावातील बरीच मंडळी हजर होती त्यामुळे शरद जोशी संघटनेचे अध्यक्ष श्री काशिनाथ जाधव यांनी सर्वांचे आभार मानले व पदाधिकाऱ्यांनी कामाला लागून आपण शेतकऱ्यांना कशाप्रकारे मदत करता येईल याबाबत त्यांनी त्यांचे मनोगत व्यक्त केले तसेच कापूस भाव वाढीकरिता आपल्याला भव्य मोर्चा काढल्याशिवाय शासन आपल्या प्रश्नाकडे लक्ष देणार नाही असे त्यांनी त्यांच्या मनोगत व्यक्त करताना सांगितले शेतकऱ्यांसाठी रात्रंदिवस काम करण्याचे त्यांनी सर्वांना आश्वासन दिले.

# टाकळी कोलते येथे हजारो भक्तांच्या उपस्थिती यज्ञ सोहळा संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पीरबावडा :** श्री चैतन्य महादेव मंदीर संस्थान टाकळी कोलते ता फुलंब्री येथे श्री श्री एकादश कुंडात्मक श्री पितृयाग तथा विष्णुयाग महारूद्र स्वाहाकार यज्ञ महोत्सव यासोहळ्याची २४ फेब्रुवार शुक्रवार दुपारी काल्याच्या किर्तनानंतर महा प्रसादाने हजारो भाविक भक्ताच्या उपस्थितीत सोहळा सांगता महा प्रसादाने झाली. फुलंब्री तालुक्यातील राजुर - फुलंब्री रोड लगत असलेल्या जालना - औरंगाबाद सिमेवरील टाकळी कोलते येथील श्री चैतन्य महादेव मंदीर संस्थान टाकळी कोलते ता फुलंब्री येथे १७ फेब्रुवारी रोजी महारुद्र स्वाहाकार यज्ञ महोत्सव व नामसंकीर्तन आणि शिवपुराण कथा सोहळा प्रारंभ झाला होता . यात महाविष्णुयाग यज्ञ प्रारंभ २१ फेब्रुवारी रोजी प्रारंभ होत असून पुर्णाहुती २३ फेब्रुवारी रोजी होणार आहे. २४ फेब्रुवारी दुपारी ह भ प अक्रुर महाराज साखरे यांच्या काल्याचे किर्तन व नंतर महा प्रसादाने या सोहळयाची सांगता झाली.

तर श्री श्री १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज यांचा अशिर्वाद पर प्रवचन झाले. दररोज दुपारी शिवपुराण कथा प्रवक्ते नामदेव महाराज लबडे पंढरपुरकर यांच्या मधुर वाणीतुन शिवपुराण कथा संपन्न झाली. तर ज्ञानेश्वरी पारायण व्यासपिठ ह भ प प्रभाकर महाराज फरकाडे हे सांभाळले होते. यावेळी आमदार नारायण कुच्चे . ६ भ प अशोक गिरीजी महाराज , भास्कर पाटील कोलते , बळीराम पाटील काकडे , यांच्या सह अनेक सांधु संत व शेकडो भाविक या सोहळ्यास हजर होते . यावेळी पीरबावडा, गेवराई शेलगाव आडगाव गिरसावळी मारसावळी रांजणगाव आडगाव तळेगाव पिंप्री रिधोरा धानोरा पिंपळगाव येथील ग्रामस्था सह टाकळी कोलते परिसरातील भजनी मंडळ तरुण मंडळ महिला मंडळ यांनी हा महारूद्र यज्ञ यशस्वीते साठी परिश्रम घेतले.

# बलिका गाडेकर यांना महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील विद्याभवन हायस्कूल कळंब येथील



अतिशय धडाडीच्या शिक्षिका बालिका प्रभाकर गाडेकर यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रामध्ये अतिशय गौरवास्पद कार्य केले आहे. त्यांनी हे कार्य पार पडत असताना समाजामध्ये कुठलाही जात, भेद, उच - नीच असा भेद न करता गोरगरीब व दिन दुबळ्या जनतेची निस्वार्थ सेवा केल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशनच्या वतीने दिला जाणारा "महात्मा ज्योतिबा फुले समाज रत्न पुरस्कार" जाहीर झाला आहे. पुरस्कारासाठी बालिका प्रभाकर गाडेकर यांची सार्थ निवड झाल्याबद्दल कळंब शहरासह जिल्ह्यातून सर्व स्तरावरून त्यांचे कौतुक होत आहे. ह्या पुरस्कारासाठी माझी निवड म्हणजे माझ्या समाजिक व शैक्षणिक कार्याला अजून बळ दिले आहे.



# बाजार सावंगी येथे बारावीची परीक्षा सुरळीत

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** येथे महाराष्ट्र राज्य माध्यमिक उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे बारावीच्या परीक्षेला तीन परीक्षा केंद्रावर परीक्षा शांततेत सुरू आहे. केंद्रावर बैठे पथक ते नातं असून कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे. तेथे तेवीस पर्यवेक्षक काम पाहत असून केंद्रमुख के.के चव्हाण सहकेंद्रप्रमुख एस.के साबळे तसेच समर्थ कनिष्ठ महाविद्यालय केंद्रप्रमुख एस.पी. सोनवणे केंद्रप्रमुख के.बी गायकवाड व 18 पर्यवक्षकांनी काम पाहिले. बैठे पथकाचे प्रमुख तालुका शिक्षक विस्तार अधिकारी एच.बी. पहाटे हे उपस्थित होते.

स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये 22 पर्यवेक्षक व केंद्रप्रमुख प्रवीण जाधव सहक केंद्रप्रमुख एस.बी इंगळे यांनी जबाबदारी पार पाडली. ताजनापूर येथील शांताराई उच्च माध्यमिक शाळेत केंद्रप्रमुख जी.ए काळे सहप्रमुख पीआर वेताळ यांनी काम पाहिले तर बेटी पथकात काम पंचायत समितीचे नरेंद्र देशमुख यांचा समावेश होता परीक्षा केंद्रावर पोलिस पथकाचे मुख्य जमादार नवनाथ कोल्हे, जमादार दिलीप बनसोड, पि.के तुपे संतोष पुंड शिवाजी ढोकरट यांनी बंदोबस्त ठेवला.

# स्मिता गणेश पाटील यांना अष्टपैलू काव्यभूषण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, सामाजिक व



धार्मिक क्षेत्रातील राज्यस्तरीय उपक्रमशील संस्था मुंबई तर्फे दिला जाणारा अष्टपैलू काव्यभूषण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार यंदा स्मिता गणेश पाटील यांना जाहीर झाला आहे स्मिता पाटील या भारतीय साहित्य व सांस्कृतिक मंच तथा फ्रीडम स्टोरी ऑफ इंडिया जिल्हा रायगड मध्ये गेले तीन वर्षे रायगड जिल्हाध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यासोबत प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून त्या उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. साहित्यिक कार्यासोबत त्यांचे सामाजिक, शैक्षणिक कार्यही खूप उल्लेखनीय आहे.त्यांच्या या कार्यातील योगदान बघून त्यांना आतापर्यंत राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्कार, ग्लोबल महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार तसेच अष्टपैलू काव्यभूषण जीवन गौरव पुरस्कारअसे चार राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले आहेत.

उपरोक्त संस्थेच्या वतीने "अक्षरमंच काव्यसमुहात" घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेत त्यांनी सलग दोन वर्षे सहभाग घेवून उत्तम कविता सादर केल्या. त्यांच्या साहित्यकलेच्या सन्मानार्थ त्यांना अष्टपैलू काव्यभूषण हा राज्यस्तरीय गौरव पुरस्कार" सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत असून संस्थेच्या या गौरव पुरास्काराने लोकमान्यतेची साहित्य गौरवमुद्रा आपल्या कर्तृत्वातून उमटल्याचा आम्हास विशेष आनंद होत आहे असे संस्थेचे संस्थापक शिवाजी किसन खैरे यांनी सांगीतले, त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# थकबाकी न भरल्यास मालमत्ता जप्त करणार

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** शासनाच्या आदेशानुसार मार्च अखेरीस शंभर टक्के कर वसुलीकरिता वैजापूर नगर परिषदेने आपली कंबर कसली असून वसुली करिता मुख्याधिकारी बिघोत यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील चार वसुली झोन करिता चार विशेष पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. यात नगर परिषदेने ठोक पाऊल उचलत ज्या मोठ्या थकबाकीदारांनी नोटीस देऊनही थकबाकी भरली नाही अश्या 83 घरांचे नळ कनेक्शन बंद केले असून वैजापूर नगर परिषेद मालीकीचे कै. बाळासाहेब पवार न.प. व्यापारी संकुल मधील एकूण 4 गाळे ज्यांच्याकडे इमारत भाडे रु. 5,75,253 व मालमत्ता कर रु. 88,572 असे एकूण रु. 6,63,825 थकबाकी असल्या कारणाने सील करण्यात आले. तसेच जे थकबाकीदार इथून पुढे आपली थकबाकी भरणार नाही त्यांची मालमत्ता जप्त करून लिलावाद्वारे थकबाकी वसूल करण्यात येईल अशी सक्त ताकीद नगर परिषदेकडून थकबाकीदारांना देण्यात आली आहे. ही कारवाई मुख्याधिकारी बी.यु.बिघोत, उपमुख्याधिकारी आर. डी. साठे यांच्या मार्गदर्शनाखाली कर निरीक्षक जी.के. गंगावणे, किरण गांगुर्डे, मिलिंद साळवे, विलास गडकर, जगन्नाथ नन्नावरे, अशोक वाणी, इलियास खान, संजय जेजुरकर, मदन शेळके, सुशील बागुल, नंदू हरिदास, सुदेश त्रिभुवन, शुभम जोशी, वाल्मिक मोरे, सुखदेव त्रिभुवन, वाल्मिक वाणी यांनी केली.



# प्रिंटिंग प्रेस संघटनेच्या वतीने 'जागतिक मुद्रण दिन' साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा महसूल प्रबोधनी हॉल ( अमरप्रित सिग्नल चौक, जालना रोड ) येथे २४ फेब्रुवारी २०२३ रोजी जागतिक मुद्रण दिन' व मुद्रण कलेचे जनक जोहान्स गुटनबर्ग यांची जयंती उत्साहात प्रिंटींग प्रेस संघटना, औरंगाबाद यांच्यावतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रिंटींग प्रेस संघटनेचे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आदेशपालसिंग छाबडा ( प्रेसिडेंट, मराठवाडा चेंबर्स ट्रेड अॅण्ड कॉमस, जित कार्ड अॅण्ड पेपर्स ) प्रमुख वक्त नंदकिशोर मुळे ( माजी अध्यक्ष औरंगाबाद मुद्रक संघ ) कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे राहुल अग्रवाल ( शगुन कार्डस ) उस्मान खान ( मा. उपाध्यक्ष, औरंगाबाद मुद्रक संघ ) जावेद मिर्झा बेग, ( सचिव-लॉ अॅण्ड राईटस् कॉन्सल ऑफ इंडिया, महाराष्ट्र राज्य ) उपस्थिती होते. यावेळी प्रिंटींग प्रेस संघटना, औरंगाबाद यांच्या वतीने प्रेसवाले यांचे गुणवंत पाल्यांनाचा व आतंरराष्ट्रीय खेळाडू उदय मधेकर व संघटनाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तसेच 'मुद्रक रत्न पुस्कार' म्हणून अक्षदा अॅडस् चे रामेश्वर सराटे यांना दिला गेला. यावेळी प्रिंटींग प्रेस संघटनचे जिल्हा अध्यक्ष संजय फटाकडे, राजकुमार कपुरे, प्रविण आडके, संतोष बनकर, मो. रफिक, सुरेंद्र बलदवा, सय्यद जावीद, मंगेश मुळे, सुनिल उबाळे, संजय नरवडे, अजिज खान, अमजद खान, ज्ञानेश्वर थोरात, कैलास दरक, असद खान, विष्णू, अनिल पाडळकर, किशोर कपाडिया, व्यंकटेश तिवारी, रामेश्वर सराटे, ज्ञानेश्वर कोळेकर, वंसत सराटे, बालाजी टाक, अशोक मधेकर, वाल्मीक हिवर्डे, प्रविण खोडे, शेख वसीम, डि. एन भंडे, डी. एम. वाघ, नवनाथ कोतकर, जावेद खान, रवि तांदळे, सोमीनाथ चव्हाण, सतिश पाडसवान, शैलेश वाघ, प्रवीण बंग, कैलास माळी, मनोज काथार, जुबेर खान, अमोल चिंचोळे, माऊली नवले, नितीन वाहूळ, नदीम शेख, गणेश मोटे, नाईक साहेब, शेख तय्यब, मंगेश चव्हाण, उमेश काथार, योगेश बन्सवाल व संघटनेचे असख्यं प्रिंटींग प्रेस संघटना सदस्य व इतर मान्यवर उपस्थिती होते.



# बदलत्या वातावरणामुळे आजार वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** प्राचीन काळी गावातील व्यक्ती व महिला पहाटे उठत असत,त्यांचे खान पान व्यवस्थित व वेळेवर असे, ते अंग मेहनत करीत असत आज मात्र उलट स्थिती आहे. जीवन शैली बदलली, वातावरण बदलले व व्यसने वाढली त्यामुळे आजार वाढले ,आजच्या नागरिकानी व्यसन विकारापासून दूर राहून,खान पान व्यवस्थित ठेवल्यास व योगासन, प्राणायाम व व्यायाम केल्यास आजार अशा व्यक्तिपासून दूर राहतील असे वक्तव्य गोदाधाम सरला बेटचे पिठाधिश महंत रामगिरी महाराज यानी रविवार( ता,२६ )रोजी बाल रुग्णालय लोकार्पण समारंभात केले. या प्रसंगी आ.रमेश पा. बोरनारे ,उपजिल्हाप्रमुख संजय निकम, तालुका प्रमुख सचिन वाणी, अजय पा.चिकटगांवकर व सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीरामसिंह राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शुभम बावचे, अतुल गोरसे, भाऊसाहेव बावचे, जगन्नाथ बावचे , डॉ. श्रीराम मोरे,डॉ,ऋतुजा बावचे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. हभप अरुण महाराज,हभप रामभाऊ महाराज,वैद्यकीय अधीक्षक डॉ. आशिष पाटणी, डॉ. बी.बी.शिंदे, डॉ. सोनवणे, डॉ.ईश्वर अग्रवाल, डॉ,संदीप म्हस्के यांनी सहभाग नोंदविला अमोल बावचे,रावसाहेब मोटे यांनी परिश्रम घेतले. सूत्र संचलन डी.डी. ठाकूर तर आभार डॉ.शुभम बावचे यांनी मानले.

# दस्तापूर येथे पौष्टिक तृणधान्यविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मौजे दस्तापूर येथे पौष्टिक तृणधान्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. आज दि. 26/02/2023 रोजी जयश्री वाघ कृषि सहाय्यक यांचे कडून ज्वारी पिकाचे आहारातील महत्त्व तसेच फायदे याविषयी सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले यात प्रामुख्याने ज्वारीत असलेल्या तंतुमय पदार्थ, थायमिन, रायबोफ्लोवीन, फॉलिक असिड, कॅल्शीयम यांचे महत्त्व सांगण्यात आले. तसेच ज्वारी पिकाचे आहारात असलेले अनन्यसाधारण असे महत्त्व सांगून होणारे फायदे यात प्रामुख्याने हृदयविकार, स्थुलता कमी होणे, संधिवात कमी होणे तसेच गर्भवती महिलांसाठी आवश्यक खजिने व जीवनसत्त्वे यांची उपलब्धता होते तसेच मधुमेहासाठी गुणकारी आहे असे सांगण्यात आले.

आजच्या कार्यक्रामात ए.एस. महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव यांनी प्रधानमंत्री सुक्ष्म आन प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली व योजनेचा जास्तीत जास्त लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले. आजच्या कार्यक्रमास जयश्री वाघ कृषि सहाय्यक किन्ही व ए.एस.महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव यांनी मार्गदर्शन केले सदरील कार्यक्रमाला गावाचे सरपंच, उपसरपंच, प्रगतीशील शेतकरी व गावातील ग्रामस्त उपस्थित होते.





# समृद्धी ट्रॅक्टरचा लकी ड्रॉ उत्साहात संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला तालुक्यात अग्रगण्य शोरुम समृध्दी ट्रॅक्टर्सच्या वतीने ७ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान आयोजित 'सोनालीका ट्रॅक्टर खरेदी करा आणि सोने जिंकण्याची संधी मिळवा' लकी ड्रॉतील विजेत्या शेतकऱ्यांना प्रत्येकी ५ ग्रॅम सोन्याचे वाटप करण्यात आले आहे. यातील विजेते शेतकऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत, कृष्णा परमेश्वर डांगे, कौशल्या बबन रोकडे, संदीप संजीव सुरवसे, धनाजी गोरख शेंबडे, शरद भिकू वाघमारे, नौशाद इब्राहिम मुजावर, दत्तात्रय शंकर खडतरे. 'सोनालीका ट्रॅक्टर खरेदी करा आणि सोने जिंकण्याची संधी मिळवा' ही लकी ड्रॉ योजना समृध्दी ट्रॅक्टर्सकडून विविध सण उत्सवांच्या निमित्ताने आयोजित करण्यात येत असते. दिवाळी काळात ७ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर दरम्यान हा लकी ड्रॉ आयोजित करण्यात आला होता. या लकी ड्रॉ मध्ये अनेक शेतकरी सहभागी झाले होते. यातून विजेते शेतकरी आता सोन्याचे मानकरी ठरले आहेत. फेब्रुवारी महिन्यात देखील १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान शिवजयंती निमित्त या लकी ड्रॉचे आयोजन करण्यात आले आहे. या लकी ड्रॉ मध्ये ५ ग्रॅम, ३ ग्रॅम आणि २ ग्रॅम या प्रमाणे विजेत्यांना सोन्याचे नाणे भेट म्हणून देण्यात येणार आहेत अशी माहीती मॅनेजर श्री.केसकर यांनी दिली..

# नैसर्गिक शेती अभियानातून पौष्टिक तृणधान्य लागवड करा : वाघ

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** रोगप्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी पौष्टिक तृणधान्याचा समावेश आहारात केल्यास बऱ्याच प्रकारच्या रोगांना अटकाव येतो व रोगप्रतिकार शक्ति वाढते. याकरीता आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य अभियान व राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान यांच्या माध्यमातून तालुका कृषि अधिकारी एस. जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली दस्तापुर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदरील योजनेत समाविष्ट विविध बाबी तसेच वर्ष निहाय करावयाचे नियोजन, नैसर्गिक शेतीचे फायदे व होणारा नफा याविषयीचे ताळेबंध याविषयीची माहिती ए. एस. महाजन बी. टी. एम. यांनी दिली. आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्ष निमित्त महिनानिहाय करावयाचे नियोजन, रोजच्या आहारात तृणधान्य लागवड, विविध रोग-आजार यावर तृणधान्य सेवनामुळे होणारे फायदे, तृणधान्य लागवड याविषयीची सविस्तर माहिती जे. एन. वाघ कृषि सहाय्यक किन्ही यांनी दिली.


गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# दारूबंदीसाठी शेकडो रणरागिणी उतरल्या रस्त्यावर

## आमखेडा येथे दारू दुकानास महिलांचा कडकडून विरोध; तहसीलवर धडकला मोर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्याची शासकीय कार्यालय असलेल्या गजबाजलेल्या सोयगाव- बनोटी रस्त्यावर औरंगाबाद येथील स्थलांतरित झालेले देशी दारू दुकान सुरू होणारे दुकानास शासनाने परवानगी देऊ नये या मागणीसाठी महिला मंडळाच्या अध्यक्षा विमलबाई खैरनार यांच्या नेतृत्वात सोमवारी (दी.२७) गजानन मंदिर आमखेडा येथून शेकडो महिलांनी सोयगाव तहसील कार्यालयावर घोषणाबाजी करीत मोर्चा काढला. तसेच जवळपास एक ते दीड तास बैठे आंदोलन करून मप्रशासनास धारेवर धरले. यावेळी नायब तहसीलदार नाना मोरे व पेशकार आशिष औटी यांनी महिलांचे निवेदन स्वीकारून पूढील कारवाईसाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी आमखेडा ग्राम पंचायत सदस्य मोतीराम (पिंटू) फूसे, संतोष भामरे, मनसे तालुका प्रमुख रामा एलिस, प्रहार संघटनेचे संदीप इंगळे,संजय

> तहसील कार्यालयासमोर मोर्चाचे रूपांतर बैठ्या आंदोलनात झाल्यावर महिला मंडळाच्या अध्यक्ष विमलबाई खैरनार यांनी आमखेडा येथे जर प्रशासनाने देशी दारू दुकानास परवानगी दिली तर संतप्त महिला दुकानाची तोडफोड करून दारू सोनानदीत फेकतील याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील असा गंभीर इशारा दिला.

चौधरी, ज्ञानेश्वर गाडेकर, अनिल लोखंडे,सुनील आगे यांच्यासह शेकडो महिलांची उपस्थीती होती. आमखेडा येथे गावाच्या प्रमुख असलेल्या सोयगाव-बनोटी रस्त्यावर तसेच शासकीय कार्यालय असलेल्या तहसील कार्यालय, उप अधीक्षक सिटी सर्व्हे कार्यालय,, वनक्षेत्रपाल कार्यालय, सामाजिक वनीकरण कार्यालय, लघु पाटबंधारे कार्यालय, ग्रामीण रुग्णालय सोयगाव आदी कार्यालय आहेत. या कार्यालयात तालुक्यातील खेडेगावातून लोक आपली कामे घेऊन येतात. त्यामुळे हे वर्दळीचे ठिकाण असल्याने येथे औरंगाबाद स्थित देशी दारूच्या दुकानाचे स्थलांतर होणार आहे. या ठिकाणी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या गजानन



महाराज,साई मंदिर, व विठ्ठल मंदिरात हजारो भाविक येतात. तसेच शाळा कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांचीही वर्दळ असते.

हे देशी दारू दुकान सुरू झाल्याने आमखेडा गावातील तरुण वर्ग दारूच्या आहारी जाऊन व्यसनी होतील त्यात अनेकांची घरादारे उध्वस्त होऊन लेकर-बाळ उघड्यावर पडतील.त्यामुळे या दुकानास शासनाने परवानगी देऊ नये अशी मागणी महिला मंडळाच्या विमलबाई खैरनार, कलाबाई गायकवाड, यांच्यासह शेकडो महिलांनी केली आहे.या निवेदनावर शेकडो महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ब्ल्यू डायमंडमध्ये संविधान बक्षीस वितरण सोहळा

## मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र शैक्षणिक वस्तूने सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ता.खंडाळा येथील ब्ल्यू डायमंड इंग्लिश मिडिअम स्कूल आणि संविधान गुणगौरव समिती यांच्या वतीने राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा घेण्यात आली होती.या परीक्षेचा बक्षीस वितरण सोहळा संपन्न करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्ल्यू डायमंड इंग्लिश मिडीअम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे हे होते.अखिल भारतीय मराठा महासंघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष जेधे, तरडगाव ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य संतोष कुंभार,भीम सामाजिक विकास प्रतिष्ठान महा.राज्य संस्थापक अध्यक्ष अमोल साबळे, संत रविदास चर्मकार युवा फाऊंडेशनचे फलटण युवा अध्यक्ष सागर बागडे, निरा ग्रामपंचायतीचे माजी सदस्य रफिक शेख,शाळेच्या संचालक शुभांगी धसाडे, प्राचार्या हेमलता दिक्षित यांच्या सह शिक्षिका सोनाली टाक,अक्षया ठोंबरे, सोनाली चव्हाण, गौरी पवार, सुवर्णा पडळकर आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाची उद्देशिका वाचनाने करण्यात आली.तसेच मान्यवरांचा सत्कार भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत,शिवाजी कोण होता,धम्मपद आदी पुस्तक देऊन करण्यात आला.सर्व सहभागी परीक्षार्थींचा सन्मान हा प्रमाणपत्र आणि शैक्षणिक वस्तूने करण्यात आला.



प्रथम व्दितीय आणि तृतीय क्रमांकास ट्रॉफी देण्यात आली.शिवाय विशेष सन्मानाची ट्रॉफी ब्ल्यू डायमंड स्कूलला देताना भारतीय संविधानाची मूळ प्रत देण्यात आली.मोठ्या गटातून प्रथम क्रमांक शिक्षिका सोनाली टाक आणि अश्विनी निंबाळकर यांनी मिळविला, द्वितीय क्रमांक प्राचार्या हेमलता दिक्षित ,तृतीय क्रमांक शाळेचे संस्थापक अध्यक्ष जगन्नाथ शेंडगे तसेच लहान गटातून प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक अनुक्रमे विद्यार्थी आदित्य मोरे,भूषण मोरे आणि प्रणवी धायगुडे आदींनी पटकाविल्याने ट्रॉफी सह प्रमाणपत्र आणि शैक्षणिक वस्तू देऊन सन्मानित करण्यात आले.संतोष कुंभार यांनी परीक्षेचे गुणदान करण्याचे काम केल्याने त्यांचा ही सन्मान प्रमाणपत्र आणि भारतीय संविधान देऊन करण्यात आला.

दि.२६ नोव्हेंबर २०२२ रोजी भारतीय संविधान दिना निमित्त लेखक नुरखा पठाण लिखित 'आपले संविधान राज्यपद्धती नव्हे तर जीवनपद्धती' ह्या पुस्तकावर आधारित राज्यस्तरीय संविधान गुण गौरव परीक्षा घेण्यात आली होती.या स्पर्धेसाठी ब्ल्यू डायमंडचे एकूण ३६ परीक्षार्थी सहभागी झालेले होते.या आयोजना बद्दल मान्यवरांनी शाळेचे विशेष कौतुक केले.छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले भारतीय संविधान,

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवनचरित्र,

मोबाइलचे दुष्परिणाम,दहावी परीक्षेतील विद्यार्थ्यांनी कसा अभ्यास करावा यांसारख्या विविध विषयांवर विशेष मार्गदर्शन मान्यवरांनी केले. कार्यक्रमाचा समारोप हा "भारत का संविधान" या गाण्याने करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशिल गायकवाड यांनी केले.कार्यक्रम संपन्न होत असताना कर्मचारी सुनील साळुंखे आणि माधुरी जगताप यांनी सहकार्य केले.



# सायक्लोथोन स्पर्धेत वैजापूरची बाजी

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** नुकतेच रविवार दि.26-2-2023 रोजी अहमदनगर येथे द्वारका लॉन्स, कल्याण रोडवर " SAVE NATURE, SAVE SOIL " या साठी अहमदनगर सायक्लोथोन सिजन-4 स्पर्धा कार्यक्रम संपन्न झाला.या सायकल राईडिंग स्पर्धेत भाग घेण्यासाठी पुर्ण राज्यातून 1500 पेक्षा जास्त सायकलस्वार सहभागी झाले होते. वैजापूर येथून जलतरण व सायकल ग्रुपचे 17 सदस्य सहभागी झाले यापैकी 10 सदस्यांनी 20 कि.मी. आणी 7 सदस्यांनी 50 कि.मी. राईडिंग स्पर्धेत सहभागी झाले आणी यशस्वीपणे स्पर्धा पुर्ण केली.या सर्वांचा अहमदनगर जिल्हा सायकल असोसिएशन तर्फे मेडल देवून गौरव करण्यात आला आहे. यामध्ये सर्वश्री.योगेश गाढ़े, शिवाजी भसाळे, जयराम खाडे, योगेश बोर्डे, नामदेव चोरे, चरणसिंग काकरवाल, राजेंद्र पगार, योगेश गवळी, कमलेश अधीकार, दिलीप अनर्थे, प्रशांत गायकवाड, ज्ञानेश्वर अनवडे,सचिन लाडवाणी, पारस अनर्थे, बाबासाहेब वारकर आणी महिला सदस्य सौ योगिता योगेश गाढे , सौ प्रियंका योगेश बोर्डे यांना सन्मानित करण्यात आले आहे. या सर्वांचे यशस्वीतेबद्दल वैजापूर मधील विविध मान्यवरानी व विविध सामाजिक संघटनानी अभिनंदन केले आहे.

# शेख समद यांना संजीवनी सेवाभावी दर्पण २०२३ गौरव पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** संजीवनी सेवाभावी संस्था डोणगाव यांच्या वतीने २०२३ संजीवनी दर्पण गौरव पुरस्काराचे वितरण सोहळा राजूरकर मंगल कार्यालयात करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अनिल आवटी जिल्हाध्यक्ष लिंगायत समाज तर प्रमुख अतिथी डॉ.नंदकुमार पालवे, सौ.आरती पालवे -सेवा संकल्प प्रतिष्ठान पळसखेड, प्रमोद देशमुख ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष, राजेन्द्र पळसकर माजी सभापती, सौ.वंदनाताई आखाडे संचालिका श्रीराम अर्बन, सौ.रेखाताई पांडव संरपच डोणगांव, डॉ.गजानन उल्हामाले अध्यक्ष संजीवनी परिवार, सौ.डॉ. मिनाताई सोसे लेखिका उपस्थित होते.विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम केल्याबद्दल संजीवनी सेवाभावी संस्थेच्या वतीने दर्पण पुरस्काराचे वितरण करण्यात



आले.शाळेतील विद्यार्थ्यांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात आले. लोणार तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष,काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष व मा.उपनगराध्यक्ष शेख समद शेख अहमद यांचा पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल संजीवनी सेवाभावी संस्थेचा वतीने दर्पण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळीलोणार तालुका पत्रकार संघाचे प्रवक्ता राहुल सरदार,डोणगाव दैनिक सकाळचे पत्रकार तथा बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसचे महासचिव ज़ैनुल आबेदीन शेख, पत्रकार विष्णू आखरे पाटील संजीवनी सेवाभावी परिवाराचे सन्माननीय हमीद मुल्लाजी,सुरेश फिसके ,आसिफ खान हमीद खान ,सुरेंद्र सिंग चव्हाण यांच्यासह आदी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.गजानन सातपुते,संचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रा.सुरेन्द चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुरेश फिसके, गणेश वाघमारे, किरण देवकर, डॉ. नकुल फुले, विनोद खंडारे यांनी परिश्रम घेतले.



# जिल्हा मध्यवर्ती बँकेत स्व.सुरेश पाटील यांना अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मध्यवर्ती सहकारी बँक कन्नड शाखेच्या वतीने कन्नड मुख्य शाखेत सहकार महर्षी तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तत्कालीन अध्यक्ष स्व.सुरेश पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करत पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

या वेळी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक डॉ.मनोज राठोड, शिवना पतसंस्थेचे उपाध्यक्ष राजेंद्र चौहान, मेहगावचे माजी सरपंच तथा खरेदी विक्री संघाचे संचालक पांडुरंग घुगे, राष्ट्रवादी शिक्षक संघाचे तालुकाध्यक्ष अविनाश काळे, शिवना पतसंस्थेचे संचालक मनोज देशमुख यांच्यासह आदींनी सहकार महर्षी स्व. सुरेश पाटील यांच्या आठवणींना उजाळा देवून त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करत श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तालुका लोन वितरण अधिकारी विश्वास सोनवणे, गटसचिव संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब दौड, कन्नड शाखा अधिकारी व्हि. बी निकम, सोपान मगर, किसन राठोड, महेश गोसावी, बँक इनस्पेक्टर जे.पी दाभाडे, व्ही.डी चव्हाण, मच्छिंद्र चोभे, रवी पाटील, देविदास जाधव, बंडु पवार, भारत पवार, चंदनसिंग मेहेर, संजय निंभोरे, बापु मगर, जिवन माने, सुभाष थेटे, उत्तम शेळके, भाऊसाहेब दाभाडे यांच्यासह तालुक्यातील विविध जिल्हा मध्यवर्ती बँकेतील इन्स्पेक्टर, शाखा आधिकरी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अपंगत्वावर मात करत रोहिणीची देशात दुसऱ्या क्रमांकावर झेप !

## राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत पटकावले रजत पदक

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** एखादी व्यक्ती जेव्हा आपली ज्ञानेंद्रिये गमावलेल्या अवस्थेत जीवन जगते तेव्हा तिचे आयुष्य किती खडतर असेल याची इतर सक्षम लोक फक्त कल्पनाच करू शकतात. त्यांच्या समोर येणाऱ्या अडचणी या आपल्या कल्पनेच्या पलीकडे असतात. फागणे गावाची नात कु. रोहिणी दत्तात्रय सूर्यवंशी नियतीने एक नाही तर दोन ज्ञानेंद्रिये हिरावून घेतली तिच्याकडून', मात्र मोठ्यांचा आशीर्वाद आईवडील गुरुवर्यांची प्रेरणा यामुळे खडतर परिस्थितीत अपंगत्वावर मातकरीत ऑल इंडिया स्पोर्ट्स कौन्सिल ऑफ द डेफ यांच्या अंतर्गत इंदोर येथे आयोजित राष्ट्रीय मूकबधिर वरिष्ठ जलतरण क्रीडा स्पर्धेत कुमारी रोहिणी पाटील हिने देशात दुसरा क्रमांकवर झेप घेत सिल्वर पदक फटकावले आहे. तर आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी या फागणे गावाच्या नातीची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे फागणे ग्रामस्थांची मान अभिमानाने उंचावली आहे.. इंदोर येथील नॅशनल स्विमिंग स्पर्धा मधील फ्रीस्टाईल (मूकबधिर) विभागात रोहिणी दत्तात्रय सूर्यवंशी ही फागणे गावतील नवल पवन पाटील यांची नात आहे. या राष्ट्रीय स्पर्धेत 100 मीटर आणि 50 मीटर अशा दोन राऊंड मध्ये दुसरा क्रमांकाने शिल्वर पदक फटकावले आहे. रोहिणी पाटील ही मुलगी पुणे येथे वास्तव्यास आहे. वडील एका कंपनीत काम करून उपजीविका भागवत असतात. अशा हलाखीच्या परिस्थितीत आपल्या दिव्यांग मुलीला सक्षम करण्याचा ध्यास या पित्याने घेतला व देशात या मुलीने गगन भरारी घेतली. रोहिणी ही चिंचवड विश्रांतीवाडी येथील सी आर रंगनाथन मुक बधीर कॉलेजमध्ये एस वाय बीएचे शिक्षण घेत आहे . आणि ह्या शाळेतून तीला पोहण्याची आवड निर्माण झाली. शाळेतील शिक्षकांनी तीला मार्गदर्शन केले. व पुणे येथील बाल गंधर्व क्रीडा संकुल येथे जलतरण तलावात पोहण्याचा तीने सराव केला आणि पहिली राज्य स्तरीय स्पर्धेत भाग घेतला. गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यात स्पर्धा झाली तेव्हा रोहिणी ने गोल्ड मेडल प्राप्त करून पाहिला क्रमांक पटकावला होता. तेथूनच रोहिणीचा आत्मविश्वास जागृत झाला की मी एकदिवस राष्ट्रीय स्तरावर जाईन. आई वडील आणि गुरुजनांच्या मार्गदर्शनाने देशात (प्यारालम्पिक) मूकबधिर प्रकारात अपंगत्वावर मात करत दुसरा क्रमांकावर झेप घेऊन शिल्वर पदक पटकावले. आता रोहिनीची आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.. त्यामुळे फागणे गावासह संपूर्ण देशातून या मुलीवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून तीचे कौतुकही केल जात आहे. फागणे ग्रामपंचायतीच्या प्रथम महिला लोकनियुक्त सरपंच विद्याताई नगराज पाटील, त्यांचे प्रतिनिधी नगराज पाटील,उपसरपंच विक्रम पाटील, गोकुळ सिंगवी,किशोर सिंगवी , विलास चौधरी, ग्रा. प.सदस्य भालू आबा सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, हंसराज पाटील , शशिकांत सूर्यवंशी यासह रोहिणीचे तोंडभरून कौतुक केले आहे.



# नाशिक विभाग तालीम संघाच्या उपाध्यक्षपदी पैलवान नानाभाऊ साळवे यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :**नासिक विभाग तालीम संघाच्या अंतर्गत येणारे धुळे, जळगाव, नंदुरबार, नाशिक व अहमदनगर जिल्यांसाठी असलेला उत्तर महाराष्ट्र संघ कुस्ती व मल्लविद्येला वाव देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेला आहे. ही उत्तर महाराष्ट्रातील तसेच नाशिक विभागातील सर्वोच्च अशी तालीम संघ संस्था आहे. या संस्थेच्या अंतर्गत वरील पाचही जिल्ह्यांच्या विभागीय उपाध्यक्ष पदासाठी उत्तर महाराष्ट्र कुस्ती संघाचे अध्यक्ष उत्तमराव दळवी यांच्या सूचनेनुसार तसेच महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्यकारणी सदस्य तथा महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष पैलवान गोरखनाना बलकवडे, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे स्पर्धा नियोजन समितीचे अध्यक्ष संदीपआप्पा भोंडवे, हिंदकेसरी किताबाचे महाराष्ट्र राज्याचे टीम कोच टीम मॅनेजर सचिन टकले, सचिन शेवतकर यांनी सुचविल्यानंतर उत्तर महाराष्ट्र कुस्ती संघाचे सचिव व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे कार्यकारी सदस्य तथा जळगाव जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष सुनील देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली फाईट गृपचे संस्थापक अध्यक्ष पैलवान नानाभाऊ साळवे यांना उत्तर महाराष्ट्र कुस्ती संघाचे उपाध्यक्ष पद जाहीर करण्यात आले. नाना भाई साळवे यांना नियुक्तीपत्र पैलवान गोरखनाथ बलकवडे यांच्या शुभहस्ते देण्यात आले. यावेळी संदीप आप्पा भोंडवे, धुळे जिल्ह्यातील एकेकाळचे तुफानी मल्ल अहिरे, सचिन शेवतकर, उत्तर महाराष्ट्र कुस्ती संघाचे अध्यक्ष उत्तम दळवी, सचिन टकले, मालेगाव शहरचे पैलवान पवार , वाल्मीक मराठे उपस्थित होते. पैलवान नानाभाई साळवे यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे. धुळ्यातही यानिमित्त मित्रपरिवार, कुस्तीपटु व तरुणांमी नाना साळवे यांची भेट घेवून त्यांचा अभिनंदनीय सत्कार करीत शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी विजय अहिरे, गोविंद गरुड, गड्ड्या जाधव, भैय्या पाटील, बापू अहिरे, सुनील गायकवाड, अमोल कानकाटे, योगेश पाटील, संदीप खरात, मनोज वाडीले, गोविंद साळवे, बंटी चौधरी, बंटी जोशी, योगेश पाटील यांच्यासह समस्त फाईट गृपचे सदस्य व पैलवान नानाभाई साळवे समर्थक उपस्थित होते.

# सावळदबारा सर्कलसाठी 28 कोटींचा निधी

## माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी मानले आभार

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील नादांतांडा व सावळदबारा परिसरातील गावांना दि.24/२/२३ रोजी कृषिमंत्री तथा सिल्लोड - सोयगाव मतदार संघाचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या पुढाकाराने तालुक्यातील सावळदबारा,मोलखेडा, टिटवी,देव्हारी या सर्कलच्या विकासासाठी जवळपास 28 कोटी रुपयांचा भरीव निधी मंजूर करून दिला आहे. याबद्दल सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी आभार मानले.या निधीतून जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा, पाणंद रस्ते, लेखशीर्ष 3054, 2515 अंतर्गत सर्कलच्या विविध गावांत जनसुविधांची कामे होणार आहे. शुक्रवार (दि.24) रोजी मंत्री अब्दुल सत्तार यांच्याहस्ते मंजूर कामांचे उदघाटन झाले असून लगेचच या कामांना सुरुवात होणार आहे. उद्घाटन झालेली विकास कामे तातडीने सुरू करून काम गुणवत्तापूर्ण व निर्धारित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री अब्दुल सत्तार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या आहे. सोयगाव तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी सविस्तर विकास आराखडा तयार करण्यात आलेला असून तालुक्यातील विविध गावे, तांडा, वाडी वस्त्यात पिण्यासाठी शुद्ध पाणी, रस्ते, आरोग्याच्या सुविधेसह पायाभूत मूलभूत सुविधा निर्माण करण्याचे काम सुरू असल्याचे मंत्री अब्दुल सत्तार म्हणाले. सावळदबारा व सोयगावच्या विकासासाठी भरीव निधी दिला असून विकासाच्या माध्यमातून वर्षभरात सावळदबारा सर्कलचे व सोयगावचे नवीन रूप पहायला मिळेल असा विश्वास ना.अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला.याबद्दल माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी खूप खूप मनापासून आभार मानले.पायाभूत सुविधांची कामे करण्यासाठी 28 कोटींच्या निधीला मंजुरी मिळाली आहे.यावेळी परिसरातील सरपंच व उपसरपंच आणि यांच्यासह गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# बिनविरोध निवड झाल्याबद्दल इंजिनियर आर.बी. जाधव व अनिल निकते यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** निशिगंधा सहकारी बँकेची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली या झालेल्या निवडणुकीमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्थेचे सदस्य इंजिनियर आर बी जाधव व कापड व्यापारी अनिल निकते यांची निशिगंधा बँकेच्या संचालक पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल श्री विठ्ठल रुक्मिणी योग प्राणायाम संस्थेच्या वतीने आर बी जाधव यांचा सत्कार संस्थेचे सचिव प्रशांत आगवणे व अनिल निकते यांचा सत्कार संस्थेचे संचालक निसार भाई शेख यांच्या हस्ते करण्यात आला तसेच आपटे उपलप प्रशालेचे शिक्षक भारत आदमिले हे दिनांक ३१ जानेवारी २०२३ रोजी सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सत्कार संस्थेची उपाध्यक्ष रविंद्र कोडग यांच्या शुभहस्ते करण्यात आला यावेळी संस्थेचे अध्यक्ष अँड.सुनील वाळूजकर,डॉ.दीपक अचलारे, त्रिभवन तारे ,जयंत हरिदास, चंदुलाल सुपेकर,जीवन अभंगराव,आप्पा मुचलंबे,धनंजय पाटील, अरुण जवळे,पवन झवर,बापू मैंदर्गीकर, विठ्ठल घोडके मुकेश भोसले अंकुश वाघमारे, सुरेश माने प्रसन्न गिरवीकर, प्रदीप कौलवार, सर्व संचालक मंडळ व योगसाधक उपस्थित होते.

# कोंढाळी-अमरावती मार्गावर भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कोंढाळी-अमरावती मार्गावर खुर्सापार महामार्ग पोलीस मदत केंद्रासमोरच भरधाव ट्रक आणि कारमध्ये अपघात झाला. या अपघातात दोन जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले आहेत. नागपूरकडून भरधाव अमरावतीकडे जाणाऱ्या ट्रकने कारला धडक दिली. कार मधील दोन लोकांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातात एक महिला व तिचा पती गंभीर जखमी झाले. आदित्य सुखदेव माने (३२ रा. मॉडेल कॉलनी द्वीप बंगला चौक पुणे) व बिसेन पवन मराठे (२२ मानेगांव बिरसा, जि. बालाघाट) अशी मृतांची नावे आहेत.

# मराठी केवळ भाषा नव्हे, आपला प्राण आहे : डॉ. पी. एस. रामाणी

## मराठी भाषेवरचे आक्रमण सहन करू नका : पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठी केवळ भाषा नव्हे, आपला प्राण आहे. अप्रतिम शब्दरचना हीच मराठी भाषेची समृद्धी आहे. प्राथमिक शाळेत शिकलेलो म्हणी, वाक्प्रचार, अलंकार आणि आपल्या मूळांत खोलवर रुजलेला आहे. मराठी भाषेतला अनोखा ठेवा आयुष्यात कधीही विसरू शकणार नाही अश्या अनेक पिढ्या जन्माला आल्या. मराठी भाषेचे हे वेगळेपण जपण्यासाठी आणि वैयक्तिक आयुष्यात मराठी भाषा जोपासण्यासाठी, ती पुढील पिढ्यांपर्यंत जाण्यासाठी आपणा सर्वांचे योगदान असायला हवे असे मराठीची थोरवी जगविख्यात ज्येष्ठ न्यूरोस्पायनल सर्जन डॉ पी एस रामाणी यांनी दादर येथे गायली. मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, दादर सार्वजनिक वाचनालय आणि धुरू हॉल ट्रस्ट आणि मराठी विचारधारा प्रतिष्ठान मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिन मराठी भाषा दिन धुरू हॉल येथे आयोजित करण्यात आला होता. उपस्थितांना आवाहन करताना रामाणी असेही म्हणाले की, मराठी प्रेम एक दिवसापर्यंत मर्यादित नसून, यापुढे प्रत्येक दिवस मराठी म्हणून जगूया. तर सुप्रसिद्ध नेत्रशल्य चिकित्सक पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने म्हणाले की, प्रशासकीय सेवेत असताना मी रुग्णांची नाळ सोडली नाही. सकाळी आठपासून संध्याकाळपर्यंत मी रुग्णांना भेटत राहिलो त्यांना माझ्यासमोर बसवून माझ्या गावाकडच्या बोलीभाषेत संवाद साधत राहिलो. त्यामुळे लाखो रुग्णांना मी कुणीतरी जवळची व्यक्ती आहे असा विश्वास वाटू लागलो. मी खेडेगावात मातृभाषेतच शिक्षण घेतले नावलौकिक मिळवला. त्यामुळे अनुभवांती मी खात्रीने सांगू शकतो. इंग्रजी ही फक्त पोपटपंची करण्यासाठी आहे खरे ज्ञान मातृभाषेतूनच मिळते. अपमान-अपयशाचा अनुभव तुमच्यासारखा माझ्याही आयुष्यात आला, पण मी जिद्द सोडली नाही. 'कमवा व शिका' या योजनेअंतर्गत झाडांना पाणी घालून मिळालेल्या पैशातून अभ्यास केला. उच्चारांनी ज्ञानात किंवा हुशारीत फरक पडत नाही हे सिद्ध करण्यासाठी खूप अभ्यास केला. डॉ लहाने साहेबांनी आपल्या भाषणाचा समारोप करताना बदलत्या परिस्थिती वर अचूक बोट ठेवले. ते म्हणाले की, मराठी भाषेवरचे आक्रमण सहन करू नका. मोबाईलमुळे घराघरातला संवाद संपला आहे. पूर्वी माणूस शंभर पाने वाचायचा आता शंभर शब्द सुद्धा ऐकण्याची क्षमता त्याच्यापाशी राहिली नाही.

